[…]ी देवी होआ :
[…]त्र – एकांक)
[…]रसूत्र)

[…]थोर ! '

—शिवबास (आचारस्थळ)

" आन काठिण्यता चुकवोनी सकळांसी अल्पायासें ब्रह्मविद्या चिये ठाये गिवसतां येवौनि परमेश्वर लाभुद्यमा वावु होआवाः म्हणौनिचां महाराष्ट्रीये निरोपिलें की गा : "

(नागदेवाचार्यचरित्र : परशरामकृत)

केशवसुत

विश्वाचा विस्तार केवढा ?
ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा.

स्वमस्तकीं ज्याचा भार
तो नर कांही करणार.

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
सम्प्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरविती !
देवांच्या मदतीस चला तर !

जनकामागे जागृत । जननी गे तूं दैवत
कष्ट दिले तुजला मीं फार फार आई !
त्यांची मजकडुनि फेड जाहली न कांही !

पराभवांचीं रहस्यें

[मराठी वाङ्मय आणि संस्कृति याविषयी विचार]

१

महानुभावांचा पराभव

महानुभावांच्या अप्रियतेची मीमांसा

महानुभावांची व्यक्तिनिष्ठा

आणि

समाजनिष्ठ महाराष्ट्र

२

केशवसुतांचा पराभव

केशवसुतांचें अंतरंग

अमृत परंपरा

: लेखक :

मुरलीधर मनोहर जाबडेकर

प्रकाशक :
प्रा. मु. म. जावडेकर
४९९, शनिवार पेठ,
मेहूणपुरा,
पुणें २.

शके १८८३

मुद्रक :
द. ग. गपचूप,
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनिवार पेठ,
पुणें २.

प्रसिद्ध ग्रंथकार प्राध्यापक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

यांची प्रस्तावना

गोविंदराम सक्सेरिया महाविद्यालयांतील तरुण प्राध्यापक श्री. मु. म. जावडेकर यांचे 'महानुभावांच्या अप्रियतेची मीमांसा' व 'केशवसुतांचें अंतरंग' हे दोन लहानसे प्रबंध पाहून मला फार आनंद झाला. समाधान वाटलें. या दोन्ही विषयांसंबंधीं श्री. जावडेकर यांनी रूढ मतांहून अगदी निराळें मत मांडलें आहे. आणि असें स्वतंत्र मत मांडतांना विषयाचा जो प्रपंच, जें संशोधन करणें अवश्य असतें तें सर्व त्यांनी केलें आहे. हें संशोधन त्यांनी इतकें करून केलें आहे की हा एक उदयोन्मुख नवा निबंधकार मराठींत दिसत आहे असें वाटावें.

महानुभावांनी चातुर्वर्ण्यावर आघात केला म्हणून महाराष्ट्रांत ते अप्रिय झाले, त्यांनी महाराष्ट्राचे शत्रु जे मुस्लिम राज्यकर्ते, त्यांच्याशीं संगनमत केलें व त्यांच्या साह्याने येथल्या देवाधर्मावर अत्याचार केला म्हणून मराठी कवींचा त्यांच्यावर फार राग आहे, या पंथाचे आद्य प्रवर्तक जे श्रीचक्रधर त्यांच्या चारित्र्याविषयी लोकांत वदंता फार होत्या म्हणून तो पंथ मागे पडला, अशा तऱ्हेचे बरेच समज याविषयी विद्वानांत रूढ आहेत. पण जावडेकरांनी या सर्वांहून अगदी निराळें असें मत मांडलें आहे. महानुभावांची व्यक्तिनिष्ठा — म्हणजेच अतिरेकी समाजविमुखता — हीच त्यांच्या अपयशाच्या मुळाशीं आहे असें हें मत आहे. आणि हें सिद्ध करण्यासाठी महानुभावांच्या मूळ ग्रंथांतून अनेक अवतरणें त्यांनी दिलीं आहेत. समाजांत राहूं नये, प्रियजनांचा सहवास टाळावा, त्यांचें स्मरणसुद्धा होऊं देऊं नये, आपल्याशीं कोणी मैत्री करील, आपल्यावर लोभ करील म्हणून अत्यंत किळसवाणी राहणी असावी, प्रेतासारखें पडून राहावें असें सांगण्याइतका समाजद्वेष महानुभावांच्या वाङ्मयांत दिसतो. येवढ्यानेहि होत नाही. कोणाच्याहि कधीहि उपयोगी पडूं नये अशी त्यांची शिकवण आहे. मसणांतलें लाकूडसुद्धा लोकांच्या थोडें उपयोगी

पडेल. तितकेंहि आपण पडूं नये, नाही तर परमेश्वरप्राप्तींत विक्षेप येईल असें ते सांगतात. ही घृणास्पद समाजपराङ्मुखता हेंच त्यांच्या पराभवाचें मूळ कारण होय असें जावडेकरांचें मत आहे. हें पूर्वार्धात सांगून उत्तरार्धात, महानुभावांची अशी वृत्ति कां झाली याची कारणमीमांसा त्यांनी केली आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानांतील द्वैतसिद्धान्त हा याच्या बुडाशीं आहे असा याविषयी त्यांचा निष्कर्ष आहे.

केशवसुतांवरील प्रबंधांतहि असेंच आतापर्यंतच्या रूढ मतांहून जावडेकरांनी अगदी निराळें, अगदी स्वतंत्र मत मांडलें आहे. केशवसुतांना इंग्रजी कवितेवरून स्फूर्ति झाली, ते मराठींतले वर्डस्वर्थ होते, शेले होते, ' गोल्डन ट्रेझरी 'च्या वाचनांतून त्यांना काव्यस्फुरण झालें अशीं मतें टीकाकारांनी मांडलीं आहेत. जावडेकरांनी हीं सर्व मतें त्याज्य ठरवून केशवसुतांची सर्व स्फूर्ति, त्यांची काव्यप्रेरणा त्यांनी वैदिक वाङ्मयांतून, प्रत्यक्ष वेदांतून घेतलेली आहे, त्या अमृतपरंपरेंतील ते एक कवि आहेत असें प्रतिपादन केलें आहे. आणि यासाठी वेदांतील ऋचा, सूक्तें व केशवसुतांची कविता यांतून त्यांनी इतकीं अवतरणें दिलीं आहेत की या निराळ्या दृष्टिकोनाची दखल घेतलीच पाहिजे असें कोणत्याहि प्रौढ व सुप्रतिष्ठित टीकाकाराला वाटल्यावांचून राहूं नये. केशवसुतांचें सृष्टिप्रेम, निसर्ग हाच नीतीचा आधार हें मत, द्यावापृथ्वीचें ऐक्य, परमेश्वर देवळांत नसून सृष्टि हें त्याचें देऊळ आहे ही कल्पना, जगद्रुमाचा विचार, ऐंद्रियज्ञानापलीकडच्या तत्त्वाविषयीची त्यांची जिज्ञासा, अंतिम सत्याविषयीची तळमळ, इतकेंच नव्हे तर रूढीवर हल्ला करण्याची त्यांची वृत्ति हीसुद्धा वैदिक परंपरेंतून आलेली आहे आणि यावरून केशवसुतांचा आत्माच वैदिक आहे असा विचार जावडेकरांनी मांडला आहे. आणि कोणालाहि आपल्या आजपर्यंतच्या मताचा फेरविचार करण्यास भाग पाडील इतक्या दृढपणें तो मांडला आहे.

आरंभीं म्हटलें आहे की जावडेकरांनी संशोधन केलें आहे. आणि या प्रबंधांतील मला कौतुकास्पद भाग वाटला तो तोच होय. एक नवा विचार मांडतांना किती कष्ट करावे लागतात, आधारप्रमाणें मुळापर्यंत जाऊन कशीं तपासावीं लागतात, त्या विचारावर येणाऱ्या संभाव्य आक्षेपांची कल्पना करून त्याला उत्तरें कशीं द्यावीं लागतात याची लेखकाला चांगली कल्पना आहे. आणि नव्या प्रतिपादनाला अवश्य असलेला हा सर्व खटाटोप त्यानें केला

आहे. केशवसुतांचा आत्मा वैदिकच आहे असें म्हणतांच त्यांची कविता आणि वेद यांतील साम्यस्थळें हुडकून काढणें, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बाळशास्त्री हरदास, रँगोजिन यांसारख्या पंडितांची मतें पाहणें, त्यांचा आधार घेणें, रूढ मताचे पुरस्कर्ते प्रा. जोग, श्री. माडखोलकर यांच्या प्रतिपादनांतील वैगुण्यें शोधून काढणें, त्यांच्याविरुद्ध आपलें मत साधार उभें करणें हा सर्व उद्योग करणें अवश्य झालें. आणि तो जावडेकरांनी निरलसपणें केला आहे. संशोधन-वृत्तीचे अंकुर त्यांच्या ठायीं आहेत असें म्हणण्यापुरता विसार या उद्योगानें जावडेकरांनी निश्चित दिला आहे.

त्यांच्या प्रतिपादनास पूर्णता येण्यासाठी आणखी एकदोन गोष्टी करणें अवश्य आहे असें वाटतें. त्यांचा उल्लेख करून ही प्रस्तावना संपवितों. महानुभावांच्या समाजविमुखतेचें विवेचन करतांना त्यांनी वारकरी, रामदास या इतर पंथांतील संतांच्या समाजहिततत्परतेचा तुलनेसाठी विचार केला आहे. तो अवश्यच होता. त्यावांचून मूळ प्रतिपादनच लंगडें पडलें असतें. पण आणखी एक गोष्ट करावयास हवी. महानुभावांची व्यक्तिनिष्ठा किंवा समाजद्वेष हा दाखविण्यासाठी त्यांनी त्यांच्या ग्रंथांतून जीं अनेक वचनें दिलीं आहेत तशींच, त्या अर्थाचींच अनेक वचनें वरील इतर पंथीय संतांच्या ग्रंथांतहि सापडतात. त्यांचा विचार करून त्या संतांच्या समाजप्रेमाशीं त्यांचा समन्वय साधणें हें अवश्य आहे. त्यावांचून हें विवेचन अपुरें राहील. त्याचप्रमाणे केशवसुतांचा आत्मा वैदिक होता हें म्हणतांना इंग्रजी वाङ्मयाचे, पाश्चात्य विद्येचे, परंपरेचे, संस्कृतीचे ते कोणत्या अर्थानें ऋणी होते हेंहि थोड्या तपशिलाने दाखविलें पाहिजे. नाही तर दुसऱ्या टोकाला गेल्यासारखें होईल. आणि मग तें तितकेंसें टिकणार नाही.

अशीं एकदोन वैगुण्यें दिसलीं तीं सांगितलीं, मात्र तीं प्रतिपादनाच्या मूळ बैठकीला मारक आहेत असें नाही. अवश्य ते मूळ संहितांतले सर्व आधार, पंडितांचीं प्रमाणें, तर्कशुद्ध विचारसरणी आणि विचारांची सुव्यवस्थित मांडणी यांनी जावडेकरांनी ही बैठक भक्कम केली आहे. ज्यांच्या मतांवर त्यांनी टीका केली आहे ते पंडितहि यासाठी त्यांचें अभिनंदन करतील असें वाटतें.

पु. ग. सहस्रबुद्धे

महामहोपाध्याय विद्यानिधि
श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचा अभिप्राय

श्री. मु. म. जावडेकर यांनी लिहिलेले महानुभावांच्या अप्रियतेची मीमांसा, महानुभावांची व्यक्तिनिष्ठा आणि केशवसुतांचें 'अंतरंग वगैरे लेख माझ्या वाचण्यांत आले. त्यांत मला पुष्कळच नाविन्य वाटलें. केशवसुतांसंबंधी लिहितांना त्यांचें अंतरंग त्यांच्याच शब्दांत दाखविण्याचा प्रयत्न मला विशेष आकर्षक वाटतो. केशवसुत हे आधुनिक कवींपैकी आद्य कवि होत. त्यांनी आधुनिक कवितेची भव्य बैठक, स्थिर पायावर उभारली. साहजिकच त्यांचें शिक्षण, योग्यता, स्फूर्तिस्थानें इत्यादींचें संशोधन आधुनिक परिचित मोज-मापाने होणें अगदी स्वाभाविक आहे. पण तसें करतांना आपल्या मनाची घडण कशी झालेली आहे इकडे अगदी दुर्लक्ष होतें, आणि भलभलते तर्क सिद्धान्त म्हणून आग्रहाने मांडले जातात. अशा कांही अपसिद्धान्तांचें खंडण करण्याकरिताच ' अंतरंग ' स्पष्ट करण्यांत आलें आहे. केशवसुतांची स्फूर्ति वदिक वाङ्मयाच्या अभ्यासांतून निर्माण झालेली आहे हें स्पष्ट करण्यांत लेखकाला पूर्ण यश आलेलें आहे. अनेक साम्यस्थळांचा निर्देशच केलेला असल्यामुळे त्याबद्दल शंका राहत नाही. बाहेरच्या प्रेरणा कितीहि प्रभावी असल्या तरी आमची मानसिक घडण इतकी प्रभावी आहे की सर्वांना पचवून ती प्रभावी झाल्याशिवाय राहत नाही. याबद्दल लेखकाने नवी दृष्टि स्वीकारली, कोणीं मांडला नव्हता असा नवा मुद्दा सप्रमाण अभ्यासकांपुढे ठेवला आणि प्रमाणेंहि कोणींहि तपासून पाहावींत अशा स्वरूपांत घासूनपुसून लोकांपुढे ठेवलीं याबद्दल धन्यवाद द्यावेत असें वाटतें.

दि. ३०।५।६१
पुणें

—सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

अनुक्रमणिका

‘ महानुभाव तत्त्वज्ञान ’, ‘ महानुभावांचा आचारधर्म ’ इत्यादि ग्रंथांचे लेखक प्राचार्य डॉ. कोलते यांचें पत्र

नागपूर
२।१।५८

श्री. जावडेकर

स. न. वि. वि. आपण पाठविलेले दोन्ही लेखांक मिळाले. आपण केलेली मीमांसा बरीच पटण्यासारखी आहे. दोन्ही लेख एकत्र वाचून मी पुन्हा केव्हा तरी यासंबंधी आपणाला लिहीन. लेखाची कात्रणे पाठविल्याबद्दल फार आभारी आहे. कळावे.

आपला
वि. भि. कोलते

लेखकाचे चार शब्द

रसिक आणि चिकित्सक अशा मराठी वाचकांच्या हातीं हें पुस्तक देतांना मला आनंद होत आहे. कारण त्यांना तें आवडेल असा विश्वास वाटतो. अर्थात् आवडलेंच पाहिजे, असा आग्रह नाही. पुढे जे कांही विचार मांडले आहेत त्यांहून वेगळें कांही सिद्ध केलें जाईल तर तें समजावून घेण्यांत मला आनंद होईल. पुढील लिखाणांत कुणा व्यक्तीवर टीका नाही. महानुभावांची तळमळ आणि केशवसुतांच्या टीकाकारांचा अभ्यास याविषयी कुणालाहि अतिशय आदरच वाटेल. सुखार्थ्याला ज्ञान कुठलें, असें आपण म्हणतोंच. महानुभावहि तेंच म्हणतात. तसेंच केशवसुतांच्या टीकाकारांनी त्यांचें महत्त्व प्रस्थापित करून मोठेंच कार्य केलें आहे. महानुभाव आणि केशवसुत या दोन्ही विषयांसंबंधी अजून खूपच लिहिण्याजोगें आहे.

अनेक ग्रंथकारांचा उल्लेख केलाच आहे. त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें. अप्रत्यक्षपणेंहि अनेक ग्रंथकार उपयोगी ठरतात; त्यांचाहि मी आभारी आहें. डॉ. कोलते यांच्या ग्रंथांतील उतारे मला हवे होते; म्हणून त्यांना माझे मित्र श्री. महेश जोशी यांनी विचारल्याबरोबर त्यांनी कसलीहि हरकत न घेतां परवानगी दिली, आणि लेख वाचून ताबडतोब मत कळविलें, याबद्दल त्यांचे किती आभार मानावेत! गुरुवर्य डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी मुद्दाम वेळ काढून प्रस्तावना लिहून दिली! त्यांचे आभार मानायचे म्हणजे त्यांच्या अभिरुचीस उतरेल असें आणखी कांही तरी नवीन लिहायला पाहिजे! महामहोपाध्याय चित्रावशास्त्री यांच्या सुंदर भाषांतरांचा मला केवढा उपयोग झाला! त्यांनीच आस्थापूर्वक अभिप्राय लिहून दिला, हें माझें भाग्यच. इतरहि अनेक प्राध्यापकांनी आणि विचारवंत मित्रांनी माझे लेख मुद्दाम वाचले; त्यांचाहि मी आभारी आहें.

आमचे आजोबा ती. रा. रा. शंकर हरी जावडेकर यांनी जनसेवेचें आणि ज्ञानप्रेमाचें उदाहरण आम्हांला घालून दिलें आहे! आमच्या आईचे वडील ती. रा. रा. श्रीधर गणेश मणेरीकर हे तर अक्षरशः सतत ग्रंथवाचन, चिंतन करीत असतात. मीं न मागतां या वेळीं मोठीच रक्कम त्यांनी मला दिली, म्हणूनच हें पुस्तक या वेळीं प्रसिद्ध होऊं शकलें.

'शिवाजी' मुद्रणालयाचे चालक श्री. गपचुप यांनी मुद्रणकार्य किती सुरेख केलें आहे हें सर्वांसमोर आहेच! माझ्या सोयीने घेऊन त्यांनी आपल्या अनुभवाचा लाभ मला दिला हें विशेष.

अशा रीतीने अनेकांच्या शुभेच्छांमुळेच हें लहानसें कार्य माझ्या हातून घडलें आहे. यांत माझें काय आहे? ज्या कांहीं चुका असतील त्या माझ्या आहेत. जे कुणी त्या दाखवतील, त्यांचा मी आभारी होईन.

— लेखक.

मातृ देवो भव।

ती. सौ. आईस अर्पण

— १ —

महानुभाव

(पूर्वार्ध)

महानुभावांच्या अप्रियतेची मीमांसा

महानुभावांच्या पराभवाची मीमांसा आजपर्यंत कांही थोडी झालेली नाही; तरी पण प्रस्तुत चर्चेवांचून ती पुरी होईल असें वाटत नाही हें नम्रपणें सांगावेंसें वाटतें. महानुभावांचा पराभव ही महाराष्ट्र–संस्कृतींतील अत्यंत भव्य अशी शोकान्तिका आहे. महानतेचा अधःपात—Downfall of the great–हें शोकान्तिकेचें लक्षण यशाच्या दृष्टीने—नैतिकतेच्या नव्हे—महानुभावपंथास तंतोतंत लागू पडतें. महानुभाव हा पंथ खरोखर पाहतां इतका मोठा आहे कीं, त्याच्या अभ्यासावांचून महाराष्ट्रसंस्कृतीचा अभ्यास पुरा होणार नाही. मराठी भाषेवर आणि महाराष्ट्र देशावर उत्कट प्रेम करून किती तरी गोष्टी त्यांनीच प्रथम मराठी भाषेंत मांडल्या आणि मराठी भाषा दूरवर पोंचविली. ज्ञानेश्वरांची थोरवी ही कीं, परमार्थामध्यें चातुर्वर्ण्याचें महत्त्व त्यांनी कमी केलें आणि स्त्री-शूद्रांसहित सर्व वर्णांना त्यांनी नामस्मरणाचा सोपा आणि सुंदर महामंत्र दिला. या त्यांच्या कार्याबद्दल सर्व महाराष्ट्र त्यांना ' माउली ' म्हणून संबोधतो. महानुभावपंथसंस्थापक चक्रधरांनी नेमकें हेंच कार्य आणि तेंहि ज्ञानेश्वरांच्यापूर्वी पाव शतकाहून अधिक काळ प्रकटपणें करण्यास सुरुवात केली होती.

महानुभाव तत्त्वज्ञानांत स्पष्टपणें सांगितलेलें आहे कीं, " युगधर्मक्रिया अथवा पुण्यहेतु याव्यतिरिक्त उगीचच एखादी वस्तु पवित्र व दुसरी अपवित्र मानणें, छीछी-थूथू करीत एखाद्या वस्तुविषयी मनांत किळस आणणें किंवा व्यक्तिविषयी विचिकित्सा करणें, हा विचिकित्सारूप विकल्प प्रतिदेहारंभक होय. त्याने प्रति-

देह आक्षेपतो. कारण, अशा विचिकित्सेमुळे मनुष्य स्वतःला श्रेष्ठ मानून इतरांना तुच्छ लेखतो. त्यामुळे सर्वत्र व्यापून असलेली अजड माया दुखावली जाते आणि म्हणून प्रेतत्व भोगावें लागतें. ''

याच तत्त्वज्ञानास अनुसरून ' चारहि वर्णाच्या घरीं घर न निवडतां निर्हेतुक भिक्षा करावी ', असें महानुभाव आचारधर्मांत म्हटलेलें आहे (नवप्रकरण ८२). नामस्मरणाचे फायदे पुढीलप्रमाणे दिलेले आहेत. ' नामस्मरणाने जीवांना सर्व कांही मिळूं शकतें. त्यामुळे साधकाला वेध होतो, बोध होतो, अनुसरण घडतें, स्मरण उत्तम रीतीने करतां येतें, त्याचे सगळे विरोध नाहीसे केले जातात, त्याच्यावरचा ' वाजनवारा ' आणि ' पडतें आकाश ' थोपवून धरलीं जातात, त्याच्यावर येणारें विघ्न निवारलें जातें, त्याला त्याच्या आचारधर्मांत साह्य मिळतें आणि शेवटीं ईश्वरप्राप्ति होते... नामस्मरणाने श्रीमूर्तीच काय, पण ईश्वराचें अव्यक्त स्वरूपहि प्राप्त होतें, इत्यादि '. (नामस्मरण करावें नामी अभिमानु आति ॥ ४६ ॥ आचारमालिका).

चक्रधरांनी आपल्या या तत्त्वज्ञानाचा उपदेश करण्यास सुरुवात करतांच त्यांना अनेक अनुयायीहि मिळूं लागले होते. पण ज्ञानेश्वरांचा उदय होतांच त्यांचा पंथ भराभर वाढूं लागला आणि काळाच्या ओघांत महानुभावांची पुरी पीछेहाट झाली. महानुभाव अप्रिय झाले आणि मागें पडले, याविषयीं वाद नाही. ही गोष्ट अर्थातच आपोआप झालेली नाही.

या घटनेच्या कारणांचा अभ्यास आरंभींच निर्दिष्ट केल्याप्रमाणे अनेकांनी केलेला आहे. त्यांचा पुनरुच्चार येथे करावयाचा नाही. फक्त प्रस्तुत चर्चेस आवश्यक अशा मुद्द्यांचा उल्लेख येथे होईल. अनेक विद्वानांच्या मतें, महाराष्ट्राच्या मनांत महानुभावांच्याविषयी फार मोठे गैरसमज होते व ते दूर न झाल्यामुळे महानुभावपंथ अप्रियच राहिला. हें म्हणणें प्रथम विचारास घेऊं. शतकानुशतकें एखादा गैरसमज चालू राहील असें वाटत नाही. एकनाथांसारखा बुद्धिमान्, बहुश्रुत आणि सर्व भूतमात्रावर प्रेम करणारा संत, तुकारामांसारखा उपेक्षितांस जवळ करणाऱ्याला देवपद देणारा महात्मा, भावार्थावर समाधान न होऊन यथार्थ शोधणारा पंडित वामन, ' मना बोलणें नीच सोशीत जावें ' या शिकवणींत मुरलेले गिरिधर, हे जेव्हां महानुभावांवर मनापासून हल्ला चढवितात, त्या वेळीं तो ऐकीव, अपुऱ्या माहितीवर विसंबून करीत असतील, असें मानणें

मनास रुचत नाही. नकळत जरी हातून अन्याय घडला असें वाटलें असतें तर या लोकांना केवढी खंत लागून राहिली असती ! पण आपली चूक होत नाही अशीच त्यांची खात्री असली पाहिजे. त्यांनीं महानुभावांवर कोरडे-ओढले ते जाणीवपूर्वकच असले पाहिजेत.

महानुभावांचें महत्त्व पाहतां हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा आहे असें कोणाहि विचारी माणसास वाटल्यावांचून राहणार नाहीं. याचें कारण शोधण्यासाठीं अर्थातच सबंध महाराष्ट्राच्या संस्कृतीची पाहणी करणें जरूर आहे. कारण महानुभावपंथ हा अगदीं एकीकडे पडला पण महाराष्ट्रांतील इतर सर्व प्रमुख पंथांत फार मोठा सलोखा प्रथमपासून नांदत असल्याचे वरवर पाहणारासहि दिसून येतें. भागवतपंथ किंवा वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रांतील सर्वांत मोठा पंथ होय. त्यास नाथपंथांतील ज्ञानेश्वर आणि त्यांचीं भावंडें, दत्तसंप्रदायांतील एकनाथ, चैतन्यसंप्रदायांतील व ' रामकृष्णहरि ' हा मंत्र उच्चारणारे तुकाराम, रामदासी संप्रदायाचे प्रवर्तक रामदास, या सर्वांनी प्रेमाने अभिवादन केलें आहे. या सर्वांचे एकमेकांशीं जे संबंध होते त्यावरून महाराष्ट्राचें प्रेमळ व अव्याज मनच दिसून येतें. पण महानुभावपंथ यापासून अलग राहिला !—कां ? तो आपण होऊन दूर राहिला कीं त्यास दूर ठेवण्यांत आलें ? आणि तें कां ? महानुभावांचा प्रेमावर काय कमी भर होता ? ' ज्ञानापसि प्रेम उत्तम ' असें त्यांचें वचन आहे ! (विचारमालिका ३०). हें सर्व लक्षांत घेतां हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे आणि आपल्या संस्कृतीशींच तो निगडित आहे याविषयीं कोणासहि शंका उरेल असें वाटत नाही.

अशा रीतीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व गहन दिसला तरी त्याचें उत्तर फक्त एका शब्दांत देतां येण्याजोगें आहे, आणि तें म्हणजे 'व्यक्तिनिष्ठा'. महानुभावपंथ हा व्यक्तिनिष्ठ पंथ आहे म्हणून त्याचा पराभव झाला. महाराष्ट्रांतील इतर सर्व वर उल्लेखिलेले प्रमुख पंथ हे समाजनिष्ठ आहेत. एखाद्या तत्त्वज्ञानाचा विस्तार कोणत्या कल्पनेभोंवतीं केलेला असतो, यावर त्या तत्त्वज्ञानाची निष्ठा सांगितली जाते. महानुभावपंथाचें तत्त्वज्ञान ' व्यक्ति ' या मध्यवर्ति कल्पनेभोंवतीं रचलेलें आहे, तर इतर सर्व पंथ आपलें तत्त्वज्ञान मांडीत असतांना सबंध समाजाचा विचार करीत असतात. महानुभावांपैकीं कोणास या व्यक्तिनिष्ठेची जाणीव होती असें

निश्चितपणें सांगतां येत नाही. पण त्यांचें तत्त्वज्ञान व्यक्तिनिष्ठ आहे, हें प्रस्तुत लेख वाचल्यावर कोणासहि पटेल. नेणिवेने कां होईना, एखादी गोष्ट होऊन गेली असेल तरी तिचें स्वरूप पाहून तिचें अंतरंग शोधणें कठीण नाही. तेंच या लेखांत करावयाचें आहे. वस्तुतः यांत कठीण कांहीच नाही. साऱ्या गोष्टी कशा सूर्यप्रकाशासारख्या स्पष्ट आहेत. अर्थातच व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजवाद या अर्वाचीन कल्पनांची या ठिकाणीं गल्लत करण्याचें कांहीच कारण नाहीं.

आयुष्य कसें कंठावें यासंबंधीं उद्धवगीतेंत निःसंदिग्धपणें म्हटलें आहे; "संसारग्रस्त अनुतापीः जो एकला जन्म क्षेपीः तो मोक्षाचा निक्षेपीः संपन्नु होए." या ठिकाणचा 'एकला' हा शब्द व्यक्तिनिष्ठावाचक आहे. तसेंच दुसऱ्या एका ठिकाणीं, "बाइ: ऐसा एकला पळपळीत निगे: जो दुःखपूर्वक आपुलेया देवाते आठवीत वर्ते: (आचारमालिका २१६)" त्याच्या दुःखाने पापें नष्ट होतात असें सांगतांना 'एकला' हा शब्द मुद्दाम घालून व्यक्तिनिष्ठेवरच भर दिला आहे. ही व्यक्तिनिष्ठा निरनिराळ्या रूपांत महानुभावपंथांत सर्वत्र दिसते. ती इतकी कीं, तिला सर्वांगीण म्हणावयास कांहीहि हरकत नाहीं. हें कसें तें क्रमाक्रमाने पाहूं.

या व्यक्तिनिष्ठेमुळे महानुभावांना समाजसंपर्क मुळींच नको असतो. 'कोणीकडून तरी आपलें परमेश्वरसाधन पूर्ण व्हावें याच गोष्टीकडे साधकाचें लक्ष पाहिजे,' असें मुंगीच्या पुरुषाचें वर्णन करतांना सूचित केलेलें आहे. (जन्मजीवित परमेश्वरा देयावें ॥ ६८ ॥ नवप्रकरण). देहविद्यावंताचें वर्णन करतांना व्यक्तिनिष्ठा उघड झाली आहे. 'देहविद्यावंताचें साधन व साध्य देहच असल्यामुळे तो आपल्या सुवर्णमय वज्रदेहाशीं पूर्णपणें तादात्म्य पावतो. (एकाकार वृत्ति उरे: विचार ३९). आपल्या देहाशीं एकाकार झाल्यामुळे इतरांच्या संगतीची त्याला आवश्यकताच वाटत नाही. अर्थात् त्याला स्त्री वगैरे कोणीच नसतें. चारपांच देहविद्यावंत मिळून एकत्र राहतात असेंहि नाही. तो पूर्णपणें निःसंग बनून स्वेच्छेने अष्टभैरवांच्या स्वरूपावधींत वाटेल तेथें राहतो'. परमेश्वराचा सहवास — 'सन्निधान' — असणें म्हणजे काय याचें वर्णन केलें आहे तें पूर्णपणें समाजनिरपेक्ष आहे आणि सर्वसंगपरित्याग ही त्यांत एक आवश्यक गोष्ट म्हटलेली आहे. भक्ताचें वर्णन करतांनाहि 'भक्त हा आपल्या प्रेमदात्या

परमेश्वरावताराच्या ठिकाणीं पूर्णपणें बेंचलेला असतो (वित्तः वित्तः कायाः इए तिन्ही परमेश्वरासि अर्पावी ॥ २१८ ॥ आचारमालिका)' म्हणजे जगाचा व त्याचा कांही संबंध नसतो असेंच पर्यायाने सांगण्यांत आलें आहे. परमेश्वर-प्राप्ति हें महानुभावांचें ध्येय. तें साध्य होण्यासाठीं जो आचारमार्ग अनुसरावा लागतो त्याला ' असती परी ' म्हणतात. तिचा मुद्रितार्थ असा कीं, ' विकार-विकल्पशून्य होऊन व स्वभावाला मात्रा देऊन त्याने (म्ह. साधकाने) पर-मेश्वराव्यतिरिक्त इतर सर्व जडचेतन पदार्थांचा आश्रय सोडून निरालंब व्हावें आणि परमेश्वराचें स्मरण करीत करीत जन्मजीवित कंठावें. (पहा, आचारस्थळ सूत्र १ लापिका)'.

" असती परी 'चा हा मुद्रितार्थ लक्षांत आणला म्हणजे परमेश्वरानुसरणाच्या कल्पनेंत सगळा आचारधर्म अंतर्भूत झालेला असल्याचें सहज लक्षांत येईल.' याचाच तपशील ' स्वदेशसंबंध त्याज्य ', ' स्वग्रामसंबंध त्याज्य ', ' संबंधिये त्याज्यः संबंधियांचा संबंधु तो विशेषता त्याज्य ' (आचारस्थळ-सूत्र १) इत्यादि सूत्रांत देऊन ' धर्म म्हणजे समाजाचा त्याग ' हें कोणाच्या लक्षांत आलें नसेल त्याची सोय केली आहे. हा त्याग शरीरानेच नव्हे, तर मनानेहि करावयाचा असतो. (दुरूनिही अंतःकरणीं नाठवावें). यांचें विवेचन मोठें पाहण्याजोगें आहे. " या सर्वांचा त्याग करणें आचरत्या पुरुषाचें कर्तव्यकर्म होय. ...कारण या संबंधीयांच्या सान्निध्यांत असतांना आचारधर्म नीट रीतीने पाळला जाऊं शकत नाही; आचार आचरण्याचा अधिकार राहात नाही. (संबंधी अधिकारु नाही – आचारस्थळ सूत्र २). जे निषेध चुकवायला पाहिजेत ते चुकवतां येत नाहीत आणि जे विधि पाळायला पाहिजेत ते पाळतां येत नाहीत. त्यांच्या सान्निध्यांत आचरत्या पुरुषाला प्रेमाचे उपाय करतां येत नाहीत, शास्त्राध्ययन करतां येत नाही, कीं मोक्षाचे कोणतेच उपाय यथायोग्य रीतीने आचरतां येत नाहीत. त्याला नित्यनैमित्तिक विधीहि करतां येत नाहीत. इतकेंच नव्हे, तर ते आपण आचरावेत अशी वृत्तीच त्याच्या ठिकाणीं राहत नाही. कारण त्या संबंधीयांच्या सुखदुःखांनी त्याच्या मनांत विक्षेप उत्पन्न होतो. इत-केंच काय, पण त्यांच्या दर्शनाने देखील आचारधर्माविषयी अदक्षता (निर्बळता) उत्पन्न होते. म्हणून या सगळ्या संबंधीयांचा आचरत्या पुरुषाने त्याग करावा. मनांत त्यांचें स्मरणदेखील करूं नये. धनकोला पाहतांच ऋणको जसा

पळतो किंवा ऋणको धनकोला जसा टाळतो त्याप्रमाणे त्याने आपल्या संबंधीयांना टाळलें पाहिजे. कोणत्याहि निमित्ताने त्याने त्यांचा संबंध ठेवला तरी त्याला अनिष्ट होऊन त्याच्या धर्माची हानि झाल्यावांचून राहणार नाही." सारांश, सामाजिक आणि प्रापंचिक जीवन म्हणजे परमार्थातील अडचण.

पण हें नुसतें तात्त्विक विवेचन झालें. तें मनावर ठसविण्यासाठीं भरपूर उदाहरणें दिलीं आहेत. 'युधिष्ठिर हा वेधवंत होता. परमेश्वराची आज्ञा मोडून आपल्या नातवाला—परीक्षितीला—राज्याभिषेक करण्यासाठीं तो कलियुगांत सात दिवस राहिला. पण त्यामुळेदेखील त्याला स्वर्गाला जातां जातां नरकाचें दर्शन झालेंच. अनिष्ट त्यागी पुरुषांना असें वाटतें कीं, आपण आपल्या मुलाबाळांचा संसार नीट करून देऊं आणि मग अनुसरण करूं. पण त्या संबंधीयांच्या स्नेहामुळे एक तर त्यांना लौकर अनुसरण घडतच नाही, किंवा ते अनुसरलेले असले तर थोर अनिष्ट उपजतें. उदाहरणार्थ, डखले आणि चांगदेवभट हे पेणोवेणा माहूरला श्रीदत्तात्रेयप्रभूच्या दर्शनाला निघाले. रस्त्यांत दाउलवाडी गांवाला डखले यांची एक मुलगी राहत होती. त्या वात्सल्यामुळे एक दिवस ते तिच्या गांवीं राहिले. पण त्यामुळेंच श्रीदत्तात्रेयाच्या दर्शनाला जाऊं शकले नाहींत. तीच गति भूतानंदाचीहि झाली. तिला स्वामींनी कोल्हापूरला पेणोवेणामध्यें न थांबतां जायला सांगितलें. ती निघाली; पण मध्यें नेवाशाला आपल्या मुलीला भेटण्यासाठी थांबली. तेथे मुलीचा हात भाजल्यामुळे आधीं तिच्या शुश्रूषेसाठीं आणि मग तिच्या बाळंतपणासाठीं तिला थांबावें लागलें. म्हणून ती कोल्हापूरला जाऊं शकली नाही.'

'कित्येक सतेवत्यागी पुरुष आपले संबंधीये मेले असले तरी अनुसरणानंतर नवीन संबंधीये निर्माण करतात. त्यांच्या स्नेहपाशांत ते अडकतात व पुढें त्यांच्या मृत्यूमुळे आत्यंतिक वियोग झाला म्हणजे त्यांना अनिवार दुःख होतें. उदाहरणार्थ, अहीरदेशांतील एका म्हातारीचे सगळे आप्तेष्ट मरून गेले होते. त्या अनुतापाने ती महाराष्ट्रात गंगातीराला आली. एका ब्राह्मणाच्या ओसरींत राहून भिक्षा मागून काळ कंठूं लागली. पुराण वगैरे ऐकायलाहि ती जात असे. आपल्या मृत लेकरांच्या आठवणीमुळे ती त्या ब्राह्मणाच्या मुलाबाळांनाहि आपल्या ओसरीवर येऊं देत नसे; नव्हे, त्यांच्याकडे

ती पाहातहि नसे. पुढें कांही दिवसांनी त्या मुलांची आई मेली. तेव्हां त्या ब्राह्मणाने ह्या म्हातारीला विनंती केली कीं, 'आई, मी आतां अन्नधान्य मिळवून आणीत जाईन ! तूं आम्हांला शिजवून घालीत जा.' तिने तें कबूल केलें. पुढें लौकरच तो ब्राह्मणहि मेला. तेव्हां त्याच्या मुलांचा संभाळ त्या म्हातारीलाच करावा लागला. दळण–कांडण करून, भरडा करून ती त्यांना पोसूं लागली. अशा स्थितींत कुठला तिचा धर्म आणि कुठलें काय ? आणि पुढें तर तीं मुलेंहि मेलीं. मग तिच्या दुःखाला सीमा राहिली नाही ! याचसाठीं अनुसरलेल्यांनी पुन्हा नवीन संबंध जोडूं नयेत. (दृष्टान्त पाठ ९१)'. (संबंधियाचेनि स्नेहें इतुले मेले नागवले ।।१।। आचारस्थळ).

'कित्येक अनिष्ट व सतेव त्यागीयांचें आपल्या संबंधीयांत इतकें लक्ष असतें कीं, अनुसरल्यानंतरदेखील ते त्यांचें चिंतन करतात. आपल्याप्रमाणे आपले संबंधीयेहि परमेश्वराला अनुसरतील तर मग आपण सगळेच एके ठिकाणीं राहूं आणि एकमेकांच्या उपयोगी पडूं, या भावनेने ते त्या संबंधीयांना मार्गांत आणण्यासाठीं म्हणून जातात. पण ते येत नाहीत. कारण त्यांचीं मनें इतरत्र गुंतलेलीं असतात. तीं आपणांबरोबर येत नाहीतसें पाहून त्या अनुसरलेल्या पुरुषांना अत्यंत दुःख होतें. त्यांना पश्चात्तापहि होतो. त्या संबंधीयांना आणण्याचा प्रयत्न करण्यांत लागलेला वेळ परमेश्वरसेवेवांचून व्यर्थ गेला याबद्दल त्यांना तीव्र खेद होतो. उदाहरणार्थ, नागदेवाचार्य परमेश्वरसेवेसाठीं उमाइसाला आणूं गेले होते. पण ती आपल्या इतर स्नेहपाशांत गुंतली होती. वैजोच्या बायकोचें बाळंतपण करण्याची तिला अधिक चिंता होती. त्यामुळे नागदेवाचें म्हणणें तिने ऐकलें नाही. ती आली नाहीं ! म्हणून नागदेवाचार्यांना झालेल्या दुःखाला पारावार नव्हता.' पण संबंधीयांसाठीं दुःख करूं नये; कारण 'दुःख म्हणजे पापः दुख तव नरक होतिः' (७१ लीळाचरित्र–पूर्वार्ध १).

'संबंधीयांना प्रत्यक्ष आणायला जाणें तर दूरच राहो, पण त्यांना आणण्याचा मनांतल्या मनांत विचार केला तरी परमेश्वरसेवेला अंतरण्याचा प्रसंग येतो. उदाहरणार्थ, पद्मनाभीदेवाने मनांत असाच विचार केला होता कीं, आपले सगळे संबंधीये अनुसरतील तर आपण येथेच राहून त्यांची सेवा करूं; त्यांच्यासहित परमेश्वरसान्निध्यांत राहूं. त्याचा हा मनोरथ ओळखून श्रीचक्रधरस्वामींनी त्यांचें

बाडीपोतें हिसकावून घेऊन त्याला हाणून दिलें. त्यामुळे तो ईश्वरसान्निधानाला अंतरला '.

पद्मनाभीची ही गोष्ट लीलाचरित्राच्या पूर्वार्धात आहे. पद्मनाभीच्यासंबंधाने चक्रधरांनी धांदुल नांवाच्या एका कुणब्याची गोष्ट सांगितली.— त्याच्या शेतांत ऐरावत चरावयास येई. म्हणून त्याचा बाब विचारण्यासाठीं धांदुल ऐरावताचें शेपूट धरून स्वर्गात गेला. त्याचें भाग्य उघडलें. पुढच्या वेळीं इतर लोकांस घेऊन तो ' सकुटुंब मोक्षा जावो ' पाहूं लागला; पण वाटेंत वैभवाविषयीं बोलत असतां थोडी कल्पना यावी म्हणून त्याने हाताने दाखवण्याचा प्रयत्न केला. साहजिकच तत्काळ ' अवघीचि रिचवली '. तात्पर्य, ' तेया अवघेया यथीची बुधि होए काः सोधुः तेया ही आवडि हो कांः हा दोखुः ' अशी बुद्धि होणें दोषरूप आहे.

सारांश, इतरांची चिंता दूर करण्यासाठीं, निःस्वार्थीपणें किंवा ईश्वराच्या कार्यासाठींदेखील समाजांत राहूं नये. ' अनुसरलेल्या पुरुषाने संबंधीयांचा संबंध विशेष त्याज्य मानावा. त्याने त्यांची झाडपूस (चौकशी वगैरे) करूं नये, ममता धरूं नये. नाही तर युधिष्ठिराप्रमाणे अनिष्ट होईल. नवीन संबंधी निर्माण करून तेथे मन गुंतवूं नये; नाही तर अहीरदेशांतील म्हातारीची गत होईल. उत्तम कार्यासाठीं निघालें असतां संबंधीयांची भेटहि घेऊं नये; नाही तर डखले, चांगदेव आणि भूतानंद यांच्यासारखें अनिष्ट जोडेल. उत्तम वस्त्रें वगैरे देण्याच्या निमित्तानेहि संबंधीयांकडे जाऊं नये, कारण त्यामुळे पुढील उत्तम लाभ हातांतून निसटण्याचा संभव असतो. ईश्वराज्ञा नसतांना संबंधीयांना मार्गात आणण्याचाहि प्रयत्न करूं नये; नाही तर नागदेवाचार्याप्रमाणे त्यांच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. तसेंच इष्ट क्रिया जोडीत असतांना संबंधीयांची ममता मनांत येऊं देऊं नये. नाहीं तर पद्मनाभीप्रमाणें परमेश्वराला आणि त्याच्या इष्ट क्रियेला अंतरावें लागेल. तेव्हां संबंधीयांचा संबंध कोणत्याहि निमित्ताने कां होईना, अनुसरलेल्या पुरुषाने ठेवतां कामा नये.

' ...खुंटामुळे व दाव्यामुळे ज्याप्रमाणे गुराला हालतां चालतां येत नाही, त्याप्रमाणे स्त्री आणि संबंधीये यांच्यामुळेहि साधकाला स्वतंत्रपणें आचार करतां येत नाही. त्याचें स्वातंत्र्य नष्ट होतें. म्हणून त्यांचा त्याने त्याग करावा...हें केवळ चेतनसंबंधीयांमुळेच होतें असें नाही, तर जड स्थानांच्या संबंधामुळेहि

होतें. म्हणून त्यांचाहि त्याग करणें आवश्यक आहे...संबंधीयांच्या संबंधामुळे शास्त्राभ्यास आणि विधिनिषेधाचें आचरण योग्य रीतीने होत नाही, इतकेंच नाही, तर त्याज्य म्हणून सांगितलेल्या संबंधीयांचा संबंध ठेवल्याने आज्ञा-भंगाची अयोग्यता लागते; आणि त्यांच्या सान्निध्यांत केलेलें आचरण लेखीं लागत नाही...विकारशून्यत्वासाठीं म्हणजे विकार उत्पन्न होऊं नये म्हणून किंवा विकाराच्या चतुर्विध चालींपैकीं आज्ञासेव्यतिरिक्त इतर उल्लेख निर्माण होऊं नयेत म्हणून स्वदेश, स्वग्राम आणि संबंधीये यांचा त्याग करण्याची जितकी आवश्यकता आहे, तितकीच किंबहुना त्याहूनहि जास्त विषयपदार्थांचा त्याग करण्याची आवश्यकता आहे.' वात्सल्यपाश नाहीसा व्हावा म्हणून आईचाहि त्याग सांगितला आहे. (जेणेसंबंधे विकारु उपजे तेयाचा असंबंधु कीजे – आचारस्थळ सूत्र १३).

समाजाशीं संबंध येईल म्हणून गायनवादनासारख्या गोष्टीच काय (गीत विखो ॥ १७१ ॥ आचारमालिका) पण भागवतपुराण कां असेना तें कर्म-रहाटीच्या पुराणिकाकडून सांगितलें जात असतांना सगळ्याच अनुसरलेल्या पुरुषांनी ऐकायला जावें असें मात्र नाही. दुसऱ्याचें बरें करण्यासाठीं आपलें श्रेष्ठत्व प्रकट केल्याने काय होतें हें सांगण्यासाठीं काइदेवाचें उदाहरण दिलेलें असून 'तथापि एकंदरींत हा तोषरोष टाळण्यासाठीं जनसंपर्क टाळावा हेंच उत्तम' हें तात्पर्य काढलेलें आहे. (आचारस्थळ सूत्र ३०). साधकाने गांवा-बाहेर निद्रा करणें हाच उत्तम पक्ष (आचारमालिका ६६). पण कित्येक वेळां तें शक्य नसतें. मग नाइलाज म्हणून गांवाजवळ किंवा गांवांत निजावें; आणि लोकांची गडबड चालू असतांना ती कानीं पडलीच तर तिकडे पूर्ण दुर्लक्ष करावें, व मेल्यासारखें पडावें !

गुरूच्या अंगीं कांही दोष असले तरी त्याची सेवा करावी हा मुद्दा मांड-तांना 'नाही तरी बरीं असतांना बायकालेकरांची सेवा तो करीतच होता कीं नाही ? त्यामुळे तो नरकच जोडीत होता', असा एक विचार मांडला आहे. साधकानें कशाचा विचार करावा, हें सांगतांना, 'परमेश्वर, परमेश्वरावतार, परमेश्वरावताराच्या सेवासंबंधाला उपयोगी पडलेला प्रपंच, परमेश्वराचे भक्त, अनुसरलेले ज्ञानिये, बोधवंत व वेधवंत हे सगळे जीव आणि परमेश्वराने ज्यांचा निर्वेध केला आहे त्या देवता याव्यतिरिक्त इतर जीव, देवता व प्रपंच हे सर्व

अन्य होत. याची वार्ता करण्यांत, याविषयी उगीच गोष्टी बोलण्यांत व चर्चा करण्यांत अनुसरलेल्या पुरुषांनी आपला वेळ घालवूं नये. परमेश्वराच्या ठिकाणीं त्याची इतकी अनन्यता असावी कीं, कोणत्याहि प्रकारच्या अन्यवार्ता त्याला सलूं लागतील. ह्या अन्य वार्ता करण्यापेक्षा एक वेळ झोपून राहिलें तरी बरें, ' असें स्वच्छ सांगितलेलें आहे. (नवप्रकरण १५१).

ईश्वराच्या परिवारांत प्रामुख्यानें अनुसरलेल्या बोधवंतांचा व ननुसरलेल्यांचा समावेश होतो. अनुसरलेल्या बोधवंतांचे ३१ प्रकार आहेत. यांत समाजाशीं संबंध येणारेः क्र. १७ उपाधिस्थूळ—इतरांना इष्ट घडावें म्हणूनच केवळ उपाधि बाळगणारे, आणि क्र. २४ भजक — पात्रापात्राचा विचार न करतां नेहमीं लोकांना भोजन घालणारे असे दोघेच येतात. 'आपुलेया पडिलेयाची शुश्रूषा कीजे,' असा विधि सांगितला आहे (नवप्रकरण १६४). पण 'आपला' म्हणजे वेधपूर्वक किंवा बोधपूर्वक अनुसरलेला, आणि हें करावयाचें तेंहि ' वचन-रूप परमेश्वराचें ' दास्य करण्यासाठीं. हें सर्व सांगितलें आहे त्यांत वचन-प्रामाण्य किती आहे तें, ' चर्चा करायची ती केवळ ब्रह्मविद्याशास्त्राची आणि तीहि त्या शास्त्रांतील वचनप्रामाण्याच्या दृष्टीनेंच करावी,' या वाक्यावरून कळून चुकेल. (एथौनि वारिले ते न कीजे की ।। तुम्हा एथौनि भणीतलेः ते करणीये की गा ।। २५३–२५४ ।। नवप्रकरण).

अशा रीतीने सर्वसंगपरित्याग ही परमेश्वरप्राप्तीच्या मार्गातील पहिली आणि अटळ पायरी आहे. ' परमेश्वराकडे साधकाचें सर्वस्व वेंचलें जाणें अत्यवश्य आहे. तो पूर्णत्वाने परमेश्वराचा होण्यासाठीं परमेश्वराव्यतिरिक्त इतर सर्व जीव-देवता-प्रपंचापासून आधीं मोकळा झाला पाहिजे... परमेश्वराव्यतिरिक्त इतर कशाचीहि आणि कुणाचीहि आशा आपल्या मनांत ठेवतां कामा नये... इत-रांच्याबद्दल दुःख करणें म्हणजे ईश्वराला सोडण्यासारखें आहे. ' हें ओळखून एखादा साधक वागूं लागेल, तो लोकांत जाणार नाहीं, पण लोक त्याच्याजवळ येऊं लागतील. म्हणून जनसंपर्क टाळण्याच्या दृष्टीने, आचरत्या पुरुषांनी मुद्दाम होऊन स्वच्छ आणि नीटनेटकें राहण्याचा प्रयत्न करूं नये ' कारण त्यामुळे आपणाला पाहून इतरांच्या मनांत विकार निर्माण होण्याचा संभव असतो. इत-केंच नाही, तर जाणूनबुजून असें राहण्याचा प्रयत्न करणें हाच मुळांत विकार आहे. लीसपूस करणें हें वेश्येचें काम आहे. साधकाच्या शरीरासंबंधीं स्वामींनी

सांगितलेला हा आचार त्याच्या वेषालाहि लागू पडतो'. (नवे वस्त्रः न नेसावे ॥ ७७ ॥ आचारमालिका).

चक्रधरांच्या चरित्रांत अर्थातच हीं तत्त्वें दृग्गोचर होतात. एकांकांतील ५० व्या लीलेंत ते एका गांवीं उकिरड्यांत निजल्यामुळे गांवांत काय झालें तें सांगितलेलें आहे. अशा रीतीने जेथे जेथे समाजाचा संबंध येतो त्या त्या गोष्टी निषिद्ध असल्याने उपजीविकेसाठीं केलेल्या व्यापारांबरोबरच, नवसादिक पुण्यक्रिया, यजन-याजन, दान-प्रतिग्रह, स्नानसंध्या, अघमर्षण, श्राद्धपक्ष, पर्वणी वगैरे विधि व ज्योतिष, वैद्यक आणि इतर अध्ययनअध्यापन या गोष्टीहि निषिद्ध व्हाव्यात यांत नवल कसलें !

पण हें सारें 'समाजसंपर्क नको' असें नकारात्मक वर्णन झालें. 'समाजापासून दूर राहिलें पाहिजे,' असें होकारत्मक वर्णनहि कांही कमी नाही. ज्या ठिकाणीं गेलें असतां लोकांना तो जिवंत आहे कीं मेला हें कळणार नाही, अशा ठिकाणीं साधकाने जावें असा आदेश आहे. (आपणेयाते कव्हणी नेणेः आपण कव्हणाते नेणिजे ऐसा स्थानी असावेः आचारस्थळ सूत्र २२). जन्म कुठें क्षेपावा ? तर 'देशाचा सेवटाः झाडाचा तळवटा देउळाचा कोनटा' अशा ठिकाणीं (आचारमालिका २१९). नेहमीं 'अटन करावें' म्हणजे भ्रमण करावें. शक्यतोंवर आडगांवींच राहावें. (तुम्ही पुरी पाटणीः न वसावे ॥२०॥ आचारमालिका). अशा परिस्थितींतहि लोकांशीं संबंध आल्यास विहिताचारासाठीं जेवढें बोलणें अगदीं केलेंच पाहिजे तेवढेंच करावें. इतर वेळेला 'दोही ओठां टाळे घालावें (आचारमालिका १९८)' हें होत नसेल तर इतरांचा संग टाळून निघून जावें. 'वायूप्रमाणे आणि अग्नीप्रमाणे साधकाने निराश्रय आणि निरालंब होऊन असावें,' असें एक ठिकाणीं म्हटलेलें आहे, (पाहा – नीरसाः निराशाः निराश्रया होउनि असावे ॥५३॥ नवप्रकरण), तर फक्त स्मरण करतां येण्याजोगी शक्ति अंगांत ठेवून त्याने प्रेतवत् व्हावें असें दुसऱ्या ठिकाणीं सांगितलेलें आहे. समाजापासून दूर राहायचें तें असें. (जीतेनिः मृताचा धर्मी वर्तावे ॥७४॥ नवप्रकरण).

बरें, अशा तऱ्हेने साधक समाजापासून दूर राहील पण तापत्रयाने पोळणारा समाज दूरवरहि त्याच्याकडे येण्याचा प्रयत्न करील. यावरहि उपाय आहेतच. 'स्वाभाविक रीतीने लोकांना टाळून ईश्वरध्यानासाठीं आणि आचारासाठीं एकांत

मिळवायचा असेल तर आपलें शरीर तुष्टपुष्ट न ठेवतां तें शुष्क करून सोडावें... (शरीर) अपवित्र करण्यासाठींच त्याने मसणांतील वस्त्र किंवा इतर कुचैळें वापरावीं'. मुंगीच्या पुरुषाचें वर्णन करतांना म्हटलेलें आहे, 'अनुसरलेल्या पुरुषाच्या मनांत पदार्थांची वासना जरी उद्‌भवली तरी त्याच्या शोष्यत्वामुळे, रंकत्वामुळें आणि मलिनत्वामुळे तो पदार्थ कोणाकडूनहि त्याला प्राप्त होऊं नये... पाहणाराला त्याची इतकी किळस यावी कीं, एक वेळ आपल्याजवळचा पदार्थ उकिरड्यावर फेंकून द्यावा, पण याला देऊं नये, असें त्याला वाटलें पाहिजे.' याचें आणखीहि विवेचन अन्यत्र आहेच. त्यांत साधकाने दैन्याभिभूत होऊन राहावें असें सांगितलेलें आहे. 'कुरूपता, निस्तेजता, वेंधळेपणा, मलिनत्व, कुचैलत्व वगैरे हीं मृत असल्यासारख्याचीं लक्षणें होत. साधकाने तीं अंगीं बाणवलीं पाहिजेत.' आपल्यापुढील लोकांस घृणा यावी असें नेसावे, वेड्यासारखें वागावें, केवळ मनुष्यमात्र होऊन असावें, असें स्पष्टीकरणहि पुढें जोडलें आहे. (तुम्हा घृणात्यागु होआवा की गा: लीलाचरित्र उत्तरार्ध ६). पण हें सर्व स्वनिष्ठ क्रियांच्या बाबतींत; परनिष्ठ क्रियांच्या वेळीं साधकाने यशरूप जिणें कंठावें. 'श्रीचक्रधरस्वामींवर हेमाडपंताचे लोक चालून आले त्या वेळीं भटोबास अशा पराक्रमाने लढले कीं, जणुं हा आतां सृष्टिसंहार करतो कीं काय असें वाटलें. हजारों लोकांना हरवण्याचें शौर्य त्यांच्या ठिकाणीं दिसलें. हें यशरूप जिणें होय...पण स्वनिष्ठ क्रियांच्या बाबतींत मात्र अशा रीतीने वागावें कीं, चालतांना आपल्या पायांखालील मुंगी मरूं नये. (मुक्तीची चाड: तेणे मुंगिचे वीरु न चिंतावे ॥ ६५ ॥ नवप्रकरण). इतकें दुबळेंपण त्यानें आपल्या अंगीं बाणवावे.' आतां, वरील शौर्याची आणि या दुबळेपणाची सांगड कशी घालायाची? शौर्य दाखवण्याचे प्रसंग कधींमधीं येणारे असतात. नेहमींचा आचार 'अंगीं दुबळेपणा बाणवावा' असेंच सांगतो. (हाडांची रांगवळी करावी नाएका ॥ ७७ ॥ कटंकटियेमान होउन असावें ॥ ७८ ॥ नवप्रकरण). तेव्हां हा विरोध आहे. जीव शरीरांतून जाणार नाही एवढीच काळजी घेऊन शरीर सुकवावें, हा ज्यांचा आदर्श ते यशरूप जिणें कसें जगणार?

समाजापासून अलिप्तता मिळावी म्हणून कसें वागावें एवढेंच सांगून हें तत्त्वज्ञान थांबत नाही, तर 'लोकांच्या उपयोगी पडूं नये' असें सांगतें. महानुभावांचें ब्रह्माचें वर्णन पाहण्याजोगें आहे. 'ब्रह्माच्या ठिकाणीं स्वरूपांव धर्म

असले तरी शक्तिरूप धर्म नाहीत. शक्तिरूप धर्म इतरांना दिले जाऊं शकतात आणि पुन्हा परतहि घेतले जाऊं शकतात. असे दिले-घेतले जाणारे धर्म, इतरांच्या उपयोगाकरितां कामी पडण्याजोगे धर्म ब्रह्मस्वरूपीं नाहीत. उदाहरणार्थ, ब्रह्मस्वरूप स्वतः नित्यमुक्त असलें तरी नित्यमुक्तत्वाचा शक्तिरूप धर्म त्याच्या ठिकाणीं नसल्यामुळे तें जीवाला ' कैवल्य ' करूं शकत नाही. तेव्हां ब्रह्मस्वरूप सर्वधर्मशून्य आहे याचा स्पष्ट अर्थ असा कीं, शक्तिरूप असे कोणतेहि धर्म ब्रह्मस्वरूपीं नाहीत. त्यामुळे एखाद्या बाह्यशक्तिहीन शेजाऱ्या-प्रमाणे ब्रह्मस्वरूप हें आपल्या शेजारीं असलेल्या ईश्वराच्या किंवा मायेच्या कोणत्याहि प्रकारें उपयोगी पडूं शकत नाही... शक्तिरूप धर्माप्रमाणे शक्तिरूप गुणदेखील ब्रह्मस्वरूपांत नाहीत. म्हणूनच त्याला ' निर्गुण ' असें म्हणतात. ब्रह्म-स्वरूप निर्गुण असल्यामुळे कोणत्याहि प्रकारचें कार्य तें स्वतः कधींच करत नाही... तें मायेपेक्षां वडील आहेच, पण ईश्वरस्वरूपाला निर्गुणत्वाने मान्य असल्यामुळे त्यालाहि तें वडील आहे. ' (म. त. प्र. ५).

लोकांच्या उपयोगी पडूं नये असें सांगण्यांत महानुभावांनी आपल्या डोळ्यांसमोर आपल्या या ब्रह्माचाच आदर्श ठेवला आहे असें वाटतें ! वर एके ठिकाणीं वर्णन केल्याप्रमाणे ' इंद्रियासी आहारु न द्यावा : प्राणासी आहारु द्यावा ' (नवप्रकरण ९७) व शरीर सुकवावें हा ज्यांचा आदर्श ते लोकांच्या काय उपयोगी पडणार ! पण याची त्याना खंत नाही. कारण लोकांच्या उप-योगी पडूं नये असेंच त्यांचें शास्त्र सांगतें. ज्यांच्या उपयोगी पडावें त्यांच्या क्रियांचे लेप लागतात, प्रत्येक क्रिया संतासंतमिश्र असते (क्रिया उभयरूपा : विचार २०६). हें सर्व पुढें फेडावें लागतें. कारण पाप व पुण्य या दोन्हीचाहि क्षय होईल, तेव्हांच मुक्ति मिळावयाची आशा ! म्हणून ' अप्रिय बोलूं नये, प्रिय बोलावें ' अशीं वचनें आहेत, पण महानुभावांव्यतिरिक्त इतर पुरुषांशीं, उपयोगी न पडतां, प्रिय बोलत असावें, असें सांगितलेलें आहे. मुलांना जन्म देऊन पितृऋण फेडावें, समाजाच्या उपयोगी पडावें, असें म्हटलें तर महानु-भावांच्या मतें एकदां स्त्रीशीं संबंध केल्यानंतर बाकीचे संबंध उष्टे होतात व अर्थातच ते गर्ह्य बनतात. (यंत्रारूढा होइजे : तो उसीटा विखो भोगणे की : १९४ विचार). आचरत्या पुरुषांच्या दृष्टीने तर स्त्रीसंबंध हें पापच होय. एखाद्या प्रसंगाकडे कौतुकाने पाहून कोणास उत्तेजन देऊन उपयोगी पडावें

म्हटलें तर तसें पाहणें हा तर फार मोठा विकार मानला आहे. कोणी जर असें म्हणेल कीं, आपण लोकांचा उद्धार करूं, तर तें शक्य नाही. कारण, 'कृपाशक्ति मिळाल्यास आपण आतां ईश्वर बनलों असें जीवास वाटेल, आपणाला अशक्य अशा जीवोद्धरण कार्याकडे तो वाहवेल आणि त्यामुळे साध्यानंदाला तो अंतरेल. म्हणूनच जीवाच्या कणवेमुळे परमेश्वर त्याला कृपाशक्ति देत नाहीत. (दयाः मयाः कृपाः करुणाः हे ईश्वरीचि आति ॥ १२१ ॥ विचार). त्यामुळें परमेश्वराकडे वंचकपणाचा दोष येत नाही,' असें याविषयीं म्हटलेलें आहे.

परमेश्वरप्राप्तीचे मार्ग दोनः ज्ञानमार्ग व प्रेममार्ग. 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' हें वचन पूर्वी उद्‌धृत केलेंच आहे. या वचनास अनुसरून ज्ञानियांना प्रेमाचे अनेक उपाय सांगितलेले आहेत. शुश्रूषा करणें, सेवादास्य करणें वगैरे उपाय त्यांत आहेत; पण ते फक्त ज्ञानियांच्यासंबंधानेच होत. पंथांत येऊं घातलेल्यांना किंवा नुकत्याच आलेल्यांना काय, तें स्पष्ट नाहीं. शास्त्र सांगणें वगैरेहि उपाय त्यांत आहेत; पण ते पंथाबाहेरच्या लोकांसाठीं नाहीत हें उघड आहे. 'दुष्काळीं भवन घालणें' तें कोणासाठीं हें स्पष्ट नाही; संदर्भ ज्ञानियांचा व आर्तांचा आहे. 'देवतांना शरण जाऊं नये' या मुद्द्याखाली 'वैद्यकीचें किंवा ज्योतिषादिकाचें ज्ञान वापरून स्वसंरक्षण करूं नये,' असें म्हणून पुढें 'आपल्या संबंधीयासाठीं जो साधक असे उपद्रव सहन करतो तो तर नरकाचेंच साधन जोडतो,' असें म्हटलेलें आहे.

अशा रीतीने, लोकांच्या उपयोगी पडूं नये, इतकेंच नव्हे, तर परोपकार न करण्याविषयी महानुभावांचा आग्रह आहे. 'मसणाच्या लांकडाहून हीन जिणें' या मुद्द्याखालीं म्हटलें आहे, 'परमेश्वराकडे सर्वस्व अर्पण करतां येण्यासाठीं साधकाने आपलें आयुष्य लौकिकाच्या दृष्टीने अत्यंत हीनपणें, शोच्यपणें कंठलें पाहिजे...'त्याने प्रेतवत् असावें हें आपण मागे पाहिलें. 'एका दृष्टीने त्याने मसणांतील लांकडांपेक्षांहि हीन जिणें जगलें पाहिजे असें म्हणतां येईल. मसणांतील लांकूड हें प्रेतासारखेंच बाटलेलें असतें. कुणी त्याला स्पर्शसुद्धां करीत नाही. पण तेंहि अघोरपंथीयांना, अभिचारकांना, म्हणजे कूड मांत्रिकांना उपयोगी पडतें. परमेश्वरसाधकाने लोकांच्या तितकेंहि उपयोगी पडूं नये. उदाहरणार्थ, अनुसरलेला पुरुष आपला आचार करीत असतांना त्याला कोणीं रस्ता विचारला तर तोहि त्याने सांगूं नये. तिकडे त्याचें

लक्षच असतां कामा नये. कारण रस्ता विचारणारा गृहस्थ आपण सांगितलेल्या रस्त्याने जाऊन एखाद्या माणसाची हिंसा जर करील तर, किंवा त्या रस्त्यांत सर्पव्याघ्रादिकांनी तो मारला गेला तर, त्या हिंसेला निमित्तकारण तो साधकच होणार...याचसाठीं त्याने दुसऱ्याच्या भानगडींत सडेतूनेहि पडूं नये, हें चांगलें.' या नियमाने एखाद्या चांगल्या गोष्टींत अडथळा येण्याचीहि तितकीच शक्यता नाहीं काय ? पण महानुभावांना चांगलेंसुद्धां करायला नको आहे कारण 'सृष्टीमध्यें जेतुलेही जीवु करी : तेतुलेनि काइसेनिही मुंचेनाः एकवाचौनि;' ॥२६७॥(विचार.).' आग्रह ' हा शब्द जो या परिच्छेदाच्या प्रारंभीं वापरला आहे, त्याचें प्रयोजन पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होईल :

'अनुसरलेल्या पुरुषानें आपण जिवंत असतांना इतरांच्या उपयोगी पडूं नये; इतकेंच नाही, तर मेल्यानंतरहि कुणाच्या उपयोगी पडूं नये. मेल्यानंतर आपल्या देहाला किडामुंगी लागली तर त्यांना तो खायला मिळेल. हेंहि उपयोगी पडणेंच होय. त्यामुळे त्यांच्या देहाभिमानी देवतांचें संत अर्जिलें जाईल व तीं संतकर्में पुढे अपरोक्ष ज्ञानांत क्षाळावीं लागतील. ' प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम् ' या न्यायाने अनुसरलेल्या पुरुषाने आधींच आपला देह इतका सुकवून ठेवावा कीं, किडामुंगीलासुद्धां त्यावर मांस सांपडूं नये. इतकें करणें अवश्य आहे. ' (मसनीचे लाकूड तेहि वरि उपयोगा जाएः परि आपण कवणाचे उपयोगा न वचावे ॥ ५९ ॥ नवप्रकरण).

हें विवेचन वाचल्यानंतर, कांही विद्वानांच्या मताप्रमाणे, ' महानुभाव महंत समाजाला भिऊन लांब राहिले ' असें म्हणण्यापेक्षा, ' त्यांच्या तत्त्वज्ञानानेच त्यांना दूर राहणें भाग पाडलें ' हें म्हणणें सयुक्तिक आहे हें सहज दिसून येत नाही काय ? दुसऱ्या कांहीं विद्वानांच्या मतें, महानुभावांनीं संन्याशांची संघटना केली. याहि मताचा पुढीलप्रमाणे विचार केला असतां 'महानुभाव व्यक्तिनिष्ठ होते ' हाच विचार स्पष्ट होईल, असें वाटतें.

एकांतावर महानुभावांची फार प्रीति होती. त्याचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केलेलें आहे : ' जीव अज्ञान व मतित्रयानें युक्त असल्यामुळें त्याच्या हातून कोणत्या वेळीं कोणतें दुष्कर्म घडेल कांही सांगतां येत नाहीं. म्हणूनच अनुसरलेल्या जीवाने लौकिक दृष्टया कर्मरहाटीच्या जीवांच्या संबंधांत येऊंच नये. याचसाठीं तर श्रीचक्रधरस्वामींनी साधकाला सर्वसंगपरित्याग करून अटनविजन करीत देशाच्या

शेवटीं जाऊन कांटेरी झाडाखालीं परमेश्वरस्मरण करायला सांगितलें आहे.'

एकांताप्रमाणेच एकलेपणावरहि महानुभावांचा भर आहे. भ्रमंती करावयाची ती एकट्याने. कारण, 'बहुतांचा मेळी। एकमेकेसी उपजे कळि। दोघा असता जवळी। गोष्टी घडे' (उद्धवगीता). याच काव्यांत पुढें म्हटलेलें आहे; 'दुजेयाचा संगी। पडे स्नेहाची वज्रांगी। गोष्टी मातु करी वाउगी। वेळु फेडावया। ...म्हणौनि एकाकिता निःसंगी। साधावी वीतरागी।' जो साधक एकटाच अटन-विजन करतो तो असती परी उत्तम रीतीने आचरून विजयी होऊं शकतो. चक्रधर 'हे एकाकी असेल' असा आग्रह अनेकवार धरीत (लीळाचरित्र: पूर्वार्ध १०७-११३) व कोणीं जाऊं न दिल्यास भांडून किंवा रुसून जात. (एकांक ५२). 'एकला विजया' असें श्रीचक्रधरस्वामींनी म्हटलें आहे (आचारमालिका १३१). 'त्यामुळे इतर जीवांचें आलंबन सुटून विकारविकल्पादि दोष चुकावे हाच मुख्य हेतु असतो'. याला अपवाद म्हणजे ज्यांना हें शक्य नाही ते आणि स्त्रिया ह्यांचा; अर्थातच हा कनिष्ठ मार्ग होय. एकटेपणाने नित्य अटन करणें हाच श्रेष्ठ मार्ग. 'हा एकलेपणाचा कंटाळा मधूनमधून कां होईना, पण झाडून टाकणें अवश्य ठरतें. त्यासाठीं साधकाने प्रसंगोपात्त ज्ञातविरक्त पुरुषांचा संग जोडणें निषिद्ध ठरत नाही', त्यांतहि 'सहज भेट उत्तम', शक्यतोंवर मुद्दामहोऊन नको.

'संग' म्हणजे आपण दुसऱ्याजवळ राहणें आणि 'सांघात' म्हणजे दुसऱ्याला आपल्याजवळ ठेवणें. साधकाने एखाद्या उत्तम चर्यावंताचा किंवा अधिकरणाचा 'संग' करायचा असतो तो त्याच्यापासून वैराग्याचे धडे शिकण्यासाठीं, आणि एखाद्या अधिकरणानें साधकाला 'सांघात' द्यायचा असतो तो त्याला शास्त्र घोकवण्यासाठीं (उजळलेयाचि संगे। मैळला उजळे ॥२०३॥ नवप्रकरण). पण संघ, सांघात यांचा भेट व शुश्रूषा या गोष्टींबरोबर निमित्तविधींत समावेश होतो; नित्य विधि अटन-विजन, भिक्षाभोजन स्मरणप्रसादसेवा आणि निद्रा हेच आहेत. बरें, असा निमित्तविधी म्हणून भेट झाल्यानंतरहि 'त्यांनी फार तर पांचसात (१२) दिवस एकत्र राहावें. तदनंतर आपापल्या मार्गाने निघून जावें. (नवप्रकरण १३४). (एकमेकांना सोडून जावेंसें वाटणार नाही असें) प्रेम किंवा द्वेष निर्माण होत आहे असें दिसून आल्यास दोघांनीहि परस्परांचा एकदम त्याग करून निघून जावें.. पर-

स्परांच्य भक्तिज्ञानवैराग्यादि गुणांची आवड असेपर्यंत एकत्रित राहावें.' अच्युतगोत्रीयांची परस्परांवर प्रीति पाहिजे, असें चक्रधर म्हणतात. पण 'कित्येकांना तर भेटीचा पहिलाहि क्षण दुर्लभ वाटत नाही. त्यांनी एकमेकांच्या सहवासांत यत्किंचित् राहूं नये. तावडतोब विभाग करून निघून जावें. नाहीतर अर्थातच अनिष्ट उपजेल.' हा संग करावयाचा तोहि विधिपालन म्हणून. 'त्या संगासाठीं—विधिपालनासाठीं—फार झालें तर भिक्षूची एक वेळ प्रार्थना करावी. पण त्याजवर नेहमीं अवलंबून राहूं नये. एक वेळ प्रार्थना करावयाची तीहि विधिभंगाचा दोष टाळण्यासाठीं'. बाकी सर्व परमेश्वरासाठीं. कारण सर्व त्याचेंच मानावें.

'झोळीहि परमेश्वराचीच मानावी.' हा परिच्छेद वाचल्यानंतर महानुभावांना संन्याशांचाहि समाज, समुदाय नको होता ही गोष्ट उघड होते. ज्याला कोणतीहि आशा राहिलेली नाही त्याला समाजाची भीति बाळगण्याचें व म्हणून त्याच्यापासून दूर राहण्याचें काय कारण आहे ? समाजानें जास्तींत जास्त काय केलें असतें ? मारलें असतें. पण या बाबतींत 'मारिता पूजिता समान होआवा की' एवढेंच सांगून चक्रधर थांबत नाहीत तर 'मारणाऱ्यापुढें आपलें डोकें करावें' असेंहि सांगतात. (नवप्रकरण ६३, ६४). त्यांच्यावर सैनिक चालून आले असतां 'हे मुनीच आले आहेत कीं', असे उद्गार त्या पुरुषश्रेष्ठाने काढले.

तेव्हां समाजाला भिऊन महानुभाव दूर राहिले, असें वाटत नाही. त्यांना कोणत्याहि स्वरूपाचा समाज नकोच होता. त्यांना संन्याशांचीहि संघटना करावयाची नव्हती. संन्याशांची संघटना करून त्यांना काय मिळवायचें होतें ? मोक्षपदावर तर स्वारी करायची नव्हती ! तेव्हां महानुभाव समाजनिष्ठ नव्हते तर व्यक्तिनिष्ठच होते असें दिसून येईल. 'महानुभाव आचारधर्म' या ग्रंथांतील एका प्रकरणाचें शीर्षक 'संग : सांघात' असें असल्यामुळें 'महानुभावांना संन्याशांची संघटना करावयाची होती' असें वरवर पाहून वाटतें हें खरें; पण त्याचा तपशील पाहून महानुभाव नुसते व्यक्तिनिष्ठ नव्हते तर अतिरिक्त, विलक्षण व्यक्तिनिष्ठ होते असेंच कोणीहि म्हणेल आणि ही व्यक्तिनिष्ठा महानुभाव तत्त्वज्ञानांत कशी सर्वांगीण आहे तेंहि—पूर्वी सुचविल्याप्रमाणे—कळून येईल.

यावर कोणी विचारील, "श्रीचक्रधरांचा अवतार सर्वश्रेष्ठ होता कारण त्यांना जीवोद्धरणाचेंच काय तें व्यसन होतें; आणि त्यासाठीं ते लोक आपल्या-

कडे येण्याची वाट न पाहतां लोकांकडे जात होतेच की नाही? त्याचप्रमाणें आपल्या शिष्यांत खोटीं भांडणें लावणें, त्यांना द्वंद्वें करावयास सांगणें आणि इतर खेळ करून घेणें वगैरे गमतीच्या गोष्टी ते करीत; त्यावरून त्यांना लोकांनी एकत्र यावें, लोकांचा सहवास असावा असें वाटत असल्याचें दिसत नाही काय? आणखी असें की, पुनः पुन्हा घेतल्या जाणाऱ्या भोगास त्यांनी उष्टें म्हटलें असेल, पण योग्य विशिष्ट तऱ्हेने ठेवलेला संबंध पापरूप नव्हे, असें सांगून त्यांनी प्रापंचिकांना संसार करण्यास पाठिंबाच दिलेला आहे, असें म्हटलें पाहिजे."

यांतील पहिल्या मुद्द्याचें उत्तर असें की, ही जीवोद्धाराची कामगिरी फक्त परमेश्वर किंवा त्याचा अवतार करूं शकतो. 'पात्रापात्रता किंवा योग्यायोग्यता न पाहतां, कृतकर्मांकडे लक्ष न देतां, लहानमोठा न म्हणतां, प्रत्युपकाराची अपेक्षा न करतां एखादी वस्तु कायमची देऊन टाकणें, तिच्यावरील आपला हक्क काढून घेऊन ती सर्वस्वीं दुसऱ्याला देणें, याला दान किंवा औदार्य असें म्हणतात. हा औदार्याचा गुण फक्त परमेश्वराच्या ठिकाणीं आढळतो, जीवदेवतांच्या ठिकाणीं आढळत नाहीं. या गुणाप्रमाणेच दया, मया, कृपा आणि करुणा हेहि गुण फक्त ईश्वराच्याच स्वरूपीं आहेत.' चक्रधर स्वतःस परमेश्वराचा अवतार म्हणवीत असत, त्यामुळे त्यांच्या अंगीं जीवोद्धार करण्याचें सामर्थ्य होतें. जीवांच्या ठिकाणीं तें नसतें याचा उल्लेख मागेहि एकदां आला आहेच. जीवोद्धार करण्यासाठीं लोकांत मिसळायचें तें परमेश्वराने किंवा त्याच्या अवताराने; दुसऱ्या कोणीहि नव्हे. 'परमेश्वराच्या दानाला पात्र होण्याला जीवाने थोडी तरी क्रिया जोडलेली असली पाहिजेच,' ही अट वाचली व परमेश्वरप्राप्तीसाठीं सर्वसंगपरित्याग आवश्यक आहे ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे महानुभाव तत्त्वज्ञानाचा कांटा समाजनिष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठेकडेच झुकत असल्याचें मान्य करावें लागेल.

'कर्माप्रमाणेच अनुसरतांना ज्ञानियाने द्वादश धर्मांचाहि त्याग करणें अवश्य आहे.' ते द्वादश धर्म पुढीलप्रमाणेः—(१) देशधर्म, (२) ग्रामधर्म, (३) जातिधर्म, (४) कुळधर्म, (५) वर्णधर्म, (६) आश्रमधर्म, (७) पुराणधर्म, (८) आगम धर्म, (९) प्रवृत्तिधर्म, (१०) निवृत्तिधर्म, (११) युगधर्म, (१२) राज्यधर्म यांशिवाय विधिविषयांचाहि त्याग आवश्यक आहे. (पहा—कर्मः धर्मः विधिः विखोः परित्यजोनि परमेश्वरा शरण रिगावे. ।। ५६ ।। नवप्रकरण). त्यांचा

उल्लेख मागे केलाच आहे. म्हणजे परमेश्वरावतार लोकांकडे जातो तें त्यांना ह्या गोष्टी करण्यास सांगण्यासाठीं ! 'आईला आपल्या मुलाविषयीं जसें ममत्व वाटतें तसेंच परमेश्वराला सर्व जीवांविषयी वाटतें. जीवाला पाहतांच तें ममत्व उचंबळून येतें. ' आई मुलाला पाहतांच काय करील ? तर लगेच त्याला जास्तींत जास्त आनंद देईल. पण परमेश्वर काय करतो ? ' म्हणूनच त्याच्या उद्धारासाठीं परमेश्वर सृष्टिरचना करतो, स्वतः अवतार धारण करतो आणि त्याला ज्ञान किंवा प्रेम देऊन तो उद्धरणाच्या मार्गाला लागेल असे योगायोग घडवून आणतो. ' या ज्ञान व प्रेममार्गाचा निरनिराळ्या संदर्भांत वर विचार केला आहेच. पहिल्या मुद्द्याचा विचार येथे पुरा होईल. दुसऱ्याचें उत्तर असें कीं, चक्रधर स्वतः खेळ खेळण्यास सांगत असल्याने खेळ खेळणाऱ्या जीवांची कर्में नाश पावत असत. खेळामध्यें परमेश्वराची आज्ञा ही खेळापेक्षा महत्त्वाची असे. तेव्हां चक्रधरांनी समाजाशीं संबंध यावा म्हणून खेळ खेळण्यास सांगितलें असें नाही. चक्रधरांच्या आज्ञेवांचून खेळ खेळणाऱ्यांचीं कर्में नाश पावणार नाहीत, ही गोष्ट अर्थातच उघड आहे.

तिसऱ्याचें उत्तर असें कीं, संसार करण्यास अशा रीतीने सवलत दिली असली (पहा—गोसावी ग्रहस्थधर्म नीरूपीले—लीलाचरित्र भाग ४ पूर्वार्ध खंड ३) तरी ती सर्वांना नव्हे. एवढेंच नव्हे, तर वरील विवेचन लक्षांत ठेवणाऱ्यास हें कळून चुकेल कीं, संसारांत गुरफटण्यापेक्षा संसार सोडण्यावरच महानुभाव तत्त्वज्ञानाचा सर्व भर आहे. सवलत म्हणजे आज्ञा किंवा पुरस्कार नव्हे. आदर्श आहे तो सर्वसंगपरित्याग करणाऱ्यांचाच. या त्यागांत इतर नाना गोष्टींप्रमाणेच बऱ्यावाईट सर्व मानवी भावना येतात हें आपण मागे पाहिलेंच.

या विवेचनावरून महानुभावांचें तत्त्वज्ञान पूर्णपणें व्यक्तिनिष्ठ आहे, हा मुद्दा सिद्ध होईल असें वाटतें. ही व्यक्तिनिष्ठा त्यांच्या तत्त्वज्ञानांत कां आली आणि ती महाराष्ट्राच्या मनोवृत्तीशीं विसंगत कशी आहे असे प्रश्न हा लेख वाचून होतांच मनापुढें येतात. या प्रश्नांचें उत्तर एक स्वतंत्र लेख लिहून देण्याचें योजिलें आहे. तो लेख वाचल्यानंतर महानुभावांचें तत्त्वज्ञान अपरिहार्यपणेंच व्यक्तिनिष्ठ आहे हें स्पष्ट होईल आणि महानुभावांच्या पराभवास ते स्वतःच कारण झालेले आहेत हेंहि दिसून येईल.

● ● ●

— १ —

महानुभाव

(उत्तरार्ध)

महानुभावांची व्यक्तिनिष्ठा आणि समाजनिष्ठ महाराष्ट्र

महानुभावांच्या तत्त्वज्ञानांत अक्षरशः जगावेगळी व्यक्तिनिष्ठा कां आली असावी या प्रश्नाचा विचार या लेखांत प्रथम करावयाचा आहे. या प्रश्नाचें उत्तर फक्त एका शब्दांत देतां येतें. तें म्हणजे 'द्वैत'. महानुभाव पक्के द्वैती आहेत. 'जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर ह्या चार भिन्न आणि नित्य वस्तू होत. या चारहि वस्तूंमध्ये पूर्णपणें भेद आहे; द्वैत आहे. त्यांपैकीं कोणत्याहि दोन किंवा अधिक वस्तूंचें ऐक्य कोणत्याहि स्थितींत केव्हांहि होणें शक्य नाही.' (म.त.प्र. १). जीवेश्वरसंबंधाच्या दृष्टीने महानुभाव तत्त्वज्ञान हें द्वैताचें तत्त्वज्ञान असल्याचें दिसून येतें. (पहा—जीव जीवा साजात्यः हें सकळांही वैजात्य ॥१२७॥ विचार).'जीवेश्वरा स्वामीभृत्यसंबंधु हा अनादीचा,' (१२४ वि.) म्हणून नित्यहि आहे. महानुभाव पंडितांनी अद्वैताचें खंडन करून द्वैतमत पुढें मांडलें आहे. जीवस्वरूपाचें विवेचन पुढीलप्रमाणे केलेलें आहे : " जीव अनेक आहेत. अनादि आणि नित्य अशी ही जीव वस्तु 'एकु' असली (म.वा.२) तरी ती फक्त जातित्वाने. म्हणजे देवता-वर्ग ही ज्या अर्थाने 'एक' वस्तु आहे, त्याच अर्थाने जीव-वर्ग ही 'एक' वस्तु आहे. पण वस्तुतः अनादि आणि नित्य असे जीव 'अनेक' आहेत." (पहा—तरी एकु का म्हणितलेः ना हे एकवचनी बहुवपर्णः जीवाची रासि एक म्हणौनि एकु म्हणितले। जैसे मिरी, पोफळ, आलें, म्हणितलेया काइ एक

मिरी, पोफळ, आलें होए नाः हे एकवचनी बहुवपणः म्हणौनि एकु आति म्हणितले—म. वा. प्र.) ' अनंते ब्रह्मांडेः अनंता देवताः अनंत जीवुः अनंत परमेश्वरुः' (वि. २१२) या सूत्रांत गणनेच्या दृष्टीनेच जीवांचें अनंतत्व म्हणजे अनेकत्व सांगितलेलें आहे.

या जीवांचें आणखीहि पुढीलप्रमाणे केलेलें वर्णन आढळतें: " अशा असंख्य जीवांचीं स्वरूपें आपापल्या मर्यादेने मूळ सृष्टीपूर्वी तमोविभागांत सुखदुःखरहित स्थितींत पडलेलीं होतीं; त्यांत तीं हरपून गेलेलीं होतीं. विशाल समुद्रांत ज्याप्रमाणें असंख्य जलचर प्राणी निमग्न झालेले असतात तद्वत् अनंत ब्रह्मांडीं घातले जाणारे जीव तमोमायेच्या स्वरूपांत हरपून गेलेले होते. अर्थात् आपापल्या स्वरूपमर्यादेने ते त्या ठिकाणीं असतांना एकमेकांना व्यापून नव्हते, तर एकमेकांपासून दूर होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जीवाचें स्वरूप स्थूल मानाने या प्रकारचें आहे." (म. त. प्र. २). हें वर्णन वाचून जीव अनंत होते व त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नव्हता, हा मुद्दा स्पष्ट होतो. अद्वैत तत्त्वज्ञानामध्ये सर्व जीव हे ब्रह्माचेच अंश असल्याने त्यांचें एकमेकांशीं अत्यंत दृढ नातें असतें. तें अर्थातच महानुभावांना संमत नाही. अद्वैत तत्त्वज्ञानी स्वतःस ब्रह्म म्हणतो आणि दुसऱ्यास ' तूंहि तेंच आहेस ' असें म्हणतो. महानुभावी स्वतःस एक जीव म्हणतो व दुसऱ्यास दुसरा एक जीव म्हणतो; दोघांत एकत्व असण्याचें कांही कारण नाही. अद्वैत तत्त्वज्ञान्याला साहजिकच इतरांशीं आत्मभावनेने वागावें हें सांगण्याचें कारण पडत नाहीं.

मग महानुभावांनी एकमेकांशीं कसें वागावें ? तर त्यांनी " इतरांना अभय द्यावें. सर्व प्राणिमात्रांची शारीरिक, मानसिक व वाचिक हिंसा चुकवावी. (बाइ प्राणियांचेया इष्टा आड न एइजे कीं ।। २३४ ।। हिंसा वर्ते तिये स्थानीं महात्मेया असो नये ।। २४० ।। हे करी तेया नरकुः धरी तेया नरकुः एक एका दे तया नरकु ।। २४१ ।। एथीची सेवाः ते भूता अविरोधे करावी की गा ।। २४३ ।। नवप्रकरण–चक्रधरोक्त सूत्रपाठ)—यासाठीं त्याने जीवमात्राच्या ठिकाणीं सर्वात्मक ईश्वर व्यापलेला आहे हें मनांत आणावें. आपण कोणालाहि दुखवलें तर त्यामुळे जणूं कांही परमेश्वरच दुखावला जातो असें मानावें. " (म. आ. प्र. ७). या ठिकाणचे ' मनांत आणावें ' व ' मानावें ' हे शब्द मनांत आणले म्हणजे तावडतोब कळतें कीं, अहिंसा-

धर्माची महति सांगण्यासाठीं 'अशी कल्पना करा' असें सांगणें महानुभावांना भाग पडलें आहे. महानुभाव दुसऱ्यांचें कांहींहि लागत नाहीत. प्रत्येकाने आपल्या संतासंत कर्माचा क्षय करावा, असें त्यांचें म्हणणें. हें केलें म्हणजे झालें. दुसऱ्या जीवासाठीं कांहीं करायला गेलें कीं 'प्रत्येक क्रिया संतासंतमिश्र असते' या न्यायाने क्रियाकर्में आणि त्यांचे विकटणारे गुण वाढत चाललेच, व मोक्ष दुरावलाच. तेव्हां दुसऱ्यासाठीं कांहींहि न करणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य होय.

हें झालें स्वतः दुसऱ्यांविषयीं काय करावें याविषयी. दुसरा कोणी त्रास देऊं लागल्यास काय करावें? "इतरांनीं दिलेलें दुःख सोसावें हा सर्वश्रेष्ठ आचार. आपला अपराध असो, नसो, पण प्रतिकूल पुरुषांनी दिलेलें शारीरिक व मानसिक दुःख सहन करणें, त्यासाठीं आपलें शरीर पुढें करणें," हा महानुभावांचा आचारधर्म होय. (म. आ. प्र. ७) कारण जितके अधिक कष्ट सोसावे तितका अधिक कर्मनाश होतो. यासाठींच आत्मघात करूं नये; एवढेंच नव्हे, तर आत्मघात लांबवावा आणि जास्तींत जास्त वेदना सहन कराव्या, 'आया बापो' न उच्चारतां सोसाव्या, असें त्यांचें शास्त्र सांगतें. (आत्मघातकियासि कव्हणी ठावो नाही नाएका ।। ६९ ।। विचार).

इतके कष्ट करणें जिवाला अपरिहार्य आहे; कारण अविद्याबंधाचें दृढत्वच तसें असतें. 'जीवस्वरूपींची अविद्या वज्रकीटकीप्रमाणे आहे. तिचा नाश करण्यासाठीं जीव अनेक उपाय करतो; पण त्यामुळे त्याच्याकडून अधिकाधिक प्रमाणांत नरकच जोडले जातात. परमेश्वर आपल्या कृपादृष्टीच्या अणीने जेव्हां तिचा छेद करतील तेव्हांच तिचा नाश होऊं शकतो; एरवीं नाही. जीवस्वरूपाला लागून असलेला अविद्येचा बंध इतका घनिष्ट असतो.' असें अन्यत्र म्हटलें आहे.

या उलट जर कोणी आनंदासाठीं विषयसुखाच्या मागे लागेल तर 'पुरुषु जेतुल जेतुली विषयसेवा करी तेतुल तेतुला धर्मी निबळ जाय' असा स्पष्ट इषारा दिला आहे. 'जडपदार्थांच्या निरंतर सेवनाने जर इतकी अदक्षता येते तर चेतनपदार्थांच्या म्हणजे स्त्रीच्या उपभोगाने व सेवनाने किती येत असेल, याची कल्पनाच करावी! (यांत कोठें अनैतिकतेचा उल्लेख नाही. तरी पण...) त्याने (म्ह. अनुसरलेल्याने) उपरति करून अधिकवृत्तीचें

आचरण केलें तर देहविद्या, समानवृत्तीचें आचरण केलें तर देवतादि फळें होतात-हें खरें; पण या सृष्टीत त्याला मोक्ष मात्र मुळींच मिळूं शकत नाहीं. त्या दृष्टीने तो कायमचा दुबळा झाला म्हणायचा.' आणि मनुष्यहिंसा केली तर 'ज्याने हिंसा केली त्याला व ज्याची हिंसा केली त्याला अशा दोघांनाहि ...तेरा नरक भोगावे लागतात.' दुसऱ्याचें अंतःकरण दुखवल्यानेहि हिंसा घडते, ही गोष्ट लक्षांत टेवली पाहिजे. (म. त. प्र. ९). (चहुं युगीं हिंसा अधर्मु ॥ ४४ ॥ विचारमालिका).

अशा रीतीने महानुभावांच्या व्यक्तिनिष्ठेच्या मुळाशीं त्यांचें द्वैताचें तत्त्वज्ञानच असलें पाहिजे, ही गोष्ट स्पष्ट होते. महानुभावांच्यांत एकमेकांशीं संबंध असणार तो फक्त तत्त्वज्ञानापुरता. 'एक विचारसरणी' एवढेंच महानुभावाचें महानुभावांशीं नातें. ही विचारसरणी अंगिकारण्यासाठीं व ती पुढें चालू ठेवण्यासाठीं जेवढ्या गोष्टी करणें अटळ आहे, तेवढ्यावरूनच त्यांना 'पंथ' म्हणावयाचें. बाकी सर्वत्र व्यक्तिनिष्ठा. अशा या व्यक्तिनिष्ठ पंथाचें ध्येय काय होतें, त्या ध्येयाचें स्वरूप कसें होतें आणि तें मिळवावयाचे मार्ग कोणते, हे प्रश्न आतां ओघानेच येतात.

मोक्ष हें त्यांचें ध्येय आहे. त्यासाठीं अनुसरण केलें पाहिजे. अनुसरण म्हणजे चक्रधर सांगतील त्याप्रमाणेंच वागणें. "सर्वसंगपरित्याग केल्यामुळेच स्वातंत्र्याचा मोक्ष अधिकाधिक जवळ येतो. त्याप्रमाणें, ज्ञानियानें आता सर्वस्वाचा पाश तोडून परमेश्वरानुसरण केलेलें असल्याने त्याचींहि कांही बंधनें तुटून पडतात. ज्ञानियाला ब्रह्मप्राप्तीचा मोक्ष मिळविण्यासाठीं सर्व मळकर्मांतून मोकळें व्हावें लागतें. त्याशिवाय तो परमेश्वराच्या कृपेला पात्र होत नाही. त्याच्या ठिकाणचे जीवधर्मरूपी मळ (षड्रिपु, तोष, खंती, हर्ष, विषाद, वगैरे) आणि कुत्सितकर्म (अनुचित क्रिया, विषयांचे उल्लेख, अनुचित पुरुषांचा समागम) हीं नाहींशीं होऊन त्यानें अस्तिपरीचें नीट आचरण केलें तरच परमेश्वर त्याला पुढील अपरोक्ष ज्ञान देतात. ही अस्तिपरी त्याला नीट आचरतां यावी म्हणून त्याच्या कर्मांची त्रिविधता सुरू होते. म्हणजे असें कीं, त्याचीं आगंतुक कर्में कुंठित होतात, अनारब्ध कर्में सुकून जातात; पण प्रारब्ध कर्मांचा मात्र त्याला भोग भोगूनच नाश करावा लागतो. अनुसरलेल्या ज्ञानियानें केलेल्या सर्वस्वत्यागाचें जणूं हें फळ परमेश्वर त्याच्या तावडतोब पदरांत

टाकतो...आवडपूर्वक अनुसरण असलें तर चौकडी नासते; एरवीं नाही.' (म. त. प्र. ११). प्रेम मार्गाने जाणाऱ्या भक्ताच्या हातून या गोष्टी आपोआप घडत जातात. साहजिकच आहे, एकदां वृत्ति निश्चित झाली म्हणजे सर्व गोष्टी तिला अनुसरूनच घडणार. परमेश्वर मोक्ष देतो. तो ज्ञानियाला पाठीशीं घालतो, भक्ताला पोटाशीं धरतो. दोघांनाहि असें निकट सन्निधान मिळतें; पण तें या फरकानें. यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल कीं, मोक्षांतहि महानुभावांची व्यक्तिनिष्ठा कायमच आहे; इतर तत्त्वज्ञानांतील घटाकाशाच्या आकाशांतील किंवा मिठाच्या खड्याच्या पाण्यांतील लोपाप्रमाणे इथे कांहीहि लोप पावत नाही. महानुभावांचें द्वैत व व्यक्तिनिष्ठा मोक्षांतहि स्वतःसिद्ध आहे.

या द्वैतामुळे व त्यास अनुषंगाने येणाऱ्या व्यक्तिनिष्ठेमुळेच कीं काय, महानुभावांच्या मोक्षाच्या कल्पनेस अनेक मर्यादा पडल्या आहेत. 'अहं ब्रह्मास्मि' असें म्हटल्याने जीवाला ब्रह्मापुढें न्यूनगंड वाटण्याचें जें कारण उरत नाही, तें द्वैताच्या कल्पनेमुळे वाटतें, असा तर्क संभवतो. (पहा—जीवु सर्व दोषांचे आळे ॥ २०२ ॥ विचार). महानुभावांची 'प्रसादाची प्रार्थना' वाचल्यावर हा तर्क बळकट होतो. ते प्रार्थनेंत म्हणतात, "ईश्वरा, तुझा जयजयकार असो. सच्चिदानंदस्वरूप देवा श्रीचक्रधरा, मी अनादिकाळापासून अपवित्र आहे. अज्ञान आणि अन्यथा ज्ञान यांनी मी अपवित्र झालों आहें. स्वोक्ति, शास्त्रोक्ति आणि लोकोक्ति यांच्यामुळे मी अपवित्र आहें. माझ्या ठिकाणीं अभिलाष, अहंता, ममता, काम-क्रोध-मद-मत्सर, रागद्वेष वगैरे असल्यामुळे मी अपवित्र आहें. इतकेंच नाही, तर मी अनंतसृष्टीचा प्रमादी आहें. श्रीचक्रधरा देवा, आता या सृष्टींत तुझ्या एकट्यावांचून आणखी कशानेंहि मी पवित्र होणें शक्य नाही. म्हणून श्रीचक्रधरादेवा, आपलें दर्शन देऊन, मला स्पर्श करून, माझ्याशीं बोलून, किंवा माझ्याकडे कृपादृष्टीने पाहून निदान मला अंतःकरणांत आठवून तरी माझ्यासारख्या अपवित्राला आता तूं पवित्र कर. रे परमेश्वरा, तुझे नाम, लीला, मूर्ति, चेष्टा, अवस्थास्थान, प्रसाद, वासनिक व भिक्षु यांचें सेवादास्य माझ्याकडून घडव आणि मला अपवित्राला पवित्र कर."

या न्यूनगंडासारख्या भावनेमुळे 'पुष्कळ कांहीं तरी करावें तेव्हां मोक्ष मिळण्याची थोडी तरी आशा' अशी भावना झाली असली पाहिजे, आणि

समाजनिष्ठेंत अखिल समाजाचा विचार करावा लागत असल्याने समाजनिष्ठ आचारमार्गात जी सुलभता अपरिहार्यपणें येते ती व्यक्तिनिष्ठ तत्त्वज्ञानामुळे आवश्यक नसल्याने, महानुभावांच्या मोक्षमार्गास अधिकाधिक मर्यादा पडून तो दुर्लभतर झाला असला पाहिजे, असें वाटतें. सारांश, द्वैतामुळे व्यक्तिनिष्ठा व न्यूनगंड, आणि व्यक्तिनिष्ठा व न्यूनगंड यांच्यामुळे मोक्षाची दुर्लभता (बाइ : ब्रह्मानुभूति : ते दुर्लभू ।। २८९ ।। नवप्रकरण.) अशी ही एक एकसंध कारणपरंपराच आहे, असें मनांत आल्यावांचून राहत नाही व हा विचार या मुद्द्याचा तपशील पाहिला असतांना स्थिर होतो.

महानुभावांच्या मतें, प्रत्येक क्रिया ही उभयरूप म्हणजे संतासंतमिश्र असते. उदाहरणार्थ, 'देवतेप्रीत्यर्थ फुलें तोडणें ही क्रिया एका दृष्टीनें संतक्रिया आहे. कारण फुलें तोडणाराच्या मनांतील देवपूजेचा हेतु शुद्ध आणि पुण्यकारक असतो. पण त्याच क्रियेमुळे असंतनिष्पत्तीहि होते. कारण फुलें तोडतांना तेथील अनेक सूक्ष्मातिसूक्ष्म जीवांची हत्या होते. यज्ञांत बळी देणें ही क्रिया देवतेप्रीत्यर्थ असल्यामुळे ती संतक्रिया होय. पण त्याच क्रियेमुळे एका प्राण्याची हत्या होते म्हणून ती असंतहि होते, फार काय, पण बोलणें, चालणें, श्वास घेणें वगैरे क्रियाहि अशाच संतासंतमिश्र होत.' अशा रीतीने पुण्यक्रिया करतांनाहि कर्माचे लेप चिकटत जाणारच आणि पुढें त्यांचा लोप करावा लागणारच. हेंच ' नुसत्या पापांबद्दलच नव्हे, तर पुण्यकृत्यांबद्दलहि म्हणजे देवतानिमित्ताने केलेल्या संतकर्मांबद्दलहि दुःख केलें पाहिजे. कारण त्या क्रिया कर्मरहाटीच्या संतक्रिया असल्या तरी दैवरहाटींत त्या ईश्वरप्राप्तीच्या आड येतात. या संतक्रियांचें क्षाळण अपरोक्ष ज्ञानांत करावेंच लागतें,' या वाक्यांत निःसंदिग्धपणें मांडलें आहे. (पहा—तेथ समळा जीवा अधिकारु नाही ।। २१८ ।। विचार).

" ज्ञानी, अज्ञानी, वेधवंत वगैरे सगळ्यांना परमेश्वराचें दास्य करतां येतें. बाइसांनी केवळ आवडीने परमेश्वराचें दास्य केलें. भटोबासांनी ज्ञानपूर्वक तर नाथोबांनी अज्ञानपूर्वक दास्य केलें. साधिकरणी पुरुषांनाहि वचनरूप परमेश्वराचें दास्य करतां येतें. तेवढ्याने परमेश्वर संतुष्ट होतो व त्या पुरुषाचा स्वीकार करून शेवटीं त्याला आपल्या अव्यक्त स्वरूपाची प्राप्ति करून देतो. म्हणूनच आचरत्या पुरुषाने अनन्य-

चित्तानें परमेश्वराचें व्हावें. " या वाक्यांवरून कळून येईल कीं, मोक्षमार्ग येथे जरा सैल केलेला असला तरी वाटेल त्याला तो मोकळा नाहीं. ' अज्ञानी' हा शब्द या ठिकाणीं सामान्य, नेहमींच्या अर्थानें वापरलेला नाही, तर ज्ञान-मार्गाखेरीज इतर मार्गानें जाणारा, असाच त्याचा अर्थ असला पाहिजे. मोक्ष बालांना व वृद्धांना नाही. ' अवतार धारण केल्यानंतर अधिकारकाळीं म्हणजे बारा वर्षांनंतरच परमेश्वर त्याचा स्वीकार करतो. ' त्याचप्रमाणे अनु-सरण ५६ व्या वर्षापूर्वीच हवें. कारण, ' अनुसरून आचरण करायला आव-श्यक तेवढा काळ राहण्यासाठीं हीच आयुष्यमर्यादा योग्य आहे. ' अशा तऱ्हेने १२ ते ५६ वर्षांतच मोक्षासाठीं प्रयत्न केले पाहिजेत.

आणखी असें कीं, परमेश्वर व जीव या दोघांनाहि आपली विशिष्ट योग्यता दाखविणें आवश्यक आहे. ' परमेश्वराने कर्मभूमीबाहेर अवतार घेतला तर तेथे सर्व देवतांच्या ओळगण्या त्याजजवळ राहणार नाहीत. त्यामुळे परमेश्वर 'अयुक्त' म्हणजे कांही ओळगण्याविरहित राहील. पण उद्धरण्यासाठीं परमेश्वर सर्व शक्तींनी ' युक्त ' म्हणजे सर्व ओळगण्यासहित असावयास पाहिजे. तसेंच ज्याचा उद्धार करावयाचा तो जीवहि युक्त असायला पाहिजे. म्हणजे त्याच्या शरीरांत सर्व देवतांच्या पिंडस्था असल्या पाहिजेत; एरवीं त्याचा उद्धार होऊं शकत नाही. जीवाच्या देहांत सर्व देवतांच्या पिंडस्था केवळ कर्म-भूमींतच असूं शकतात. अर्थात्, उद्धरणाला पात्र असा युक्त जीव कर्म-भूमींत असल्यामुळे त्याला ज्ञान देण्यासाठीं आणि त्याच्याकडून आपली सेवा-दास्यादि कार्यें करून घेण्यासाठीं परमेश्वरालाहि कर्मभूमींतच मनुष्यावतार घ्यावा लागतो.' जीवाच्या युक्ततेचें स्पष्टीकरण पुढें दिलें आहे. ' ज्ञान-पात्रत्वासाठीं ' युक्त ' म्हणजे सर्वावयवयुक्त व सर्व देवताधिष्ठानयुक्त पिंड असला पाहिजे; म्हणजे त्या शरिरांत सर्व पिंडस्था असल्याच पाहिजेत हें दिसून येईल. ......सर्व पिंडस्था असणें याचा अर्थ शरीराचे सर्व अवयव असणें. मनुष्याला सर्व अवयव असतील म्हणजे तो सर्व अवयवांनी ' युक्त ' असला तरच ज्ञानादिकाचा त्याला स्वीकार करतां येतो. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्याला डोळे नसले तर तो परमेश्वरावताराला पाहणार कसा ? आणि परमेश्वराला पाहिल्यावांचून त्याला ईश्वरप्रतीति येणार कशी ? आणि त्याचें ध्यान तो करणार कसें ? त्याला कान नसेल तर परमेश्वरावताराकडून

किंवा अधिकरणाकडून त्याला ज्ञान ' श्रवण ' करतां यायचें नाही, आणि परमेश्वर किंवा अधिकरण यांच्याद्वारें ' परेत ' घोळलेल्या अक्षरांनी ज्ञान झालें तरच तें उद्धरणाच्या मार्गावर मनुष्याला नेऊं शकतें. या ठिकाणीं डोळे किंवा कान असणें म्हणजे शरिरांत नुसतीं इंद्रियें असून भागत नाही, तर त्या इंद्रियांचीं कार्यें होत असलीं पाहिजेत, आणि इंद्रियांचीं कार्यें त्या ठिकाणीं नियुक्त पिंडस्थांच्या म्हणजे देवतासामर्थ्यांच्या अधिष्ठानावांचून होत नाहीत. जी गोष्ट परमेश्वराच्या बाबतींत खरी आहे तीच देवतांच्या विद्यादिकासंबंधींहि खरी आहे. उद्धरणाला सर्वच जीव पात्र असतात असें नाही, तर फक्त मनुष्यजीव पात्र असतात.' जीवाचे अनधिकार पुढें दिले आहेत. ' वेडे, पिसे, आंधळे, मुके, बहिरे यांच्या ठिकाणीं मनुष्यदेहाचें युक्तत्व नसतें ... असे अयुक्त जीव परमेश्वराचें ज्ञान ग्रहण करून तदनुसार आचार करायला असमर्थ असतात. (आ. मा. १५०). ज्यांच्या ठिकाणीं रजोगुण व तमोगुण यांचें प्राबल्य असेल, जे हृदयशून्य, भक्तिजड किंवा कर्मजड असतील आणि जे वयोवृद्ध जरठ झाले असतील, त्यांनाहि परमेश्वराचें ज्ञान होऊं शकत नसल्यामुळे धर्माचा अधिकार नाही. (आ. मा. २४२ व वि.२५७). मनुष्याच्या मनांत असलेले रजतमरूपी मळ (राजस व तामस भावनांविषयीं अंतःकरणाचा वेच) आणि सप्तव्यसनादि कर्में (तस्करत्व, पुंश्चलत्व वगैरे) हीं नाहीशीं झाल्यावांचून मनुष्यजीव परमेश्वराच्या बोधरूपी कृपेला पात्र होत नाही. परमेश्वराविषयी दोष मनांत आणणें, त्याच्यावर विपरीत भावना करणें, तीर्थक्षेत्रादिकाला जाणें, ही रजतमाचीं कार्यें होत. (पुरुषोत्तम क्षेत्राः न वचावे ।। १३४।। आ.मा.) महदाइसेच्या ठिकाणीं हे दोष होते. ते नाहींसे झाल्यावरच परमेश्वराने तिला बोध दिला.—सारांश, जे सात्त्विक आहेत अशांनाच परमेश्वरधर्माचा किंवा ज्ञानाचा अधिकार आहे.'

जीवांनीं परमेश्वराची कणव जोडली तर ' नाना तऱ्हांनी अयोग्य माणसांना योग्य करून कृपा-साह्याने त्यांना शोधून परमेश्वर मनुष्यजीवांना ज्ञान देतात, ' म्हणजे ज्ञान झाल्यावर आचारमार्ग चालण्याची पात्रता येते, परवानगी मिळते; पण आचारधर्म फक्त समर्थांसाठींच असतो, हें लक्षांत हवें. ' अशक्तासि विधि नाही.' (आ. मा. २८). 'स्वभावांना मात्रा देऊं नते सुकवणें केव्हांहि चांगलें. पण त्याहि स्थितींत धर्माचरणाचें सामर्थ्य मा*

साधकाच्या ठिकाणीं असलेंच पाहिजे,' हें विसरतां कामा नये. पण या धर्माचरणाची विवक्षा 'स्मरण हाच त्याच्या (साधकाच्या) जीविताचा मुख्य हेतु आहे,' ही आहे आणि म्हणूनच त्याने पूर्णपणें प्रेतवत् होऊन राहावें, असें सांगितलें आहे. म्हणजे स्मरण करण्यापुरती तेवढी शक्ति—किंवा धुगधुगी—अंगांत असावी. (देहाची अनास्था होआवी ॥ १३९ ॥ आ. मा.)

आतां प्रतिदेह आणि मोक्ष यांचे संबंध पाहूं. विचिकित्सारूप विकल्पाचें फळ म्हणून जीवाला मृत्यूनंतर प्रतिदेह मिळतो. त्यांत हत्तीएवढें शरीर, त्यावर रांजणाएवढें डोकें, बोटाएवढी मान आणि आंत सुईच्या छिद्राएवढा गळा असतो; आणि याचा शक्य त्या पद्धतींनीं छळ होतो. 'नुसत्या मानसिक विकल्पामुळे किंवा विकल्पाच्या उल्लेखामुळे जीवाला प्रतिदेह मिळून इतकें दुःख सोसावें लागतें. मग उल्लेख रसरूप होऊन कार्याला आला तर किती दुःख सोसावें लागत असेल, याची कल्पनाच करावी! प्रत्येक विकल्पपरत्वें नवीन प्रतिदेह आक्षेपत नाही; तर प्रतिदेह एकच, पण नवीन विकल्पाने दुःखाची तीव्रता वाढते इतकेंच. (म्हणजे, होणाऱ्या सर्व शिक्षा एकाच वेळीं भोगायच्या!) हा प्रतिदेह कशाने नासतो?—विपरीत अनुष्ठानाने, ईश्वरदास्याने व पुरभजनानेहि तो नासत नाही; तो फक्त कांही काळपर्यंत प्रतिबंधतो. मनुष्य पूर्णपणें निर्विकल्प बनला तर मात्र त्याचा प्रतिदेह नासतो. आपल्या शेंबड्यालेंबड्या मलमूत्राने भरलेल्या मुलाला पोटाशीं धरल्याने आईला विटाळ वाटत नाही, किंवा शिसारीहि येत नाही. त्या वेळीं ती जशी निर्विकल्प असते तशा नित्यनिर्विकल्प माणसाचा प्रतिदेह नासतो. पण कांही काळ निर्विकल्प राहून पुढें विचिकित्सारूप विकल्प केला तर मात्र प्रतिदेह चुकत नाही. तथापि, मृत्यूच्या शेवटच्या घटकेला निर्विकल्पत्व बाणलें अथवा भावे सणांत जोग्याचें सोंग घेऊन निर्विकल्प क्रिया आचरली म्हणजे निर्विकल्पतेचें सोंग करून विटाळचांडाळ न मानतां ब्राह्मणाप्रमाणेंच मांगाचेंहि सदन्न किंवा कदन्न स्वीकारलें आणि त्या स्थितींत मृत्यु आला तरीहि प्रेतत्व नासतें!' दशक्रियेनें म्हणजे मृत्यूनंतरच्या पहिल्या दहा दिवसांत भजन (म्हणजे भोजन) घातलें गेलें तरीहि प्रतिदेहाचा नाश होतो.

प्रारब्धकर्माचा नाश भोग भोगूनच करावा लागतो. असतीपरीचें महत्त्व वर्णन करतांना म्हटलें आहे कीं, ईश्वराचें ज्ञान हा अच्युतपदप्राप्तीचा एक

उपाय असून तें मोचक आहे हें खरें; पण जीवाला ईश्वराचें ज्ञान झालें म्हणजे तो सर्वस्वीं उद्धरला गेला असें मात्र नाही. ज्ञान मिळाल्यानंतर त्याने सर्वसंगपरित्याग करून परमेश्वराला अनुसरलें पाहिजे. अनुसरल्यानंतर याच देहीं अपरोक्षज्ञान प्राप्त होईपर्यंत अथवा दुसऱ्या जन्मांत परमेश्वराचा पुन्हा संबंध होऊन मग अपरोक्षज्ञान होईपर्यंत असतीपरीचा आचारधर्म पाळला पाहिजे.

'पण नुसतें अपरोक्षज्ञान झाल्याने संपलें असें नाही. त्यानंतर त्याने परमेश्वराच्या सान्निध्यांत त्याच्या सेवादास्याने आणि परमेश्वराच्या असन्निधानांत बहुरूपतेने व बहुकामतेने आपल्या अशेष कर्मोचा नाश करून सामान्यज्ञान मिळविलें पाहिजे; मग परमेश्वरप्रवृत्तीने आपल्या प्रत्येक मळाचें स्वतंत्र रीतीने, याप्रमाणे सर्व मळांचें क्षाळण करून विशेषज्ञान मिळविलें पाहिजे. तदनंतर कृपास्पदीचें दुःख अनंतकाळ भोगल्यावर परमेश्वराच्या कृपाशक्तीने मूळ विद्येचा छेद करून घेऊन त्याला मायापारंगत व्हावें लागतें, त्यानंतर त्याच्या अनुभवअज्ञानाचा नाश व्हावा लागतो, आणि मग कुठें ईश्वर त्याला आपल्या स्वरूपांत रममाण करतात.'

भक्तालाहि हें सर्व करावेंच लागतें. पण 'त्याच्या बाबतींत त्याला परमेश्वराचें निरंतर सन्निधान असल्यामुळे या सर्व गोष्टी आपोआप म्हणजे त्याला फारसे प्रयास न पडतां, सिद्ध होतात. पण ज्ञानियाला मात्र या सर्व गोष्टी स्वतः शारीरिक कष्ट सोसून, आचार करून पार पाडाव्या लागतात. त्याशिवाय त्याचें उद्धरण होऊं शकत नाहीं. '

उद्धरणासाठीं जन्म क्षेपावा लागतो. क्षेपण्याचा निश्चित विधि आहे. ' शारीर कष्टः मानसिक दुःख यातें जन्मक्षेपणें बोलिजे ', असें म्हटलें आहे. (श्रो. आ. मा. ४१). सुखसाधनांनी देव मिळत नाही. (सुखसाधने देवो न पवीजे नाएका : आ. ७९). जितकें जास्त दुःख तितकीं जन्मजन्मांतरींचीं अनंत दुःखफळांचीं कर्में नासतील; परमेश्वराच्या गोत्रियांवर परमप्रीति केल्याने प्रीति करणारांची अयोग्यता नासते. अर्थात् प्रीति करतांना जे दोष घडतील अशाच दोषांची अयोग्यता नासते. 'विकल्पदोषांबद्दल मात्र क्षमा न करतां परमेश्वर त्याचा (म्हणजे त्या दोषी जीवाचा) तत्काळ त्याग करतात. उत्कट विकार आणि हिंसा आचरणारे प्रमादिये यांनी जर अनुताप-

पूर्वक पुरश्चरण केलें तर ते स्वीकारांत पडतात. त्यांच्या दोषाच्या पुढील प्रसवाची चाल मोडते. पण लागलेला दोष मात्र पुसला जात नाही. त्यांतहि त्यांनी परमेश्वराला आलेली खंती विशेष आचरणाने परिहर केली तर त्यांना देहविद्या होऊं शकते. नंतर केलेल्या गोमट्या दोषाचा अर्धा प्रसव पारखतो आणि जीवाने, त्या दोषाबद्दल अंतःकरणपूर्वक अनुताप केला तर सगळाच प्रसव पारखतो. दोषाच्या प्रमाणांत प्रायश्चित्त हवें.'

साधकानें परमेश्वराच्या विरहाबद्दल निरंतर दुःख केलें पाहिजे. 'मनुष्यत्वाचा लेप निघण्यासाठीं साधारण पुण्यहेतूने भूतभजन घडलें पाहिजे. त्यांत ज्या व्यक्तीच्या ठिकाणीं भजन घडलें, ज्या स्थळीं, ज्या पदार्थांनीं व ज्याच्याकडून घडलें त्या सर्वांच्या राजस, तामस व सात्त्विक गुणांच्या संमिश्रणानुसार त्या पुरुषाला विशिष्ट स्वभाव पात्र होईल व तदनुसार बहिर्यागाचें आचरण घडेल. त्याला पुढें प्राप्त होणाऱ्या मनुष्यदेहाचें सुरूपत्व, कुरूपत्व, सलक्षणत्व, अवलक्षणत्व, युक्तत्व किंवा अवयवहीनत्व, स्त्रीत्व, किंवा पुरुषत्व भूतभजनाच्या पात्रावर अवलंबून राहील. ज्याच्या ठिकाणीं भजनक्रिया घडली तो पुरुष किंवा ती स्त्री जशी सुरूप किंवा कुरूप असेल तसाच सुरूप किंवा कुरूप अशा पुरुषाचा किंवा स्त्रीचा देह याला प्राप्त होतो. वंचकत्वानें भोजन घातलें तरीहि स्त्रीचाच देह मिळतो. ईश्वरावर प्रतीतिपूर्वक वेध असणें ही महत्त्वाची गोष्ट आहे. केवळ ज्ञानी म्हणजे बोधवंत असून त्याच्या ठिकाणीं वेध नसेल तर, तसेंच वेध नसून तो नुसता अनुसरलेला असेल तर, चौकडीचा दुःखभोग चुकत नाही. त्याला अपरोक्ष ज्ञानांत तो क्षाळावा लागतो.'

'ज्ञानियाला प्रेमाचे उपाय करतां येतात, नाही असें नाहीं; पण ते शाब्दज्ञानांत, किंवा अपरोक्षज्ञान प्राप्त होण्यापूर्वींच. पण एकदां त्याला अपरोक्षज्ञान प्राप्त झालें कीं, तो कायमचा दृढ ज्ञानिया बनलाच म्हणून समजा. मग त्याला कोणत्याहि रीतीने प्रेमाचे उपाय करतां येत नाहीत. अर्थात् ईश्वरानुभूतीपासून तो आता कायमचा मुकला. आपल्या डोळ्यांसमोर गाठव भुंकत असतांनादेखील त्याला चोरांनी न्यावें पण आपणांला कांही करतां येऊं नये, त्याप्रमाणे अपरोक्षज्ञानियाला प्रेमाचे उपाय करतां येत नाहीत. प्रेमाधिकारियाला ज्या देहांत प्रेम मिळतें त्याच देहांत त्याचें शाब्द चरित होऊन तो अपरोक्षाला पात्र होतो असें नाही. अनेकदां अपरोक्षाला पात्र होण्यापूर्वींच भक्ताचा मृत्यु होतो.

उदाहरणार्थ, वरंगळचा एकांकी भक्त व नागांबिका ऊर्फ बाइसा हे दोन्ही भक्त अपरोक्षप्राप्तीपूर्वीच मृत्युवश झाले होते. त्यांनी ईश्वरवियोगाच्या खोट्या बातमीने प्राणत्याग केला होता. एकदां अपरोक्ष झालें म्हणजे त्याच देहीं मुक्ति मिळते; पण अपरोक्षापूर्वी मृत्यु आला म्हणजे पहिल्या देहांत शाब्द पूर्ण न झालें तर ज्ञानियाप्रमाणेच भक्तालाहि पुनःसंबंधाचा देह मिळतो.'

सामान्यतः ज्ञानियाप्रमाणेच भक्तालाहि नवीन देहांत बाराव्या वर्षानंतरच परमेश्वराचा पुनः संबंध होतो. याला 'पुनःसंबंधिया भक्त' म्हणतात. 'विपरीत धर्मानुष्ठानाने ज्याची चौकडी चुकलेली आहे अशा जीवाला कृतयुग येईपर्यंत अवगळेंत ठेवलें जातें. प्रमादिया जर उपरतीनंतर आपली अधिक किंवा समान वृत्ति आचरतांना आपल्या प्रमाददोषाच्या दर्शनाने व ईश्वरांतराय आपणाला घडला म्हणून अंतर्दुःख करून नेहमीं तळमळत राहील आणि तळमळत तळमळतच प्राण सोडील तर त्याला देहाच्या पालटी देहविद्या मिळून पुढील सृष्टीच्या आरंभीं परमेश्वर प्रेम देतील.' त्याचप्रमाणे एखाद्या ज्ञानियाच्या दुःखप्रसंगीं किंवा मृत्यूप्रसंगीं आपला स्वतःचा देह वेंचणें, त्यासाठीं आपला देह समर्पण करणें हाहि प्रमादियाला प्रेमाचा उपाय आहे. यानेसुद्धां देहविद्या मिळून पुढील सृष्टीच्या आरंभीं त्याला प्रेम मिळतें.

जीवाला शाब्दज्ञान झाल्यावर व तदनुसार त्यानें आचरण केल्यावर परमेश्वर त्याला पुनःसंबंध देतात. आहाराच्या कमीअधिक प्रमाणावर पुनःसंबंधाचा काळ अवलंबून असतो. त्याचा तपशील (१) चतुर्थांशी–१२ वर्षें, (२) अर्धाहारी–१३ वर्षें ४ महिने, (३) पाऊणाहारी–१४ वर्षें ८ महिने, (४) संपूर्णाहारी–१६ वर्षें, (५) दरिया–२० वर्षें, (६) अनाधिकारी–२४ वर्षें, (७) त्रसाचा – २८ वर्षें, (८) डिंगरा –३२ वर्षें, (९) इशाळु–३६ वर्षें किंवा पुढें.

आता महाराष्ट्र–संस्कृतीकडे वळूं, म्हणजे महानुभावांना महाराष्ट्रांत स्थान कां मिळालें नाही हें कळेल. खरोखर पाहतां महाराष्ट्र संस्कृतींत वाढलेल्या कोणाहि डोळस माणसास वरील चर्चा वाचत असतांनाच महानुभावांचा पराभव कां झाला हें दिसून येईल. त्यामुळे यापुढील चर्चा फारशी विस्ताराने करण्याचें कारण नाही; अत्यावश्यक तेवढेच दाखले दिल्याने भागेल. आणखी असें की, महाराष्ट्रांतील महानुभावेतर सर्व प्रमुख पंथांत घनिष्ट मैत्री असल्याने

यापुढील विवेचनांत त्या सर्वांचा समुच्चयानेच विचार करणें योग्य होईल असें वाटतें.

महानुभावेतर सर्व प्रमुख पंथांना ' अवघ्या ' जगाचें भलें व्हावें ही तळमळ लागून राहिलेली दिसते. ' माझेया विस्तारलेंपणाचेनि नांवें । हें जगचि नोहे आघवें, ' असें स्वतः ईश्वर ज्ञानेश्वरींत सांगत आहेत. त्यामुळें ईश्वरावर प्रेम म्हणजे सर्व चराचरावर प्रेम हें समीकरणच झालें. म्हणूनच नामदेवांनी ' अवघा संसार सुखाचा करीन । अवघ्या भावें धरीन विठ्ठल एक ' असा निश्चयच केला, तुकारामांनी ' ऐसें भाग्य कई लाहाता होईन । अवघे देखे जन ब्रह्मरूप ' अशी तळमळ व्यक्त केली आणि ' अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ' रामदासांनी मनांत धरली. साहजिकच लोकसंग्रह हें आवश्यक कर्तव्य झालें. ' भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे ' ही ज्ञानेश्वरांची इच्छा होती. जीवांनी मैत्री जोडावी म्हणून देवांच्या मैत्रीचें गुणवर्णन करण्यांत आलें; श्रीरामचंद्र व श्रीचंद्रमौलि, आणि दत्तात्रेय व परशुराम यांच्यांतील सख्यभक्ति लोकांपुढें मांडण्यांत आली. रामदासांनी खऱ्या व नकली मैत्रींतील फरक समजावून सांगितला. सत्संगाचा महिमा अर्थातच या सर्वांनी तोंडभरून गायिला आहे. अनसूयेने ' स्वर्ग कोणता ' असें विचारलें असतां ' सत्संग हा स्वर्गच आहे,' असेंच दत्तात्रेयांनी सांगितलें.

महाराष्ट्राचें समाजसंपर्कावांचून चालणारच नव्हतें. त्यास समाजापासून दूर राहायचें नव्हतें. ' जे प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले । तयांहि कर्तव्य असें उरलें । लोकांलागी ।। ' असें ज्ञानेश्वरांनीं निःसंदिग्धपणें सांगितलें. अर्थातच लोकांत मिसळावयाचें म्हणजे लोकांना आपल्याविषयी मुळींच किळस वाटणार नाही, उलट आकर्षण वाटेल, असेंच आपलें स्वरूप हवें म्हणून रामदासांनीं ' विमलते 'वर भर दिला आहे. त्यांचें ब्रह्मदेखील ' विमल ' ! ' गीत हा विषय आहे ', म्हणून महानुभाव गीतगायनीं निराकरण करीत तर, ' आवडी सकळै लोकां । प्रीतीने भजती जनीं । इच्छिले पुरविती सर्व । धन्य ते गायनी कळा ॥ येकाकी महंती येते । उदंड कीर्ति वाढते...' म्हणून रामदासांनी गायनाचा पुरस्कार केला. लोकांना आपल्याविषयी आपुलकी निर्माण करून लोकांचें कल्याण करावयाचें, घडवा-

वयाचें असेल तर परोपकार केला पाहिजे, हें ओघानेच आलें. ‘ठाकला तो कांही केला उपकार। केलें हें शरीर कष्टवूनी’ असें तुकारामांनी सांगितलें. ‘जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारें’ हे उद्गार परोपकाराची आवश्यकताच प्रतिपादन करतात, कारण संत हा शब्द अनेकदां गौरवार्थी वापरला जातो. जे संत झाले होते त्यांनीहि एकत्रच राहावयाचें होतें. ज्ञानेश्वर आपले ज्येष्ठ बंधु व गुरु निवृत्तिनाथ यांच्यासह इतर भक्त-मंडळाला बरोबर घेऊन तीर्थयात्रेस गेले होते. रामदासांच्या वाङ्मयांत तर समुदाय करण्याची वृत्ति सर्वत्रच आहे. ‘कांही समुदाव करणें। येविषी आलस्य न करणें। आलस्य करितां उदंड उणें। दिसेल परमार्थी॥’ असें सांगून त्यांनी समुदाय हा परमार्थासाठींसुद्धां हवाच, असें आग्रहाने लिहिलें आहे. एके ठिकाणीं तर ‘ब्रह्मारण्य सेवी तो साधु येकला। जना नाही आला उपेगासी’ असा त्यांनीं एकटेपणाचा निषेध केला आहे. सारांश, समाज-संपर्काची आवड, समाजांत मिसळण्याचा आग्रह, लोकांना आपला सहवास चांगला वाटावा ही इच्छा, समाज करून राहण्याची वृत्ति व लोकांसाठीं कष्ट करण्याची तयारी, हे महाराष्ट्राच्या मनाचे धर्म आहेत. हे गुणधर्म म्हणजेच समाजनिष्ठा.

समाजनिष्ठा हा महाराष्ट्राचा प्राण आहे. महाराष्ट्रांतील सर्व थोर लोकांना नेहमीं स्वतःपेक्षा स्वतःच्या भोंवतालच्या लोकांची चिंता जास्त वाटत आली आहे. ‘मग आर्तांचेनि वोरसें। गीतार्थग्रथन मिसें। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथ’, या ज्ञानेश्वरांच्या ओंवींत हेंच स्पष्ट नाही काय? ‘बुडती हे जन न देखवे डोळां। येतो कळवळा म्हणऊनि।’ या उद्गारांत तुकारामांच्या हृदयाचा कनवाळूपणा किती सुंदर व्यक्त झाला आहे! ‘देशकाल वर्तमानें। आपण चिंताग्रस्त होतीं मनें। म्हणती कैसी वांचतील जनें?... कैसी क्षेम राहील जगतीं? कैसी देवदेवाल्यें तगतीं? कैसे कुटुंबवच्छल लोक जगती? कोणेकडे जातील हे?’ हे रामदासांचे बोल ऐकून आपण आजहि अस्वस्थ होतो. केवढी हृदयाशीं भिडलेली ही समाजनिष्ठा! यांतून दुबळे, डोक्याने कमी असणारे लोक वगळलेले नाहीत. ‘पोहणारें बुडते तारावें। सामर्थ्यें बुडों नेदावें। मूर्ख ते शहाणे करावें। विवेकी पुरुषें॥’

संतांची ही उत्कट समाजनिष्ठा जातिवंत असल्याने त्यांच्या वैयक्तिक

जीवनांतहि तीं उत्कृष्टपणें प्रतिबिंबित होत आहे. ज्ञानेश्वरांनी व त्यांच्या बंधूंनी नाथपंथ स्वीकारला; कारण इतरत्र जी झाली नसती ती मुक्ताबाईची सोय त्यांत होत होती आणि मुक्ताबाईची अशी चांगली सोय लावल्या-शिवाय राहणें या भावंडांच्या मनोवृत्तींत नव्हतें, असें सारस्वतकार भावे म्हणतात. तुकारामांनी प्रयाणाच्या वेळीं पत्नीस ' तुझ्या गर्भी नारायण आहे ' असें सांगून तिची काळजी घेण्याविषयी इतरांस विनंती केली. रामदासांनी पुरश्चरण व तीर्थाटण झाल्यावर घरीं येऊन आईच्या डोळ्यांचें पारणें फेडलें आणि बंधूंच्या मुलांस प्रेमाने श्लोकबद्ध उपदेश केला. रामदासांच्या शिवाजीवरील प्रेमास तर उपमाच सुचत नाही; तसें प्रेम तेंच !

चक्रधर मात्र पुनः आपल्या घरीं गेल्याचें ऐकिवांत नाही. कसें असेल ? कारण तें त्यांच्या तत्त्वज्ञानास सोडून होतें. महानुभावांच्यांतहि कांही ठिकाणीं प्रेमाचे संबंध दिसतात. उदाहरणार्थ, ' वच्छहरण ' लिहिलें दामोदरपंडि-ताने पण कवीचें नांव घालतांना ' म्हणे मुनी केशीराजु ' असे शब्द घातले. पण हें अपवादात्मक कां म्हणूं नये ? शिवाय या प्रकारच्या प्रेमाचा अंतर्भाव तत्त्वज्ञानांत हवा. जिथे माणसें आहेत तिथे प्रेमाचे संबंध दिसणारच. कारण तो मानवी स्वभाव आहे. पण पंथाबाहेरचेच काय, पंथांतील लोकहि वर्तणुकीचा विचार करतांना तत्त्वज्ञानांत जें कांही सांगि-तलें असेल त्यासच प्राधान्य, नव्हे, सर्वच महत्त्वहि देणार, ही गोष्ट खरी नाही काय ? आणखी असें कीं, महाराष्ट्रीय संतांच्या बाबतींत हें प्रेम, ही दुसऱ्याविषयी स्वतःपेक्षा जास्त वाटायची कळकळ, मनुष्यमात्रापुरती मर्यादित नव्हती, तिचा विस्तार सर्व सृष्टींत होता. रेड्याचे हाल बघून रेड्याचे हाल बघण्यापेक्षा स्वतःचे हाल सोसवतील असेंच ज्ञानेश्वरांस वाटलें. नामदेव कुत्र्याने पळवलेल्या पोळीवर तूप घालायला त्याच्यामागे धांवले. चक्रधरांच्या मनांतहि करुणा ओतप्रोत होती; कुत्र्याला लागलेला मार जणूं आपल्याला बसला असें त्यांना वाटलें, हें खरें; पण अशा स्वरूपाची हिंसा करूं नये म्हणून विलक्षण नरकाची भीति दाखविण्याचा जो द्राविडीप्राणायाम त्यांना करावा लागला आहे तो या संतांच्या बाबतींत सर्वथा अनवश्यक होता; कारण त्यांना जग विष्णुमयच वाटत होतें. तळ-मळणारें गाढव पाहून एवढ्या दूर ठिकाणाहून प्रयासाने आणलेली मोजकी

महत्त्वाची गंगा नाथांनी त्या गाढवाच्या तोंडांत ओतली. त्याचें वर्णन मयूरकवीने—

पाणी एकोपंत द्रवुनि विकळ तृषित रासभा पाजी ।
तें लक्ष विप्रभोजनसम झालें, म्हणति साधु, बापाजी ।।

असें केलें आहे ! पण महानुभावांत जर असा कावड वाहण्याचा आचार असता, तर त्यांच्या, भावनांपेक्षां आचारकांडास महत्त्व देण्याच्या रीती-प्रमाणे, हा प्रकार चूक ठरल्यावांचून राहिला नसता. तसेंच, भुकेले जीव पाहून एकनाथांनी जातगोत, पात्रापात्र न पाहतां भोजन घातलें; महानु-भावांच्या कल्पनेप्रमाणे एकनाथांना पुनःसंबंधांत या खालच्या जातीचा कुठला तरी देह मिळेल. अशा रीतीने, महानुभाव पंथ महाराष्ट्राच्या समाज-निष्ठ मनोवृत्तीशीं संपूर्णपणें विसंगत असल्याचें दिसून येईल. ज्या वेळीं माणूस निःस्वार्थीपणें इतरांची चिंता दूर करून सर्वांना ईश्वरकार्य समजावून देण्याचें आणि सर्वांच्या भल्याचें कार्य करीत कष्टत असतो, त्या वेळीं त्यास त्याचें कार्य चूक आहे असें सांगणें हें कोणीहि झाला तरी कसें सहन व्हावें ? म्हणूनच महानुभाव पंथीयांच्यावर महाराष्ट्रीयांनी प्रखर टीका केली असली पाहिजे, हें अगदीं सरळ आहे. त्यांतहि महानुभा-वांचें वागणें असें कीं, ' इतरांशीं प्रिय बोलावें, पण उपयोगी पडूं नये. ' यावरूनच ' मानभावी कावा ' हा वाक्प्रचार आलेला असणें संभवनीय नाही काय ?

महानुभाव हे द्वैती कसे आहेत आणि त्या द्वैतामुळे त्यांच्या विचार-आचारावर कसा परिणाम झाला आहे, हें आपण पाहिलें. महाराष्ट्रांतील इतर सर्व प्रमुख पंथ अद्वैतवादी आहेत.' तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग' असें देवाचें आणि जगाचें ऐक्य ज्ञानेश्वरांनी पूर्णपणें पुढें मांडलें आहे. पिंड आणि ब्रह्मांड यांत असेंच नातें आहे, हें दत्तसांप्रदायिकांनी सांगितलें आहे. तुकारामांस अद्वैतसिद्धान्त मान्य आहे; पण ' अभेदूनि भेद राखियेला आंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ', असें त्यांचें मत आहे. संतमुमुक्षुवादांत रामदासांनी अद्वैत मान्य केलें असून, ' राम तो जाणिजे आत्मा । सर्वांत-रात्मा तोचि तो । ' असें स्पष्टीकरण चतुर्थमानांत दिलें आहे. या अद्वैता-मुळे अर्थातच जीवास हीनगंडासारखी भावना बाळगण्याचें प्रयोजन पडत

नाही. आपण ब्रह्म आहोंत ही कल्पना आरोग्यपूर्ण वाटते. तिच्यामुळे व समाजनिष्ठेत संबंध समाजाचा विचार करावयाचा असल्याने, ज्याप्रमाणे नौदलाचा वेग सर्वांत हळू चालणाऱ्या बोटीवरून ठरवतात, त्याप्रमाणे मोक्ष-मार्ग सुलभ झाला आहे. अद्वैतामुळे समाजनिष्ठा व मनाचें आरोग्य, आणि समाजनिष्ठा व मनाचें आरोग्य यामुळे मोक्षमार्गाची सुलभतरता, अशी ही येथील कारणपरंपरा आहे.

ज्ञानेश्वरांनी मोक्ष मुक्तद्वार केला, ही त्यांची अत्यंत मोठी कामगिरी होय. 'तुम्हा वर्णविशेषवसें । आम्हीं स्वधर्मू विहिला असे । एयातें उपासा; मग आपैसे । पुरती काम ' असें त्यांनी सांगितलें. चोखयाच्या 'महारी 'ने 'नाम निज नौका । विठ्ठल हें तारू । भवाचा सागरू । उतरील । ' असें विश्वासपूर्वक म्हटलें. एकनाथांची कामगिरी सारस्वतकारांच्या पुढील शब्दांत उत्तम रीतीने व्यक्त होतेः " आंधळे, पांगळे, थोटे यांनाहि ईश्वरप्राप्ति होईल, खटनट, भोळे-भाबडे, अज्ञान, अनाथ, अपंग हेहि तरून पार होतील, असा मार्ग दाखविणें अवश्य आहे, हें तीर्थयात्रेंत जगाची स्थिति निरखून पाहत असतां नाथांच्या लक्षांत आलें व त्यांनी सर्वांना सहज साधितां येईल, असा भागवतधर्म स्पष्टपणें दाखवून दिला. " लहान मुलांसाठींहि त्यांनी अनेक प्रकारचें भारूड लिहिलें. तुकारामांनी, ' ब्राह्मणक्षेत्री वैश्य शूद्र । चांडाळाहि अधिकार । बाळें नारीनर । आदिकरून वेश्याहि ' या शब्दांनी तेंच सांगितलें. ' नलगती सायास । जावें वनांतरा । सुखें येतो घरा । नारायण ' आणि ' नलगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म । आणिक न करावे श्रम । पुरें एक नाम विठ्ठलाचें ' यांत सुलभतरता स्पष्टच आहे. ' ज्याने उठावें त्याने गळ्यांत तुळशीमाळा घालावी आणि हातीं टाळ घेऊन विठोबा-च्या भजनास लागावें ', या भाव्यांच्या एका वाक्यांत या मुद्द्याचा सर्व सारांश आला आहे. ' श्रीशिवलीलामृत ' लिहून मोक्ष मुक्तद्वार करण्याचेंच कार्य श्रीधरांनी फार मोठ्या प्रमाणावर केलें. कारण त्यांत नकळतच काय, पण अयोग्य हेतूनेहि नाम घेतलें असतां तें फलदायक होतें; एवढेंच नव्हे, तर अनाचाऱ्याच्या प्रेताला कुत्र्यासारख्या प्राण्याकडून जातां जातां भस्म लागलें तरी त्यामुळे तो मोक्षमार्गास पात्र होतो व यास कोणत्याहि अटी नाहीत, वगैरे तत्त्वें सांगणाऱ्या गोष्टी आहेत. हा अगदीं कळसच झाला !

हें वाचून महाराष्ट्रीयांनी मोक्षमार्ग भलताच स्वस्त केला, असें कुणी म्हणेल. पण यांत एक चांगला विचार दिसण्याजोगा आहे. महाराष्ट्रीय लोकांना कलहशील म्हणणारे कोण असतील ते असोत; पण मराठी वाङ्मय वाचीत असतांना मराठी मनाचा अभिजात प्रेमळपणाच सतत दिसतो. प्रेमळतेचा सुंदर प्रवाह सर्व मराठी वाङ्मयांतून अविरत वाहत आहे.' माझ्या भोंवतालीं दिसणारे हे सर्व जीव माझेच आहेत, मला ते हवे आहेत, मी त्यांच्यासाठी लागेल तें करीन ', ही भावना म्हणजेच हा प्रेमळपणा. माझीं माणसें कशींहि असलीं तरी तीं माझीं आहेत, ही यामागील कल्पना आहे. मला एकट्याला मोक्ष नको, मोक्ष सर्वांना असूं दे, असें महाराष्ट्रीयांचें मागणें आहे. कोणताहि आनंद मराठी माणसाला एकट्यानेच भोगवणार नाही, मग मोक्षच त्याला अपवाद कसा ? म्हणून जरा चांगुलपणा असला की तो मोक्षाला पात्र होतो. मग भक्त हे पायावर डोकें ठेवण्याच्या योग्यतेचे वाटल्यास नवल काय ? जीविताचें जें ध्येय तें सर्व संतांना प्राप्त झालें होतें, तरीहि ते लोकांत राहिले तें लोकांवरील प्रेमामुळेच. त्यांना एकेकट्याने मोक्ष मिळवून स्वस्थ होतां आलें नसतें काय ? पण त्याने त्यांना चैन पडणार नव्हतें. ' देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ' असें समर्थ म्हणतात खरें; पण तें योग्य काळीं. ज्ञानेश्वरांनी त्यांचे अनेक जिवलग ' जाला जैसा वर्षाकाळु । खवळणें मेघा ' असे अश्रु गाळीत असतां समाधि घेतली हें खरें; पण ती ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथलेखनाने या जगांतलें कार्य संपल्यावर मगच. त्यांना, ज्या ज्ञानामुळे मोक्ष होतो तें ज्ञान केव्हांच झालें होतें ! समर्थांनी जसें ' तरी मी ग्रंथाकारें आहेंच ' असें सांगितलें, तसें ज्ञानेश्वरहि सांगत आहेत जणूं. महाराष्ट्रीयांच्या या हळुवारपणावरून एक निराळा मुद्दा सुचतो. महाराष्ट्रीय खरोखर इतके हळवे कीं, त्यांना दुसऱ्याचें दुःख जणूं आपलेंच वाटतें. सर्व संतांच्या चरित्रांत हें डोळे भरून पाहायला सांपडतें. या गुणामुळेच महाराष्ट्रीयांना अद्वैत तत्त्वज्ञान ताबडतोब पटलें असावें. अद्वैत तत्त्वज्ञान वाचल्यानंतर मग जगांत आपलींच रूपें दिसूं लागलीं असें झालें नसून जगांत आपलेंच रूप दिसत असल्याने त्यांना अद्वैत सहजच पटलें, असें झालें असावें. संतांच्या चरित्रांतील अभिजातपणावरून हें मत पाया धरतें.

हें सगळें विवेचन लक्षांत घेतल्यावर मनांत येतें, खरेंच, कसा अपेक्षा-वयाचा होता विजय महानुभावांनी महाराष्ट्रांत ! मग यापुढचा प्रश्न असा कीं, महाराष्ट्रसंस्कृतींत महानुभावांचें स्थान काय ? त्यास उत्तर असें कीं, जें मराठी भाषेंत आहे, तें महाराष्ट्रसंस्कृतींतीलच म्हटलें पाहिजे. कांही अपवाद सोडल्यास महानुभाव तत्त्वज्ञानास 'चक्रधर-दर्शन' म्हणावयास हरकत नसावी; कारण त्यांचीं गृहीतें धरल्यास त्यांचे सिद्धान्त बरोबर निघतात, असें वाटतें.

पण तें सर्व या लेखाच्या कक्षेबाहेर जाईल. कोणतें तत्त्वज्ञान खरें होतें किंवा खोटें होतें, आणि बरें काय व वाईट काय, हें तूर्त बाजूस ठेवून, महानुभाव मागे कां पडले, या प्रश्नाचीच चर्चा करण्यासाठीं हा लेख शास्त्रीय दृष्टिकोनांतून लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. यांत नवीन कांही आहे कीं नाही तें सुज्ञतज्ज्ञांच्या ध्यानांत येईलच.

(या लेखांतील अवतरणें प्रा. कोलते यांच्या 'महानुभाव तत्त्वज्ञान' व 'महानुभावांचा आचारधर्म' या ग्रंथांतील व मूळ पोथ्यांतील आहेत.)

[टीपः—म. वा.—महावाक्य; म. वा. प्र.—महावाक्य प्रमेय; वि.—विचार, आ. मा.—आचार मालिका, ली. च.—लीला चरित्र, शो. आ. मा.—शोधनीची आचारमालिका, म. त.—महानुभाव तत्त्वज्ञान, म. आ.—महानुभावांचा आचारधर्म, प्र.—प्रकरण.]

— २ —

केशवसुत

(पूर्वार्ध)

केशवसुतांचें अंतरंग

केशवसुत हे आधुनिक मराठी काव्याचे आद्य प्रवर्तक होत, हें सत्य आता प्रस्थापित झालें आहे. त्यांच्या या मोठेपणाविषयी जो वाद होता तो संपून आता बरेच दिवस झाले आहेत, असें म्हणायलाहि हरकत नाही. उलट आता 'केशवसुतांनी आपलें छायाचित्र कां बरें काढूं दिलें नाही?' अशी हळहळच सर्व मराठीप्रेमी माणसें व्यक्त करीत असतात. अर्थातच 'हें चित्र कुणाचें बुवा?' असें विचारलें जाण्यापेक्षा 'यांचें छायाचित्र कां बरें नाही?' हें विचारलें जाणें किती चांगलें आहे, हें कांही सांगायला नको.

केशवसुतांच्या या मोठेपणाचें नेमकें रहस्य काय, हा विचार साहजिकच मनांत येतो. काव्यक्षेत्रांत कां होईना, केशवसुतांनी परिस्थिति घडवली की परिस्थितीने त्यांना बनविलें? व्यक्ति मोठी की कालाचें माहात्म्यच मोठें? साहित्यशास्त्रामध्ये या प्रश्नाची चर्चा सर्वत्र होत असते. आणि हा प्रश्न खरोखरच महत्त्वाचा आहे यांत शंका नाही. केशवसुतांच्या बाबतींत या प्रश्नाचें उत्तर 'कालमाहात्म्यच मोठें' असें आजपर्यंतच्या टीकाकारांनी दिल्याचें दिसतें.

केशवसुतांनी ज्या कालीं काव्य लिहायला प्रारंभ केला, तो काळ अतिशय विलक्षण होता, असेंच कुणीहि म्हणेल. एवढें मोटें १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध! पण तेंहि जणू कांही दुसऱ्या जगांतून येणाऱ्या ताम्रमुखी मूठभर लोकांनी मोडून काढलें होतें, आणि खुंटी हलवून बळकट करावी तसा आपला पाय या खंडप्राय देशांत पक्का रोवला होता. महाराष्ट्राने जें पारतंत्र्य इकडेतिकडे पाहिलें होतें, त्यापेक्षा हें पारतंत्र्यहि 'अपूर्व' होतें. सुखाचा बुरखा घेऊन तें आलें होतें. पंचमहाभूतां-वरील ह्या राज्यकर्त्यांचें प्रभुत्व पाहून अल्पज्ञ जनता, आणि साहित्य व विज्ञान या

क्षेत्रांत त्यांनी निर्माण केलेले मेरुमांदार, प्रतिसृष्टि, पाहून सुंश बनता दिपून आणि दडपून गेली होती. काव्याच्या प्रांताविषयी बोलायचें तर आंग्ल कवींनी केलेली विपुल, विविध आणि चित्रविचित्र काव्यरचना पाहून सुशिक्षित काव्य-प्रेमी मोहून गेले. त्या कवींचे जीवनविषयक निरानिराळे दृष्टिकोन, त्यांची वेगवेगळीं भावानुकूल वृत्तें, विशेषतः त्यांच्या काव्यांत येणारीं अनेक प्रकारचीं मनमोकळेपणाने केलेलीं प्रणयवर्णनें, हें सर्व पाहून ती मधल्या स्थितींतील पिढी आश्चर्यमुग्ध झाली. हें जग मोहक तर खरेंच; पण या मोहकतेला नाविन्याची आणि अगदीं निराळेपणाची जोड मिळून एक त्रिवेणी संगम तयार झाला होता. याच त्रिवेणी संगमांत आधुनिक मराठी कवितेचा जन्म आहे, आणि तिचे जनक केशवसुत हे आहेत, असा आजपर्यंतचा रूढ समज दिसतो. हा संगम झालाच होता, त्याच वेळीं केशवसुत पुढे आले, आणि जें इंग्रजींत असें होतें तें मराठींत त्यांनी तसें केलें, स्वतःच्या विशिष्ट वृत्तीमुळे त्यांना तें जमलें, हेंच त्यांचें क्रांतिकारकत्व, हाच त्यांचा मोठेपणा, म्हणूनच त्यांना आधुनिक मराठी कवितेचे आद्य प्रवर्तक म्हणायचें, असा आजवरचा सूर आहे.

'केशवसुतांच्या मृत्यूची बातमी ऐकून टिळक उद्गारले, "आपल्यांतला वर्ड्स्वर्थ आज गेला!"' असें प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांनी नमूद केलें आहे. 'अवतरुनी फिरुनी शेले! केशवसुत गाउनि गेले!' असें आपल्याला त्यांचा 'सच्चा चेला' म्हणविणाऱ्या गोविंदाग्रजांनी अभिमानाने लिहिलें. 'मराठीचा परिमल' दाखवतां दाखवतां श्री. दा. न. शिखरे लिहितात, 'हरिभाऊ आपटे, प्रा. वा. ब. पटवर्धन, किरात, विनायक वगैरे थोर थोर रसिकांनी त्यांना वर्ड्स्वर्थ, कीट्स्, शेले या आंग्ल कवींच्या उज्ज्वल मालिकेंत बसविलें.' केशवसुतांच्या या समकालिनांपेक्षा आजच्या टीकाकारांचा अभिप्राय कांही वेगळा नाही. या सर्वांत सगळ्यांत जास्त आकर्षक अभिप्राय कुणाचा असेल, तर तो म्हणजे श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचा. 'गेल्या साठ वर्षांतील मराठी कविता' या आपल्या लेखांत ते म्हणतात, "'गोल्डन ट्रेझरी'तील कवितांतल्या कल्पना त्यांच्या बऱ्याच गीतांतून आणि सुनीतांतून प्रतिध्वनित झालेल्या आहेत; व त्यावरून असें दिसतें की त्या पुस्तकापलीकडे त्यांच्या इंग्रजी कवितेच्या व्यासंगाची मजल फारशी गेलेली नव्हती....... किंबहुना, त्यांच्या कवितेची एकंदर अंतर्बाह्य घडण ध्यानांत घेतली असतां, त्यांची प्रतिभा

हा इंग्रजी काव्यांचा प्रसव आहे, असेंच म्हणावें लागेल.... बायरन्, शेले, कीट्स् प्रभृतींची प्रणयमदिर कविता वाचून तत्कालीन तरुण पिढींत ज्या भावना आणि वासना निर्माण झाल्या, त्यांच्या विचारांत आणि वृत्तींत जी उत्कंठा आणि अतृप्तता उत्पन्न झाली, तिला केशवसुतांच्या कवितेच्या रूपाने वाचा फुटली....'' इत्यादि इत्यादि. प्रसिद्ध टीकाकार प्राध्यापक श्री. रा. श्री. जोग 'केशवसुत' या ग्रंथांत म्हणतात, "मराठी कवितेने जुनें वळण सोडून इंग्रजी वळण स्वीकारलें असें या क्रांतीचें स्थूलमानाने वर्णन केलें, तर या क्रांतीचें श्रेय केशवसुतांना देण्याची पटवर्धनांना अडचण वाटण्याचें कारण नव्हतें. कारण ते स्वतःच म्हणतात त्याप्रमाणे 'इंग्रजी वळणाची, कमीअधिक स्वतंत्र, जिव्हाळ्याची, भावगीतात्मक रचना करणारांमध्ये केशवसुत अग्रेसर होते.' '' इंग्रजी काव्याच्या संपर्काने मराठी काव्यांत कांही क्रांति केव्हा ना केव्हा होणारच होती; केशवसुत हे या क्रांतीचे निमित्त झाले, अशा आशयाचें विवेचन प्रा. जोग यांनी केलें आहे. 'मराठी साहित्याची रूपरेषा' पाहतांना प्राध्यापक डॉ. वि. पां. दांडेकर लिहितात, 'वर्ड्स्वर्थ, शेली, कीट्स् यांच्या काव्यवाचनाने नवीन मराठी कवींनी सृष्टिविषयक कविता लिहायला सुरुवात केली. केशवसुतांनी त्याच पद्धतीचा अवलंब करून सुमारें वीस निसर्गविषयक कविता लिहिल्या आहेत. '' त्यानंतर 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' लिहिणारे प्राध्यापक डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " इंग्रजी कविता वाचून केशवसुतांनी मराठी कवितेला पूर्णपणें नवीन आणि जुन्या मराठी कवितेला सर्वस्वीं अपरिचित असें वळण लावलें; आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या पद्धतीच्या बाबतींत त्यांनी मराठी कवितेंत अभूतपूर्व स्वरूपाची क्रान्ति घडवून आणली, ही गोष्ट वादातीत आहे.''

हें सर्व वाचून स्वतः केशवसुतांना काय वाटलें असतें, असा विचार मनांत येतो, तेव्हा त्यांना हें आवडलें नसतें असेंच वाटतें. याचें कारण केवळ विनय हें नव्हे, तर वस्तुस्थिति तशी नाही, हें होय. '**माझ्या तुमुंखल्या मुखामधुनिया बालावयाचा पुडे! आहे सुन्दर तो सदा सरसवाङ्‌निष्यन्द चोहीकडे! तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे घातील तो प्राशुनी!**' असें आपण आपल्या प्रतिभेच्या आणि चिंतनाच्या बळावर म्हटलें तें खरें झालें हें पाहून एकीकडे समाधान वाटत असतांनाच, आपल्या भूमिकेविषयी लोकांचा झालेला हा समज पाहून

त्यांच्या हळव्या जीवाला दुःख झालें असतें, आणि मग त्यांनी कांहीसे पुढील स्वरूपाचे उद्गार काढले असते—' **ज्याला मी मुकलों विषाद मजला त्याचा मुळींही नसे। जें पृथ्वीवर आणिलें जन तयां धिक्कारिती हा! कसे!**'

' जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें '

ही केशवसुतांची वृत्ति होती. कोणत्याहि कवीची वृत्ति अशीच असणार की, ' उत्कट भव्य तें घ्यावें मिळमिळीत अवघें चि टाकावें! ' त्या वेळीं डोळ्यांसमोर ' दिव्य ' काय होतें, तर तें म्हणजे इंग्रजी काव्य; त्यामुळेच केशवसुतांच्या मनांत गाणें जागें झालें, असें वरील विवेचकांना वाटतें. इंग्रजी काव्य हेंच त्यांचें स्फूर्ति-स्थान आहे, असें या विवेचकांचें मत आहे. पण थोर कवीची दृष्टि आपल्या काळापुरती मर्यादित नसते, वस्तूंचें अंतरंग भेदून ती जाते, ग्राह्य काय आणि त्याज्य काय हें तिला समजतें. केशवसुत हे या कोटींतले कवि होते. ' दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके ' हा त्यांचा आत्मविश्वास होता, ' काचेमधूनी दिसतें जनाला। धोंड्यामधूनीहि दिसें कवीला! ' ही अलौकिक जाणीव त्यांना झालेली होती, आणि ' फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें ' ही आपल्या बुद्धीविषयी त्यांची निश्चितता होती. ' मळयास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे,' असें म्हणणाऱ्या या कवीची दृष्टि कोणत्याहि प्रकारें संकुचित होती असें वाटत नाही. केशवसुतांची वाणी इतकी जिवंत वाटते की, ' वाचलें इंग्रजी काव्य की लिहिलें मराठी ' हें असेंच केवळ त्यांनीं केलें असेल यावर विश्वासच बसत नाही.

इंग्रजांच्या तेजाने भांबावलेल्या आणि त्यांच्या किंवा त्यांच्या वाङ्मयाच्या भाट बनलेल्या पिढीचे, त्या मधल्या स्थितीचे प्रतिनिधि केशवसुत होते, असें गृहीत धरणें चुकीचें होईल, असें वाटतें. केशवसुत हे खरेखुरे कवि होते. त्यांची बुद्धि जागरूक होती आणि भोवतालच्या घटनांचे पडसाद त्यांच्या हृदयाच्या सतारीवर उमटून काव्यरूपाने त्यांचे ध्वनि बाहेर पडत होते. कवि हा द्रष्टा असला पाहिजे, ही त्यांच्या मनांत दृढमूल कल्पना होती, ती कांही उसनी वाटत नाही. सभोवतालीं पाहतांच—

'सोन्याचे सरले अहा ! दिवस ते आली निशा ही कशी
सौख्याचा नद तो सुकून पडलों या दुःखपंकीं फशीं !
कालक्रीडित हें बघून रडला, हें व्यस्त कांही नसे;'

अशी त्यांची मनाची अवस्था दुःखमय झाली. पण लगेचच त्यांच्या लक्षांत आलें की,—

'आता जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी,
याची खूणच गान जें निघतसें तें साच जाणा मनीं;

परिस्थिति बदलत जाणार आहे'. या बदललेल्या परिस्थितीचे प्रतिनिधि केशवसुत होते, असें म्हटलें असतां तें शोभून दिसेल. सबंध समाज कदाचित् झोपला असेल, तो मृतवत् भासत असेल, पण त्याचें चलनवलन अगदींच संपलें आहे असें नाही. आणि म्हणून कुंभकर्णाला घोर निद्रेंतून जागे करण्याचे निरनिराळे प्रयोग चालू असतांना संगीताने तो जागा झाला असें म्हणतात, त्याप्रमाणे आपणहि आपलें काव्य आपल्या समाजाला जागें करण्यासाठी गावें, असा विचार त्यांच्या मनांत आला असणें अगदी स्वाभाविक आहे. म्हणूनच ते म्हणतात,—

'द्या उत्तेजन हो कवींस, न करा गाणें तयाचें मुकें' आणि म्हणूनच त्यांनी स्फूर्तीने तुतारी फुंकली, हातांत उंच निशाण धरलें आणि नवे शिपाई बनण्याचें आवाहन समाजाला केलें !

केशवसुत मनाचे किती सरळ दिसतात, हें अगदी उघड आहे. जेव्हा जेव्हा त्यांनी भाषांतरें केलीं, तेव्हा तेव्हा बहुतेक स्थळीं त्यांनी ऋणनिर्देश केला आहे. यांत त्यांची अभिजात रसिकताच दिसून येते. केशवसुतांचें आयुष्य तें किती ! पण या आयुष्याच्या पूर्वभागांतच नव्हे, तर उत्तर भागांतहि मूळ कवितांचा उल्लेख त्यांनी निःसंकोचपणें केला आहे. मग मनांत असा विचार येतो की, वर उल्लेखिलेल्या टीकाकारांच्या मतें जर केशवसुतांच्यावर परकीय म्हणजे इंग्रजी भाषेचें इतकें मोठें ऋण आहे, तर केशवसुतांनी तें कुठे तरी कबूल केलें असेल, कुठे तरी त्यांनी आपल्या काव्यांत इंग्रजी भाषेची, इंग्रजी वाङ्मयाची स्तुति केली असेल ! या दृष्टीने पाहूं जातां हातीं काय लागतें ? अशी एक महत्त्वाची जागा आहे. ती म्हणजे '**'पण लक्षांत कोण घेतो ?'**च्या कर्त्यास' ही त्यांनी लिहिलेली कविता.

‘ यूरोपीय कथा–पुराण–कविता–ग्रन्थांतुनी वांगळे,
ते आहेत कितीक थोर उमदे राऊत वाखाणिले ’

हे उद्गार स्पष्ट आहेत, हें खरें. पण त्याहूनहि जास्त स्पष्ट गोष्ट आहे ती ही की, त्यांना ‘ गर्व ’ वाहावासा वाटतो तो या कादंबरीच्या कर्त्यांचा. ‘ दोन बाजी ’ या कवितेचें ‘ मूळ ’ म्हणून व्हिक्टर ह्यूगोची एक कविता दाखवून देण्यांत आली आहे. पण वीरश्रीची गोडी काव्यांत अनुभवावी अशी शिराणी ज्या कुणाच्या मनांत असेल, त्याला ही कविता स्फूर्तिदायक वाटेल यांत शंका नाही. केशवसुतांच्या मनांत हा विषय बऱ्याच पूर्वीपासून अस्वस्थता उत्पन्न करीत असला पाहिजे. आणि ही भावना व्यक्त होण्याच्या थराला पोचली असतांना, सौंदर्याचें मर्म ग्रहण करणाऱ्या त्यांच्या दृष्टीच्या आढळांत ह्यूगोची ती कविता आली असली पाहिजे. ह्या ठिकाणीं आविष्काराची पद्धति, बाहेरचा आकार, हा फार तर इंग्रजी कवितेच्या वाचनाने त्यांना सुचला असेल. पण ह्यूगोची कविता आवडल्याने असें कांही तरी मराठींत करावें अशी ईर्ष्या मनांत उत्पन्न होऊन मग ते हें काव्य करायला बसले असतील, असें वाटत नाही. या कवितेचा जिवंतपणा हीच याची साक्ष नाही काय ? ‘ हृदयांतुनि न जे बोल । निघती, ते सगळे फोल ’ असें केशवसुतच म्हणत नाहीत काय ? प्रेरणा निर्माण करण्याचें कार्य हें ‘ तेथे पाहिजे जातीचें ’ याच स्वरूपाचें नाही काय ? केवळ परकी पोषाख घातला म्हणजे माणूस परकी बनतो काय ? तात्पर्य, केशवसुतांची स्फूर्ति परकी वाटत नाही. ‘ सुनीत ’ हा जो काव्यप्रकार केशवसुतांनी मराठींत नव्यानेच सुरू केला, त्यासंबंधानेदेखील हेंच म्हणावेंसें वाटतें. आपल्या वृत्तीला अनुकूल असणारे विचार आणि प्रकार त्यांनी संग्राहक वृत्तीने ग्रहण करून घेतले आणि आपल्या कौशल्याने ते व्यक्त केले. कुणी म्हणेल, हीच केशवसुतांनी केलेली क्रांति नव्हे काय ? पण, केशवसुतांची ही वृत्ति, त्यांचा मनःपिंड, कसा बनला होता, याचा एकदा शोध घेतला म्हणजे, एकटा सूर्य सर्व प्राणिमात्रांना चेतना देतो त्याप्रमाणे केशवसुतांच्या आवर्तींतील सर्व प्रश्नांचा उलगडा होईल !

‘ तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजीं ’

हा दिव्य अनुभव केशवसुतांना आला होता. असेच पण क्षणांत नाहीसे

होणारे विविध भोग आत्मसात् करण्याची त्यांची तळमळ होती. ही विशालता, व्यापकता त्यांना हवी होती हें '**मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदी न मला साहे!...सर्वच मोठें–साधु–जवळ त्या सकळीं मी भरूनी राहें!**' इत्यादि चरणांवरूनहि स्पष्ट आहे. त्यांच्या मनांत हे विचार केवळ कवितेंत घालण्यासाठी आले नव्हते. ते त्यांच्या विशिष्ट वृत्तींतून स्फुरलेले होते. 'जया अंगीं मोठेंपण। तया यातना कठीण' हें त्यांना जाणवत असलेंच पाहिजे. अखिल विश्वाशीं एकरूप होण्याचा जगावेगळा आनंद उपभोगावयाचा असेल तर अखिल जगाचीं दुःखेंहि आधी जवळ केलीं पाहिजेत! पण, आतां काय करावें, मग काय करावें, हा प्रश्न तिथे नव्हता. अन्तःकरणप्रवृत्तीच तिथे प्रमाण होती.

यामुळेच केशवसुतांना 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' डसला; 'मजुरावर उपासमारीची पाळी' आलेली पाहून त्यांचें हृदय व्याकुळ झालें; 'मुलास झोडपणाऱ्या एका पंतोजीस' पाहून 'खाटीक कां झाला नाहीस?' अशा शब्दांत विचारण्याइतका राग आला; आणि रूढिकाराक्षसीचे अत्याचार पाहून तर त्यांच्या मनांत कायमचाच कल्लोळ उठत राहिला. म्हणूनच त्यांनी समाजसुधारणेचें चित्र असें रंगविलें—

सृष्टीने निज भृत्य एक बलवान् रूढीवरी प्रेषिला
त्याने कागद घेउनी सहज जे रूढीकडे फेंकिले,
त्यांहीं आसन तें तिचें डळमळूं आहे पहा लागलें!

केशवसुतांना अभिप्रेत होती ती प्रामुख्याने समाजसुधारणा, त्यांना स्वातंत्र्य हवें होतें तें व्यक्तिस्वातंत्र्य; असेहि विचार प्रचलित असल्याचें कांही ठिकाणीं दिसतें. पण ही शंका टिकाऊ आहे असें वाटत नाही. जी व्यक्ति '**मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदी न मला साहे।...अपुल्यामध्ये विश्व पाहुनी पूजी मी विश्वाला!**' असें निर्भयपणें सांगते, ती राजकीय पारतंत्र्याविरुद्ध मूग गिळून बसेल हें शक्य तरी आहे का?

केशवसुतांना हें राजकीय दुःखहि उत्कटपणें होत होतें. '**देशाविषयी गोष्टी बोलत येथे। बसलों, विसरुनि कितीकदा निद्रेतें**' असें ते म्हणतात. या साऱ्या गोष्टी त्यांनी लिहून कां बरें ठेवल्या नाहीत? पार-

तंत्र्यामुळेच; नाही का ? ' बोलावयाचें लिहूं नये ' हेंच खरें ! पण त्यांच्या त्या वेळच्या विचारांचें दिग्दर्शन त्यांनी करून ठेवलें आहे. स्वातंत्र्याची पहाट होऊन उत्कर्षाचे दिवस केव्हा येतील असें ते म्हणतात. पण, **' किंवा तीतें आणायाचें कांही । यत्न आमुच्या होतिल काय कहीं ? '** हे उद्गार जास्त महत्त्वाचे वाटतात. केवळ कल्पना करून आणि काव्य लिहून त्यांचें समाधान होत नव्हतें, हें यावरून स्पष्ट दिसतें. किंवा, त्यांच्या कल्पनांचे उद्रेक हे जिवंत असल्याकारणाने प्रत्यक्ष कार्याचा विचार त्यांच्या मनांत आला नसता तरच नवल ! त्यांच्या मनांत जो काळोख पडलेला दिसतो, त्याला सामाजिक आणि राजकीय दुःखें हीं राहू-केतूंच्या जोडीप्रमाणे कारणीभूत आहेत. त्यांच्या पुढील आयुष्यांत जी निराशा पुनः पुनः दिसते तिचें कारण, आपल्या हातून असे प्रयत्न आपल्या अपेक्षेइतके, आपल्या यौवनाच्या भरांतील पहिल्या स्वप्नांइतके, होऊं शकले नाहीत याची जाणीव हेंहि असेल, हें यामुळे मनांत आल्यावाचून राहत नाही. आकाशांतील नक्षत्रें पृथ्वीवर आणायचें त्यांचें स्वप्न होतें ! अशांच्या हातीं काय पडणार, असें कुणाला वाटेल. पण कवींचा तो स्वभावच असतो. आणि या त्यांच्या स्वभावामुळेच जगाला कांही वेगळ्या, उंच वातावरणांतल्या गोष्टींचा लाभ होत असतो !

जें जें उत्कट आणि भव्य असेल तें घ्यावें, हा तर कवींचा स्वभावच असल्याने केशवसुतांची दृष्टि इतिहासाकडे वळणें हें साहजिकच होतें. पण पारतंत्र्याच्या दुःखामुळे त्यांची ही दृष्टि अधिक भेदक झाली. इतिहासाकडे केशवसुत वळले ते त्यांतून स्फूर्ति मिळविण्यासाठी. ' नैर्ऋत्येकडला वारा ' आल्यावर त्यांच्या अंतःचक्षूंसमोर सह्याद्रि उभा राहिला !

> **त्यांचे उंच शिरांवरी विलसती किल्ले मराठी जुने**
> **देवी पालक त्यांतल्या मज पुनः धिक्कारिती भाषणें**
> **' कोठें पूर्वज वीर धीर तव ! तूं कोणीकडे पामरा !**
> **ये येथे इतिहासपत्र पडकें वाचून पाही जरा. '**

' हरहर ! महादेव ! ' हीच गर्जना त्यांच्या मनांत कां घुमत होती ? दुसऱ्या बाजीरावाची चीड त्यांना कां येत होती ? ' बाऊ बघतें नांव ल्याप्रत ' ही भीति त्यांच्या मनांत धस्स करीत होती; हें नांव म्हणजे ऐतिहासिक

कीर्तीच नव्हे काय ? राजकीय स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा आढळ केशवसुतांच्या कवितेंत फार ठिकाणीं होत नाही, असा विचार जेव्हा मांडला जातो तेव्हा या दृष्टीने त्यांचें काव्य पाहणें आवश्यक आहे असें वाटतें. केवळ सामाजिक समजल्या गेलेल्या 'स्फूर्ति', 'तुतारी' इत्यादि कविताहि या दृष्टीने पुनः एकवार पाहिल्या पाहिजेत.

जगद्वंद्य विभूति मराठ्यांच्या इतिहासामध्ये आहेत हें कुणाहि सत्यप्रेमी निःपक्षपाती माणसाला मान्य होईल. केशवसुतांचें या इतिहासावर अगदी कवीसारखें प्रेम होतें यांत शंका नाही. पण त्यांची सखोल दृष्टि येथेच थांबत नाही. आणि तें बरोबरच आहे. महाराष्ट्राला तरी इतिहास घडविण्याची प्रेरणा कशी झाली ? रामायण, महाभारत आणि तत्सम प्राचीन काव्यग्रंथांतूनच ना ? एखादी व्यक्ति किंवा एखादें राष्ट्र जेव्हा महान् पराक्रम गाजवून दाखवतें, तेव्हा त्याचे स्वतःचे अंगचे गुणच त्याला कारण होतात हें खरें. पण जितक्या महान् परंपरेचा बारसा ती व्यक्ति किंवा तें राष्ट्र सांगत असेल तितक्या प्रमाणांत तिच्या अंगच्या गुणांची प्रभा अधिक विलसणार हेंहि खरेंच. आणि रामायण, महाभारत आदि ग्रंथांत तर मृत राष्ट्रालादेखील जिवंत करण्याची संजीवनी शक्ति आहे, याबद्दल दुमत होईल असें वाटत नाही. साहजिकच केशवसुतांना या ग्रंथांविषयी आकर्षण उत्पन्न झालें; आणि हीं काव्यें कुठे साकार दिसतील का, अशी काव्यात्म उत्सुकता त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. आणि तसें एकदा घडलें ! तत्काळ त्यांची प्रतिभा बोलूं लागली—

तीच मनोहारिणी ! – जी ठसलीसे मन्मनीं
ती युवती पद्मिनी – जी ठसलीसे मन्मनीं !
सौंदर्यें शालिन्यें पुतळी
ती रामायणमूर्तिच गमली
उदात्त मुद्रा, गंभीर चर्या
यांहीं भारत खचिता वर्या
ती रमणी सद्गुणी – जी ठसलीसे मन्मनीं !

रामायण-महाभारताची साकार मूर्ति पाहण्याची ही कल्पना, त्यांची दृष्टि केवळ काल्पनिक मनोराज्यांत न गुंततां वास्तवांतच उदात्ततेचा शोध कशी घेत होती

याचें प्रमाण आहे. सत्य हें काव्यापेक्षा अधिक आकर्षक आहे,' असें अनेकदा वाटतें हें खरें. केशवसुतांनी आधुनिक मराठी काव्यांत प्रेमकाव्याचा प्रवाह निर्माण केला तो या प्रेमाचा होय, हें विसरतां कामा नये! केशवसुतांना रामायण-महाभारतासारखें प्रेम हवें होतें. रामायण-महाभारतांत शोभावी अशी व्यक्ति दिसल्यास कोणता बुद्धिमान माणूस तिची 'ध्यानधारणा' करणार नाही ? केशवसुत तर कवीच होते! म्हणूनच 'वृक्षावरी वीज जधी पडावी' अशी त्यांची अवस्था झाली! साहजिकच, त्यांना आपण भूत झालों आहोंत असें कधी कधी वाटलें, तर कधी पुनः —

कविच्या हृदयीं जसे गुंगती कवितेचे मधुबोल
किंवा गायकमतींत झुकती ताना त्या सुविलोल
तसे माझिया अन्तर्यामीं तुझिया सौंदर्यांचे
विकास हसती सखे निरंतर, हृद्यंगम जे साचे !

असें वाटत राहिलें! प्रेमाविषयीं ही श्रेष्ठ कल्पना असल्यानेच,

प्रीतिविषय तो जर का परका प्राण्याला जाहला,
तयाचा जन्महेतु खुंटला!

असे उद्गार त्यांनी काढले! असो.

केशवसुतांना त्या आर्यसंस्कृतिविषयी अत्यंत ओढ वाटत होती. म्हणून रा. रा. बळवंत आपाजी दाते यांचें देशप्रेमाने रसरसलेलें वक्तृत्व ऐकतांच केशवसुतांना 'माझिये जातीचें मज भेटो कोणी' ही इच्छा पूर्ण झाल्यासारखें वाटलें आणि ते म्हणाले,

होती श्रेष्ठपदास आर्यजननी जी एकदा पावली
दुर्दैवें परि जी विपद्गणशतीं सध्या असे गांजिली
तीचें दुःख जरा तरी शमविण्या, आम्हांस या भूवरीं
ढाळायास सखेद लोचनजलें तूं धीर आज्ञा करी
"जैजैकार असो तुझा भरतभू!" हा घोष जेव्हा करूं
जैजैकारानि नामहि प्रिय तुझें दाते! तधीं आदरूं!

थोरल्या बाजीरावांच्या मृत्यूची दुःखद आठवण होतांच ते लिहितात,

निजनामाचा 'गाजी' ऐसा अर्थ उरवुनी तो गेला
तर हळहळली आर्यमाउली ऐकुनि त्याच्या निधनाला!

रांगोळी घालणाऱ्या स्त्रीला तर ते 'आर्ये' असेंच पुनः पुनः संबोधतात. तीं आर्यसंस्कृतीचीं प्रतीकें पाहून

तीर्थे, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना,
अन्तर्दृष्टिपुढूनिया सरकल्या, सन्तोष झाला मना !

असें ते म्हणतात. त्यांच्या समाधानाचें हें कारण मुद्दाम लक्षांत घेतलें पाहिजे. तीं प्रतीकें पाहून आर्यसंस्कृतीच्या ज्या वैशिष्ट्यांच्या मुद्रा त्यांच्या मनांवर ठसल्या त्या लगेच त्यांनी काव्यांकित केल्या.

आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व तें उज्ज्वल,
तैसें स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल;
पावित्र्याप्रत गोष्पदें तुळसही, शोभेस हीं सारसें
पुष्पें प्रीतिस, चक्र हें सुचवितें द्वारीं हरी या असे !

आणि मग ही आर्यसंस्कृति जतन करणाऱ्या त्या स्त्रीविषयी अत्यंत आदरभाव उत्पन्न होऊन तिला ते (काव्यांत) म्हणतात,

तत्त्वें मंगल सर्वही विहरतीं स्वर्गीं तुझ्या या, अये
आर्ये ! तूं उपचारिकाच गमसी देवी तयांची स्वयें;
नातें स्नेह निदान ओळख जरी येथे मला आणिती,
होतों मी तर पाद सेवुनि तुझे रम्य स्थळीं या कृती !

केशवसुतांची स्त्रीविषयी ही भावना होती, आणि साध्या साध्या गोष्टींत त्यांना हा आशय आढळत होता ! केशवसुतांच्या स्त्रीविषयक भावनांचा विचार करणाऱ्यांना हें सत्य क्षणभरदेखील डोळ्यांआड करून चालणार नाही. तर, केशवसुतांच्या मतें हा आपला देश, ही भरतभू ही आर्यभूमि आहे. तें आर्यत्व येथे पुनः अवतीर्ण व्हावें, म्हणून ते त्याचें सतत चिंतन करीत आहेत असें वाटतें.

पण इतिहासाचा ठाव घेणारी त्यांची नजर आर्यकालापर्यंत जाऊन थांबत नाही. 'कुठे जातों मी', 'कोणीकडून कोणीकडे' इत्यादि मूलभूत प्रश्नांचा विचार करणाऱ्या या कवीची नजर इतिहासाच्याहि मुळांकडे जाते !

'दिवाळी' या कवितेंत ते म्हणतात,

जो गोपाळ गमे प्रभातसमयीं गाई वनीं चारितां,
वाटे रव्युदयीं नदीवर मुनी अर्घ्यांस जो अर्पितां,
जो भासे दिवसां कृषीवल शिरीं खोवूनिया लोंबरें,
तो आतां ऋतु शारदीय बहुधा शेतांतुनी संचरे.

हें जें त्यांच्या डोळ्यांपुढे उगवत्या सूर्याला अर्घ्यप्रदान करणाऱ्या ऋषींचें चित्र होतें, त्या ऋषीपुढे थेट जाऊन ते थांबतात !

आणि मग जेव्हा भानावर येऊन ते या पृथ्वीवर उतरतात तेव्हा अत्यंत उत्सुक होऊन आपल्या सर्व वृत्ति एकवटून ते म्हणतात,

सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनी उकळीला
शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या आम्हांला !

केशवसुतांना तहान लागली आहे ती त्या सोमरसाची ! जितक्या हर्षभराने ते आद्य ऋषि उत्स्फूर्त गीतें गात गात सोमरस तयार करीत आणि अगदी सख्यत्वाने सगळ्या देवतांना आवाहन करून तो प्राशन करीत, तितक्या हर्ष-भरानेच केशवसुत ' द्या, द्या, आम्हांला तो विलक्षण सोमरस लौकर द्या ' असें म्हणत आहेत. कसलें तीव्र पेय हें ! पण तेंदेखील त्यांना पेला काठोकाठ भरून हवें आहे !

' काठोकाठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ' हें तर त्यांनी ध्रुवपदच केलें आहे !

कां ? केशवसुतांना सोमरसाची एवढी मोहिनी कां वाटते ? अशीं सोमरसाचीं वैशिष्ट्यें तरी कोणतीं ? केशवसुतांनाच समकालीन अशा इंग्रजी बंडखोर कवींत एक उत्तेजक पेय विशेष मान्यता पावलें होतें असें म्हणतात. जवळ ' विशेष ' व्यक्ति घेऊन एका हातांत कवितांची वही आणि दुसऱ्या हातांत उन्मादक पेयाचा पेला घेणारा फारसी कवीहि प्रसिद्ध आहे. केशवसुतांनाहि उष्णता उत्पन्न करणारें एक पेय हवें आहे ! आतांच उल्लेखिलेल्या या दोन उन्मादक पेयांत आणि केशवसुत मागत असलेल्या पेयांत कांही अंतर आहे की नाही ?

' नाही, कांहीहि नाही ! ' असें प्रसिद्ध टीकाकारांचें मत आहे ! प्रा. जोग म्हणतात, " स्फूर्तीला मद्य म्हणण्याची कल्पना आपल्याइकडची नाही. निदान असल्यास तें मद्य नसून सोमरस असावा. सोमाचा उल्लेख केशव-

सुतांनी केलाच आहे. पण ते स्वतः मद्यांत आणि सोमांत फरक करीत नाहीत असें दिसतें. स्फूर्तिरूपी हें मद्य सदैव वटवट करण्याचें (उपदेश करण्याचें) नशिबीं असलेल्या कवि-लेखक लोकांनी घेतल्यास त्यांना स्वतःला क्षणोक्षणीं जगाचे नवनवे रंग दिसूं लागतील; ..." इत्यादि. पण मद्य आणि सोमरस यांत अक्षरशः जमीनअस्मानाचें अंतर आहे हें वेदवाङ्मयाकडे नुसतें वळून पाहिलें तरी दिसल्याशिवाय राहत नाही. हें पाश्चात्य लेखकांनाहि माहीत आहे! रॅगोझिन् हा लेखक १८९५ सालीं (म्हणजे केशवसुतांचाच समकालीन) लिहिलेल्या 'वेदिक इंडिया' या आपल्या ग्रंथांत सोमरसाविषयी म्हणतो, "The following passages, culled here and there, although enthusiastic, depict no abnormal condition of body or mind, but may be produced by the moderate and wholesome use of a rich stimulant." मग वेदांतील सोमरसाचें वर्णन करणारे उतारे देऊन तो पुढे म्हणतो, "Through all this runs a consciousness of the presence of something divine in the liquor which can produce such wonderful effects in those who partake of it." (इंग्रजी उताऱ्यांचा सारांश : सोमरसपानाने शरीरावर किंवा मनावर विकृत परिणाम झाल्याचें वर्णन नाही. या पेयांत कांही दैवी अंश असावा, अशी समजूत दिसते; त्यामुळे या पेयाचे परिणाम आश्चर्यचकित करणारे असत असें म्हणतात.)

या सोमरसपानासाठी अगदी मी मी म्हणविणारे ऋषीदेखील कसे लंपट झालेले असत हें पाहिलें म्हणजे मोठा विनोद वाटतो. कदाचित् आपल्याला सोमरसाची अवीट चव माहीत नसल्यानेच हें हसूं येत असेल! सोमरसाचीं वर्णनें खरोखरच इतकीं विलक्षण आहेत की तीं वाचून आपण आश्चर्यमुग्धच होतों. सोमरस हा सध्या कुठे मिळत नाही, हें तर उघडच आहे. पण वेद-कालींदेखील तो अतिशय दुर्लभ होता. नगाधिराज देवतात्मा हिमालयावर उंच उंच ठिकाणीं वनौषधिराज सोम सांपडत असे. सोम वनस्पति विकत घेण्यासाठी सुंदर वस्त्रें, जनावरें, गाई, एवढेंच काय सोनेंहि द्यावें लागे. पण इतकी भरपूर संपत्ति देऊनहि एखाद्या विक्रेत्याने ती वनस्पति दिली नाही, तर त्याला माराचा प्रसाद देऊन हाकलून देण्यांत येत असे! सोमाचा विचार करतां-करतांच ऋषींना काव्य स्फुरूं लागलेलें असें! मग सोमरस तयार करण्याचा

विधि सामसंगीत सुरू होत असे. न गातां सोमरस केला तर सोमासाठी आसुसलेल्या इंद्रालादेखील तो चालत नसे. इंद्र हा सोमरसासाठी वेडा होत असे. त्याचें नांवच 'सोमपा' (म्हणजे सोम पिणारा) असें ठेविलें आहे ! एके दिवशीं नवऱ्याने बाहेर काढलेली एक रोगी बाई सोमाचा पाला खात होती. इंद्राला वास आलाच ! त्याने घाईने जाऊन तोच सोम प्राशन केला आणि प्रसन्न होऊन तीला हव्या असणाऱ्या सर्व गोष्टी तिला देण्याची व्यवस्था केली ! इंद्र बोलून चालून देवच. त्यांत पराक्रम करणारा, वृत्रवध करणारा ! तेव्हा त्याला सोमाचे तलावच्या तलाव लागत ! तीन-चार-पांच डोक्यांच्या देवांचीं वर्णनें सर्वांना माहीत आहेत. पण भरपूर यथेच्छ सोम प्यायला मिळावा म्हणून इंद्राला दोन पोटें असल्याचें वर्णन आहे ! हा सोमरस तयार होण्याच्या प्रत्येक अवस्थेतून जात असतांना कवींना कल्पनाच कल्पना स्फुरत असत. तयार झाल्यावर सुवर्णपात्रामध्ये दुधासारख्या पेयांत तो मिसळला जात असे. 'हा सोमरस मूळचाच तीव्र, पण गायिलेल्या गीतांमुळे तो अधिकच तीव्र झाला आहे. तरुणी तरुणांत मिसळते त्याप्रमाणे हा सोमरस दुधांत मिसळत आहे', अशा आशयाचीं तीं वर्णनें आहेत ! हा सोमरस सर्व देवतांना बोलावून त्यांच्याबरोबर प्राशन केला जात असे. सोमरसाचीं हीं वर्णनें ऋग्वेदांत सर्वत्रच आहेत. पण ऋग्वेदाच्या दहा मंडलांतील एक सबंध मंडल (मंडल नववें) सोमरसाला वाहिलें आहे, हें सांगितलें म्हणजे पुरें !

सोमरसासंबंधी ऋषींची कल्पना काय होती, हें त्यांच्याच शब्दांत आता पाहूं. 'शुभ आणि संग्रामयोग्य तेज धारण करणारा, स्तोत्रें ऐकणारा, ज्ञाता, महान्, सर्वद्रष्टा व जागरणशील सोम पिळला असतां भांड्यांत शिरो. (९.९७.२)'. 'आम्ही ज्ञान देणाऱ्या सोमाचा रस इच्छितों. (९.१०.८.)'. 'शहाणे लोकच त्याला (सोमाला) प्राप्त करतात. जो (सोमप्राप्तीचें) कर्म करण्यास असमर्थ असतो, तो खालीं (नरकांत) पडतो. (९.७३.९.)'. 'बायको नवऱ्याला देते त्याप्रमाणे सोम सुख देतो... हे सोमा, स्तुत्य असा तूं लढाईत जागृत असावेस. (९.८२.४)'. 'स्तवनप्रिय आणि सत्यस्वरूप अश्वीहो ! हा (सोमरस) तुमच्या मनाचीं कपाटें उघडील. (१.४६.५.)'. 'सोम पिऊन उत्साह प्राप्त झाल्यावर (इंद्र) सुंदर भाषणें बोलतो. (१०·४४·८.)'. थोडक्यांत म्हणजे, सोमांत अपरिमित सामर्थ्य आहे (९.४२.३.) आणि

तो सर्वगुणसंपन्न आहे. (१.११९.१०.). हें वाचल्यानंतर स्वाभाविकपणेंच सोमरसपानाने मनांत कोणते विचार उत्पन्न होत असतील हें जाणण्याची आतुरता, जिज्ञासा मनावर होते. ज्याचें सोमावर अमर्याद प्रेम त्या इंद्रालाच सोम प्यायल्यावर काय वाटतें तें पाहा. हा लबरूप इंद्र गातो आहे, “ गाय देऊं की घोडा देऊं असें मन असतें. कारण, पुष्कळ वेळां मी सोम प्यायलों आहें. (आणि म्हणून संतुष्ट झालों आहें). अत्यंत वेगाने वाहणारे वारे झाडें हालवतात त्याप्रमाणे प्यालेला सोम मला झोकांड्या देत आहे. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. जलद जाणारे घोडे रथ ओढतात. त्याप्रमाणे प्यालेला सोम मला ओढीत आहे. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. हंबरणारी गाय जशी प्रिय पुत्राकडे जाते त्याप्रमाणे स्तोत्रें माझ्याकडे येत आहेत. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. सुतार रथाची बैठक मनापासून करतो, त्याप्रमाणे मी अंतःकरण-पूर्वक स्तोत्रें ऐकतों. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. पांच वर्णात्मक असणारें सर्व जग माझा दृष्टिक्षेप टाळूं शकत नाही. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. द्यावापृथ्वीची जोडी माझ्या एका बाजूइतकीहि नाही. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. मीं आपल्या मोठेपणाने द्युलोकाला कमी केलें आहे आणि विशाल पृथ्वीलाहि कमी केलें आहे. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. मला असें वाटतें की ही पृथ्वी येथे ठेवावी किंवा तेथे ठेवावी ! कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. मी ह्या पृथ्वीला किंवा सूर्याला येथे नष्ट करीन किंवा तेथे नष्ट करीन. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. मीं आपला एक भाग द्युलोकांत ठेवला आहे आणि दुसरा खालीं पृथ्वीवर ठेवला आहे. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें. हवि ग्रहण करणारा व सुशोभित असणारा मी देवांकडे हवि वाहून नेतों. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें.”

दहाव्या मंडलांतील ११९व्या सूक्ताचें श्री. चित्रावशास्त्री यांनी केलेलें हें भाषांतर आहे. रॅगोजिन्‌चें भाषांतर मात्र जरा वेगळें आहे. त्याने, हें सूक्त एका ऋषीनेच म्हटलें आहे अशा रूपांत हें भाषांतर केलें आहे. एक ऋषीच हें म्हणत आहे अशी कल्पना करून आणि तसे बदल लक्षांत घेऊन हें सूक्त मुद्दाम पुनः वाचलें म्हणजे त्याचें महत्त्व लक्षांत येतें. नाही तरी ही गोष्ट खरीच की, एका ऋषीलाच तें स्फुरलें आहे आणि इंद्राशीं एकरूप होऊन तो हें म्हणत आहे; त्या विलक्षण भावनांचा प्रत्यय आल्याने त्याच्या तोंडून उत्स्फूर्त काव्याचा

ओघ वाहत आहे. आणि हें सूक्त व ही भूमिका ध्यानांत घेऊन केशवसुतांची 'स्फूर्ति' ही कविता वाचली असतां काय प्रत्यय येतो ?

'स्फूर्ति' ही कविता लिहितांना केशवसुतांच्या मनांत हें सूक्त असलें पाहिजे, असें सहजच मनांत येतें. इतकेंच काय, ऋग्वेदांतील अनेक स्थळांचा उल्लेख या कवितेंत प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें येऊन गेलेला आहे. 'काठोकाठ भरूं द्या पेला' असें केशवसुत म्हणतात. 'सोमाचीं काठोकाठ भरलेलीं तीस भांडीं इंद्राने एका घोटासरशी पिऊन टाकलीं. (८·७७·४.)' 'गा मग सुचतिल तीं गाणीं' असें ते सांगतात. 'तुतारी' ऐकून भोवताली जमलेल्या कवींनाच ते हें म्हणत आहेत, हें उघड आहे. वेदकालीन ऋषीहि आपल्या मित्रांना म्हणतो, 'हे स्तोतेहो, सोमरूपी अन्नाने उत्साहित होऊन ज्ञानपूर्ण, श्रवणीय आणि समर्थ अशा इंद्राचीं मोठमोठालीं स्तोत्रें जशीं कराल तशीं तुम्ही गा. (८·४६·१४.)' या पेयाच्या उष्णतेने द्यावापृथ्वी चटकन् वितळून त्यांत मिसळायला हवींत, असें केशवसुत म्हणतात. ऋषि म्हणतात, 'जो सोम ह्या दोन आयांच्याप्रमाणे द्यावापृथ्वीचें सार ग्रहण करतो तो सोम सर्व मादकांतील मुख्य आहे. (९·१८·५.)' 'देवदानवां नरें निर्मिलें, हें मत लोकां कळवूं द्या !' असें केशवसुत म्हणतात. या चरणाला वेदांतून कांही आधार लाभणार नाही, असें कुणाला वाटेल. पण एक ऋषि म्हणतो, 'हे इंद्रा, तूं आमच्या स्तोत्राने मोठेपणा पावला आहेस.' ऋषींची आपल्या सामर्थ्याविषयी ही जाणीव होती ! (१०·५०·४.) पुढे एके ठिकाणीं म्हटलें आहे, 'ज्या महर्षींनी स्थावर-जंगमात्मक सृष्टि निश्चल असतांना हे सर्व प्राणी निर्माण केले, ते सर्व ऋषि स्तोते स्तोत्रांनी स्तवितात, त्याप्रमाणे ह्या विश्वकर्म्याकरता सर्व प्रकारच्या चरुपुरोडाशादिक पदार्थांचा होम करतात. (१०.८२.४.)' प्रलयाच्या वेळीं मनूला होडीमध्ये ऋषि घेण्यास सांगितलें होतें, कारण नवी सृष्टि निर्माण करणें हें त्यांचें कार्य. या सूक्तांतहि असाच उल्लेख आहे. वर स्वर्गांत कुणी तरी यज्ञ करतें, त्यामुळे निसर्गांत अनेक घटना घडतात; यज्ञ आणि या घटना यांचा दृढ संबंध आहे; पृथ्वीवरील यज्ञ म्हणजे वर घडणाऱ्या घटनांची प्रतिकृतीच; त्यामुळे यज्ञ केला की त्या घटना घडणारच; हें सर्व ऋषींना कळतें; अशीं वेदांत वर्णनें आहेत. म्हणजे ऋषींची निसर्गशक्तींवर सत्ता असते ! आणि आर्यांचे देव म्हणजे या निसर्गशक्तीच ! अग्नि हा देव

पृथ्वीवर वनस्पतींत सांपडतो. सोमरसांतील उष्णतेने तर तो प्रत्यक्षच जाणवतो. मग सोमरस पिऊन पिऊन पिणारे अखेरीस तल्लीन होऊन, 'मनांत दंग होऊन' उद्गारतात, "आम्ही सोम प्यालों आहोंत. आम्ही अमर झालों आहोंत. आम्हीं देवांना जाणलें आहे." (पाहा–वेदिक इंडिया, पृ. ३९२). आणखी एके ठिकाणीं म्हटलें आहे, 'हे इंद्रा, तुझें आणि विमद ऋषींचें सख्य कधीहि नष्ट न होवो.' (१०·२३·७). अशा प्रकारचीं वर्णनें ऋग्वेदामध्ये अनेक ठिकाणीं सांपडतात. 'देवदानवां नरें निर्मिलें' ही कल्पना केशवसुतांसारख्या कवीला स्वतःलाच सुचणें अशक्य नाही; पण ती वेदांतील विचारांना विरोधी नाही. वेदांतलि विचार पाहून त्यांची ती कल्पना दृढ झाली असेल, आणि ती लोकांना सांगण्याची इच्छा त्यांच्या मनांत उद्भवली असेल. पृथ्विवर कुणी शंभर यज्ञ करूं लागला, तर इंद्राला आपली 'शतक्रतु–शंभर यज्ञ करणारा' ही पदवी जाईल की काय असेंहि वाटे आणि तो त्या मानवाच्या कार्यांत अडथळे आणी वगैरे गोष्टी प्रसिद्ध आहेत. येथेहि ऋषींचेच विचार केशवसुत पुढे चालवीत आहेत, असें वाटतें. ऋषींनी सांगितलें आहे, "रम्य स्तोत्रें बनवा. कर्मे करा. पैलपार जाण्यासाठी वल्ह्यांनी सज्ज असलेली नाव तयार करा व तयार असा. हे मित्रहो, यज्ञ पुढे न्या. (१०·१०१·२)" म्हणूनच जणू कांही केशवसुत कल्पनेची नौका करून व्योमसागरावर जायला निघाले आहेत, आणि त्याच ऋषींच्या आत्मप्रत्ययांत थोडी भर घालून 'अडवतील जर देव, तरी। झगडूं त्यांच्याशीं निकरीं' असें म्हणत आहेत, असें वाटतें. 'उडुरत्नें या गरिब धरेला तेथुनि फेकुनिया देऊं', असें केशवसुत म्हणतात. 'पिळलेला सोम दात्यांना पृथ्वीवरील, अन्तरिक्षांतील आणि स्वर्गीय अशी सर्व संपत्ति देवो', असें वर्णन वेदांत आहेच. (९·३६·५.) पुढे 'निजती ते ठारचि मरती', असें केशवसुत म्हणतात. अग्नि ही देवता कशी जागृत आहे, हें सांगायला नकोच. पण सोम हाहि 'जागरूक' आहे अशी त्याची स्तुति केलेली आहे. (९·३६·२.) 'आम्हांला झोपेने त्रास देऊं नये', अशी एक प्रार्थना आहे. (८·४८·१४.) आणि 'पराक्रमहीन लोक दुःख पावतात' असें एके ठिकाणीं स्पष्ट सांगितलें आहे. (४·५·१४·). 'जुलुमाचे या करूं पहा तुकडेतुकडे' असें केशवसुत म्हणतात. वैदिक आर्य तर जुलुमाचा नाश करण्यासाठी सतत सज्जधनु होतेच. 'सर्व

दुष्टांचा नायनाट करा. (१·८६·१०)' ' सत्याचा नाश करणाऱ्या पापी... अघांचा मी हिंसक आहें. (१०·२७·१·) ' ' हे अग्ने, मनुष्यांचा मनुष्य फार द्रोह करतात. म्हणून तूं आमच्यावर चालून येणाऱ्या शत्रूंना जाळून टाक. (३·१८·१·)' ' राक्षसांचा नाश करीत, तेजाने प्राचीनकालाप्रमाणे प्रकट होत पावक सोम पाझरतो. (९·४९·५·)'. परंतु या कवितेंतील सर्वांत महत्त्वाचे शब्द वाटतात ते ' रूढिचे दास झणीं ते खवळूं द्या ! ' हे. कारण ही कल्पनाच अगदी आधुनिक आहे, अशी प्रचलित कल्पना आहे. पण वस्तुस्थिति तशी नाही. वेदांतील आर्यांना केवळ सत्याचीच ओढ होती. ' आम्हीं उत्तम तऱ्हेने विवेकदृष्टीने पाहावें म्हणून आम्हांला, ईश्वरा, पुरीं शंभर वर्षें आयुष्य दे, ' असें ते म्हणत. (२·२७·१०·) ' हे इंद्रा,...तूं सर्व जगभर सत्यधर्माचा प्रसार कर, त्याचा सर्वत्र प्रवेश असो. (३·३०·६·)' ' नाव वल्हविणाऱ्या-प्रमाणे हरितवर्ण सोम सत्याच्या मार्गावरील भाषा बोलतो ', इत्यादि ठिकाणीं रूढींवर भर न देतां सत्यावर भर दिला आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. हें सत्य म्हणजे केवळ कर्मकांडविषयक सत्य नव्हतें. तर जीवन—सृष्टि—विश्व या सर्वांतील सत्य शोधून घेण्याची तीव्र जिज्ञासा त्या आर्यांच्या मनांत होती. म्हणूनच देवांविषयींहि शंका घेण्यास ते मागेपुढे पाहत नसत. ' अग्नि हा देव ! पण जन्मल्याबरोबर आपल्या जन्मदात्यांनाच (काष्ठांनाच) खाऊन टाकतो. हें कसें ?' असें एक ऋषि विचारतो ! ते ऋषि देवांची उपासना करीत होते; कारण आपल्या सत्यसंशोधनांत त्यांची मदत होईल अशी आशा त्यांना वाटत होती. विश्वाचें रहस्य समजायचें तर बुद्धीहि विशाल, तेजस्वी, प्रेरणा देणारी, स्फुरण पावणारी पाहिजे. याच कारणासाठी अशाच प्रकारची बुद्धि द्या म्हणून ते ऋषि देवांच्या मागे लागले होते. सत्यावर इतकें मनापासून प्रेम करणारी व्यक्ति रूढीची दास होऊं शकत नाही, हें सूर्यप्रकाशासारखें स्पष्ट आहे.

अशा रीतीने ' स्फूर्ति ' ही कविता वैदिक वाङ्मयांतून निर्माण झाली आहे, यांत संदेह नाही. खरें म्हणजे, हें असें सिद्ध करून दाखविण्याची तरी काय आवश्यकता ? स्वतः केशवसुतच, वेदकालीन थोर ऋषींनी जो सोमरस निर्माण केला तो मागत आहेत. केशवसुतांनीं स्वप्राणाने ' तुतारी ' फुंकतांच त्यांच्याभोवतीं कविमंडळ कसें जमा झालें, हें आता

सर्वांना माहीत आहे. या मंडळांत सर्वांसमवेत घेण्यासाठी केशवसुतांना एक पेय हवें होतें, हें स्वाभाविकच झालें. आणि म्हणून केशवसुतांनी सोमरसाची मागणी केली. त्यांची स्फूर्ति वेदांपासून होती. म्हणूनच त्यांनी या वैदिक पेयाची मागणी केली. हीच त्यांची स्फूर्ति इंग्रजी वाङ्मयांतूनच असती, तर त्यांनी एखादें इंग्रजी पेय मागवलें असतें. आणि असें पेय मिळवणें त्यांना अशक्य नव्हतें. त्या मधल्या स्थितीतल्या अनेकांनी इंग्रजी पेयाचाच स्वीकार केला होता ! आणि असें इंग्रजी पेय पिणेंच योग्य आहे असें वाटलें असतें तर, देवदानव हे मानवनिर्मित आहेत असें बिनदिक्कतपणें म्हणणारा हा माणूस तें प्यायल्यावांचून राहिला असता असें वाटत नाही. केशवसुतांच्या ज्या निराशेचा उल्लेख पुनः पुनः केला जातो ती निराशा, तसें पाहूं गेलें असतां, इंग्रजी पेय मागविण्यासाठी सबब म्हणून त्यांना सांगतां आली असती. पण परिस्थितीपासून पलायन करण्यासाठी त्यांना एखादें पेय नको होतें. तर परिस्थितीचें संपूर्ण वास्तव दर्शन करून देणारें आणि नवीन कल्पना सुचवून चालू परिस्थिति आमूलाग्र बदलवून टाकण्याचें सामर्थ्य देऊं शकणारें पेय त्यांना हवें होतें. तें त्यांच्या मर्मग्राही दृष्टीला वेदांतील सोमरसांत दिसलें ! ' म्हणेल जग आम्हांस मद्यपी पर्वा कसली मग त्याची ? ' असें ते विचारतात, या ओळीचा अर्थ नीट पाहिलें असतां सहज लक्षांत येईल. ध्येयाची वाटचाल करणारे पुरुष सामान्य माणसांना नुसते वेडेपीरच वाटत असतात, या अर्थानें केशवसुत या शब्दांतून बोलत आहेत. ' जग आपल्याला मद्यपी म्हणेल कारण जगाला आपलें खरें स्वरूप लवकर कळणार नाही. पण जगाने ' दारुड्या ' अशी हाक मारली तरी ती मनावर घेण्याचें आपल्याला काय कारण ? आपण मागत आहोंत सोम, दारू नव्हे ', असा या ओळीचा अर्थ आहे. पण सोम म्हणजे दारूच असें समजणाऱ्यांनी ' केशवसुतांना सोम हवा, म्हणजे मद्य हवें, म्हणजे केशवसुत मद्यपी ' अशी समजूत करून घेतली असेल तर ती शक्य तितक्या लवकर टाकून द्यायला पाहिजे; कारण ती टाकून दिल्याशिवाय केशवसुतांचें खरें स्वरूप कळणार नाही. केशवसुत सोम आणि मद्य यांत फरक करीत नाहीत असें म्हणणें म्हणजे केशवसुतांनी व्यक्त केलेली शंका खरी करणेंच होय.

या ठिकाणीं कुणी विचारील, " केशवसुतांनी वेद वाचले हें कशावरून ? त्यांना संस्कृत तरी येत होतें का ? आणि ' सोमरस द्या ' अशी याचना ते कां करतात आणि कुणाकडे करतात ? "

केशवसुतांनी क्रांति केली आहे हें ज्यांना मान्य आहे, त्या बहुतेकांना त्यांनी ती क्रांति जाणीवपूर्वक केली आहे हें मान्य आहे. ते स्वतः आपल्याला एक अलौकिक जाणीव झाली आहे असें म्हणतातच. तसेंच आपण कांही विशेष काव्य करणार आहोंत याचीहि जाणीव त्यांना जवळजवळ सुरुवातीपासून होती. सामान्य बुद्धीच्या माणसाच्या बाबतींत हें शक्य होईल असें वाटत नाही. तसेंच, त्यांचा सरल स्वभाव लक्षांत घेतां, आर्य, वेद, ऋषिमुनी, सोम, होम इत्यादि अनेक गोष्टींचे उल्लेख त्यांनी पुरेशी माहिती न मिळवतां केले असतील असें वाटत नाही. अपुऱ्या माहितीने अशी स्फूर्ति होईल काय ? केशवसुत हे त्या मधल्या स्थितीचे प्रातिनिधि नसून, देशाला जाग आणण्यांत गुंतलेल्या विचारवंतांपैकी एक आहेत, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. तसेंच इंग्रजी विद्या हें वाघिणीचें दूध आहे हें एकीकडे सांगत असतांनाच लगेच ' येथील तृणाला जरी कुणी अनार्यता लावली तरी तें खपणार नाही ' असें चिपळूणकर आवेशाने सांगत होते. आपल्या समाजरूपी जुनाट वृक्षाच्या खूप शाखा तोडल्या पाहिजेत, शिमग्यासारखे सण नष्ट केले पाहिजेत, असें सांगत असतांना आगरकरहि दिवाळीसारखे सण जतन करायला पाहिजेत, असेंच प्रतिपादन करीत होते. केशवसुतांची ' दिवाळी ' कविता या ठिकाणीं ध्यानांत येते. ' केसरी ' हें तर राष्ट्राच्या त्या जाग येत असलेल्या स्थितीचें नेमकें प्रतीकच होतें. वेदप्रेमी लोकमान्यांनी गणेशोत्सव, शिवाजीउत्सव सुरू केले होते. वेदांविषयीच बोलायचें तर, केशवसुतांच्याच काळीं स्वामी विवेकानंद वेदांताची पताका सगळ्या जगांत फडकवीत होते ! केशवसुतांच्या मनावर याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला असेल काय ? मराठींतच पाहायचें तर पुढील ग्रंथ त्या वेळीं प्रकाशित झाले होते आणि त्यांतले कांही चांगलेच गाजले होते.

वेदोक्तधर्मप्रकाश : विष्णुबुवा ब्रह्मचारी
पुरुषसूक्त व्याख्या : स्वधर्महितेच्छु
वेदाविषयी निबंध : का. बा. मराठे

वैदोक्त धर्माचा विचार : मं. इ. नेरूरकर

हें सगळें लक्षांत न घेऊन कसें चालेल ? श्री. माडखोलकर लिहितात, " चिपळूणकरांनी ज्या वयांत निबंधमाला काढून मिशनरींच्या दुर्मतदलनाला प्रारंभ केला, त्या वयांत यांचा (म्हणजे केशवसुतांचा) धर्मांतर करण्याचा विचार चालला होता." आता, काव्य म्हणजे आत्माविष्कार ही व्याख्या केशवसुतांनी आधुनिक मराठींत रूढ केली, तेव्हा धर्मांतरासारखा सगळें अस्तित्वच हादरवून सोडणारा प्रश्न जर त्यांच्या मनांत इतक्या आवेगाने आला असेल, तर त्याचा पुरावा त्यांच्या काव्यांत कुठे तरी आढळायला पाहिजे. पण असा कांही पुरावा सांपडतो काय ? आपले कविमित्र टिळक यांच्या धर्मांतरामुळे (सन १८९५) त्यांच्या मनांत अनेक विचार उत्पन्न झाले असतील, आणि त्यांनी सहानुभूतीने त्यांचा विचार केला असेल. पण त्यांच्या मनांतील दृढ स्वदेशप्रेमामुळे आणि स्वधर्मप्रेमामुळेच त्यांनी धर्मांतर केलें नाही, असें वाटतें. ' आपल्या हिंदु समाजांत रूढींचें प्राबल्य झालें आहे म्हणून दुसऱ्या धर्माच्या समाजांत शिरणें म्हणजे फक्त शृंखलांतर आहे, अविचार आहे ', या आशयाचे गुलामांच्या राष्ट्राविषयी कळकळीने विचार करणाऱ्या आपल्या गुरूंचे—आगरकरांचे—उद्गार केशवसुत कधी विसरले असतील, अशी कल्पना करवत नाही. एवढेंच नव्हे, तर आपल्याला जें कांही हवें आहे तें वैदिक धर्मातच मिळेल अशा विश्वासानेच त्यांनी सोमरस मागितला आहे. त्यांचे ते शब्द अगदी लख्ख स्पष्ट आहेत. त्यांची ' स्फूर्ति ' ही कविता (सन १८९६) म्हणजे एक आधुनिक सूक्तच वाटते. केशवसुतांचें सर्व तत्त्वज्ञान या कवितेंत आलें आहे, त्यांच्या सबंध व्यक्तिमत्त्वाचें प्रतिबिंब या कवितेंत स्वच्छ पडलें आहे हें सहज दाखवून देतां येईल. केशवसुतांची ही कविता संपूर्णपणें प्रसादपूर्ण, ओजस्वी, यशस्वी आहे हें टीकाकारांना मान्य झालेंच आहे. पण वरील सर्व विवेचन ध्यानांत घेतल्यावर, केशवसुतांची एकच एक कविता निवडायची झाली (हें करणें किती अवघड आहे, हें रसिकांना सांगायला नको) तर, स्वतः केशवसुतांनीहि हीच कविता निवडली असती असें मनात येतें !

केशवसुतांच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानाविषयी प्रा. देशपांडे लिहितात, " गणित आणि संस्कृत हे विषय चांगले नसल्यामुळे केशवसुत मॅट्रिकच्या

परीक्षेत दोनदा अनुत्तीर्ण झाले, असें केशवसुतांचे बंधु सी. के. दामले सांगतात आणि ' संस्कृत भाषेचा त्यांचा अभ्यास गाढ असावा ' असा राजाध्यक्ष अंदाज बांधतात ! असो." प्रा. म. वि. राजाध्यक्ष यांचें मूळ विधान खरें म्हणजे सरळ आहे. ते म्हणतात, "संस्कृत भाषेचा त्यांचा अभ्यास गाढ असावा याचा पुरावा भाषांतरापेक्षाहि त्यांच्या संस्कृत शब्दांच्या रेखीव योजनेत आढळेल." संस्कृत भाषेचा अभ्यास असल्यावांचून केशवसुतांनी संस्कृत शब्द योजिले आहेत काय ? इतकेंच काय, मराठींत रूढ नसलेले जे संस्कृत शब्द केशवसुतांनी वापरले आहेत ते मग कसे ? केशवसुतांच्या कवितांत सुरुवातीलाच संस्कृत-वरून घेतलेल्या कविता सापडतात असें नाही. त्यांच्या कवितांच्या शेवटी शेवटीदेखील कच-देवयानी आणि राजा शंतनु या संस्कृत व्यक्ति आपल्याला भेटतात. संस्कृतचें प्रेम त्यांच्या काव्यांत सर्वत्रच आहे. कोणतेंहि तत्त्व सांगायचें झालें की ते संस्कृतचाच आश्रय घेतात.' कुत्राप्यस्मि च सर्ववस्तुषु ', 'सत्त्वाचा ' उदयोऽस्तु ' करा ', "तम अल्प-द्युति बहु ", इत्यादि काव्यपंक्ति काय दर्शवितात ? तत्त्व सांगत असतांना त्यांना संस्कृतचा अवलंब करावासा वाटतो. या वस्तुस्थितीतच केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाचें रहस्य दडलेलें आहे. संस्कृत ही ऋषिमुनींची, महाकवींची भाषा ! केशवसुतांना त्या सुसंस्कृत जीवनाचा ध्यास होता. त्यांच्या काव्यांत अस्सल मराठी शब्द कित्येक ठिकाणीं आढळतील. बोलून चालून मराठीच कवि होते ते. पण संस्कृतचा त्यांच्या-वरील प्रभाव कधीहि कमी झाला आहे, असें दिसत नाही. याचें आकडे-शास्त्राच्या साह्याने कुणी संशोधन करून पाहील तरी हेंच सिद्ध होईल असें वाटतें. अर्थात् नुसत्याच संस्कृत शब्दांचा त्यांच्या काव्यावर प्रभाव पडला आहे असें म्हणणें म्हणजे त्यांनी संस्कृतांतील फक्त ' अमरकोश ' पाहिला होता असें म्हणण्याजोगें होईल. त्यांच्यावर संस्कृतचा म्हणजे संस्कृत वाङ्मयाचा, विशेषतः वेदवाङ्मयाचा प्रभाव आहे. कान्याकुन्या मराठी माणसाला अखिलभारतीय संस्कृतिविषयी जिव्हाळा वाटतो; ' हिंदवी स्वराज्य व्हावें हें श्रीचे मनांत आहे ' हीच महाराष्ट्राच्या राजर्षीची प्रेरणा ! याचमुळे केशवसुतांना संस्कृतविषयी प्रेम वाटतें. परीक्षेत ते संस्कृतांत अनुत्तीर्ण झाले म्हणून त्यांचें संस्कृत भाषेवर ' प्रेम ' नव्हतें, असें

म्हणतां येईल असें वाटत नाही. परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या अनेक विभूति महाराष्ट्राच्या परिचयाच्या आहेत ! आणि, जी गोष्ट आपल्याला व्यावहारिक दृष्टीने जमत नाही तिच्यावर प्रेम करूं नये, असा दंडक घातला तर काय होईल याची कल्पना करण्याने कांही काळ मनाचें रंजन होऊं शकेल ! केशवसुतांचें संस्कृतवर प्रेम कसें होतें याचा पुरावा ' स्फूर्ति ' या कवितेच्या निमित्ताने वर दाखवलाच आहे. केवळ एवढ्या एका कवितेपुरताच वेद त्यांनी वाचला असेल असें कुणालाहि म्हणावेंसें वाटणार नाही. त्यांच्या वेदवाचनाचा तो एक सारभूत आविष्कार आहे.

पण ते ' शेष तयाचा (सोमाचा) द्या ' असें कां म्हणतात ? हा प्रश्न ऐकतांच ' एक तुतारी द्या मज आणुनि ' ही ओळहि आठवते. कविप्रतिभेविषयी अत्यंत महान् कल्पना असलेल्या या कवीने असें कां म्हणावें, याचें कुणाकुणाला आश्चर्य वाटतें. पण यांत विसंगति नाही असें दाखवून देतां येईल. कवीची प्रतिभा ही ' अत्यद्‌भुत गूढ शक्ति ' आहे हें मान्य करूनहि तिला परंपरेच्या वारशाची आणि निरनिराळ्या ठिकाणीं मांडल्या गत असलेल्या विचारांची जोड मिळणें आवश्यक आहे. हाच ध्वनि यांतून निघतो, असें वाटतें. आणि म्हणून हें महान् कार्य करणाऱ्यांना केशवसुतांनी हें आर्त आवाहन केलें आहे असें मनांत येतें. केशवसुतांनी काव्याची थोरवी गायिली आहे, ती केवळ ते स्वतः कवि होते म्हणून नव्हे. तर त्यांच्या दृष्टीने काव्य हें जीवनाला सर्वांगांनी कवटाळणारें आहे म्हणून. जीवन हें महान् आहे, म्हणून काव्यहि महान् आहे. वरील विवेचनाला हें स्पष्टीकरण धरूनच आहे, हें उघड आहे.

मराठी वाङ्मयाच्या प्रारंभीं संत ज्ञानेश्वरांनी—

‘ ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ॥
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ ’

अशी वेदांचीच आठवण काढली. प्राचीन मराठी वाङ्मयाचा कळस संत तुकारामांच्या—

‘ वेदांचा तो अर्थ । आम्हांसीचि ठावा ॥
येरांनी वहावा । भार माथा ॥ ’

आणि

‘ आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ॥
बोलिले जे ऋषि । साच भावें वर्ताया ॥ ’

या अभंगवाणीने झाला. आणि आधुनिक मराठी काव्याचा जन्म —

‘ सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनी उकळीला ।
शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या आम्हांला ॥ ’

या कवि केशवसुतांच्या गीताने झाला ! हा योगायोग उगीचच झाला आहे का ? असें वेदांचें रहस्य तरी काय ? तें समजावून घेणें म्हणजेच केशवसुतांची भूमिका पाहणें !

— २ —

केशवसुत

(उत्तरार्ध)

अमृत परंपरा

" वाग्देवीसुत जन्मला अपुलिया ग्रामांत; यालागुनी
जैजैकार करा, सुरां परिसवा हा मंगलाचा ध्वनि ! "

असे उद्‌गार आपल्या जन्माच्या वेळीं वनदेवतांनी काढले, असें केशवसुत म्हणतात. केशवसुतांच्या भूमिकेवर हे उद्‌गार प्रकाश टाकणारे आहेत. कवि हा जन्मावाच लागतो असें म्हणतात, हें या ठिकाणीं सहजच लक्षांत येतें. काव्य हें आपलें जीवितकार्य आहे, असें केशवसुतांना वाटत होतें, हें उघड आहे. हीच जाणीव त्यांच्या—

" याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं
तेणें सर्वहि डोलतील जन हे हर्षे कदाचित् भुवि ! "

या बोलांतून प्रखरपणें बाहेर पडली. आपण कोणत्या स्वरूपाचें गाणें गाणार आहोंत, याविषयीहि त्यांची निश्चित कल्पना होती—

" जो पूर्वीं गुण पुण्यभूमिवरि या अत्यन्त वाखाणिला,
तें हें दिव्य कवित्व दुर्विधिवशें हीनत्व की पावलें,
त्याची बूज करावया न अगदी कोणी कसें राहिलें !
गाणें जें परिसावया कविपुढे राजेशाही वांकले,
यन्नादेंच लहानथोर सगळे गुंगून वेडावले,... "

पद्यपंक्तीची तरफ हें विलक्षण साधन आपल्या हातीं विधीनेच दिलें आहे, असें ते म्हणतात हेंहि प्रसिद्धच आहे.

यावरून काय दिसतें ? आबालवृद्ध सर्वांनी, राजेशांनी, एवढेंच काय सुरां-सारख्या श्रेष्ठ रसिकांनीसुद्धा ऐकून भुलून ' माता धन्य पिता धन्य धन्य धन्य

सुहृत्सखे ' असे उद्‌गार काढावेत, अशा प्रकारचें दिव्य काव्य केशवसुतांना गायचें होतें. विधीचाच वरदहस्त असल्यानंतर हें अशक्य आहे काय ? आणि अशा प्रकारच्या काव्याची जी आर्ष, वैदिक, अमृतपरंपरा आहे, तीच परंपरा त्यांना पुढे चालवायची होती ! आत्ताच उद्‌धृत केलेल्या काव्यचरणांतील कल्पना संपूर्णपणें भारतीय आहेत, हें सिद्ध करून देण्याची आवश्यकता वाटत नाही. प्रा. जोग म्हणतात, " केशवसुतांनी आपल्यास नवीन प्रकारचें म्हणजे इंग्रजी पद्धतीचें काव्य लिहावयाचें आहे हें याच कालांत, अजाणतां कां होईना, निश्चित केलें असावें असें वाटतें. इ. स. १८८६ सालींच लिहिलेल्या आपल्या ' दुर्मुखलेला ' या कवितेंत त्यांनी ' याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं ' असें म्हटलें आहे, व या कवितेचें स्वरूप सुनीतानुकूल असें ठेविलें आहे. " इंग्रजी धर्तीचा उल्लेख स्वतः केशवसुत कुठे करतात काय ? उलट, आपलें काव्य भारतीयच आहे असे उद्‌गार त्यांच्या काव्यांत जाणीवपूर्वक किती वेळां येतात, हें पाहण्यासारखें आहे. नमुन्यादाखल कांही उदाहरणें वर दिलींच आहेत. केशवसुतांच्या काव्याला प्रस्तावना लिहितांना प्रा. जोग म्हणतात, " पण संस्कृत काय किंवा प्राचीन मराठी काव्याचे संस्कार काय, इंग्रजी काव्याच्याविषयी त्यांना जें आकर्षण होतें त्यापुढे कोठच्या कोठे पार वाहून गेले असें दिसतें. हें आकर्षण इंग्रजी कवितेच्या अंतर्बाह्य स्वरूपाविषयी त्यांना वाटत होतें, आणि फारच जबरदस्त होतें यांत शंका नाही. " केशवसुतांचे स्वतःचे शब्द आणि टीकाकारांचे हे विचार यांचा मेळ घालायचा म्हणजे, वाग्देवीच्या पोटीं हा बाळ जन्माला आला तो इंग्रजी काव्य गाण्यासाठी, विधीने त्यांच्या हातीं काव्यपंक्तीची तरफ दिली ती इंग्रजी काव्याची, शारदेने जो मंत्र त्यांच्या कानीं दिला आणि जें काव्य शारदेचेंच तें सर्व इंग्रजी, सुरांना ते ऐकवणार होते तें इंग्रजीच...असें म्हणावें लागणार नाही काय ? पण असें म्हणतांना ' विसंगती हा विनोदाचा आत्मा आहे ' ही व्याख्या आठवल्यावांचून राहते काय ? केशवसुतांचें काव्य इंग्रजी म्हणायचें, तर केशवसुत ज्या दिव्य काव्याच्या सनातन भारतीय परंपरेचा उल्लेख करतात आणि चिपळूणकरांप्रमाणे, केवळ दुर्दैवानेच या परंपरेला आज वाईट दिवस आलेले आहेत असें म्हणतात त्या त्यांच्या परंपराप्रेमाचें काय करायचें ? केशवसुतांच्या कवित्वाविषयी शंका असूं नये असें प्रा. जोग म्हणतात. त्याअर्थी केशवसुतांनी

जें परंपराप्रेम स्पष्टपणें व्यक्त केलें आहे त्याविषयींहि त्यांना शंका वाटणार नाही असें सहजच मनांत येतें. आणि केशवसुतांची ही भूमिका लक्षांत घेऊनच त्यांचें काव्य वाचायला नको काय ? ' याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं ' या ओळींतील शेवटचे दोनच शब्द ठळकपणें लक्षांत घेऊन चालेल असें वाटत नाही. तर ' विधिवशात् ' हा शब्दहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. काव्य हें करून करतां येत नाही, तें कांही ना कांही प्रमाणात उत्स्फूर्तच असावें लागतें; आणि ही दैवी स्फूर्ति आपल्याला लाभली आहे, तिच्या योगाने आपल्या हातून काव्य निर्माण होईल, याची आत्मविश्वास उत्पन्न करणारी प्रेरक जाणीव त्यांना झाली होती, हाच या चरणाचा अर्थ आहे, असें दिसतें. केशवसुतांचा भर स्फूर्तीवर किती होता हें त्यांच्या ' स्फूर्ति ' या कवितेवरून उघड होतेंच. पण इतरहि अनेक ठिकाणीं त्यांनी स्फूर्तीचा उल्लेख केला आहे. त्यांवरून असें वाटतें की, इंग्रजी प्रकारचें नवीन काव्य करायचें असें कांहीहि त्यांनी ठरवून केलेलें नाही. काव्य हें असें ठरवून होतें काय ?

केशवसुतांनी स्वतःच ज्या अमृतपरंपरेचा प्रेमाने उल्लेख केला आहे आणि ज्या परंपरेला रसिकांची उणीव भासत आहे म्हणून हळहळ व्यक्त केली आहे ती त्यांची परंपरा लक्षांत न घेतल्यामुळे, त्यांच्या काव्यांत अनेक ठिकाणीं विसंगती आढळतात असें टीकाकारांना वाटतें. परंतु केशवसुत नुसते त्या परंपरेंतील आहेत असें नव्हे, तर त्यांची वृत्तीच, त्यांचा आत्माच वैदिक आहे. ' दुर्मुखलेला ' ही कविता लिहिण्यापूर्वीच त्यांच्या मनावर इंग्रजीची छाप पक्की पडली होती असें टीकाकार म्हणतात. पण याच सुरुवातीच्या काळांत त्यांच्यावर संस्कृत काव्याची छाप होती असेंहि ते म्हणतात. तसेंच याच त्यांच्या प्रारंभींच्या कवितांत ' उगवत असलेल्या सूर्यास ', ' जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर ' अशाहि कविता आहेत. तसेंच, तर १८८६ सालीं त्यांनी इंग्रजी काव्य लिहिण्याची प्रतिज्ञा केली, तर त्याप्रमाणे करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर पडली आहे, याची जाणीव त्यांना असणारच ! पण ' नवीं काव्यें गाणार ' म्हटल्यावर लगेच त्यांनी संस्कृतचा प्रभाव असलेल्या, देशप्रेमाने रसरसलेल्या अशाच अनेक कविता कराव्यात, यांतून त्यांची वृत्तीच प्रकट होत नाही काय ? प्राचीन परंपरा सोडली म्हणजेच कांही नवीन करतां

येतें, असा केशवसुतांचा विचार असल्याचें दिसत नाही. ‘ जुन्यांतून जी निष्पत्ति नवी । काय नव्हे ती श्रेयस्कारक ?’ असें ते विचारतात तेव्हा त्यांना जुन्याचें महत्त्व मान्य असल्याचें दिसतें. ‘ जुनें जाउं द्या मरणालागुनि ’ असें ते म्हणतात तें जुन्यांत जो सडत चाललेला भाग आहे त्याच्याविषयी, हें अगदी उघड आहे. आणि याविषयी कुणाचें दुमत होईल ? हें सर्व लक्षांत घेतलें असतां,

> **वैर तयांला, पूर्वांच्या आर्यांचा बडिवार**
> **गाउनि जे निज षंढत्वा मात्र दाविती फार**

या ओळींचें रहस्य समजतें. ही टीका आर्यांवर नसून, पूर्वजांच्या पुण्याई-वर जगूं पाहणाऱ्या मूर्खांवर आहे. अशा मूर्खांना पूर्वजांचें महत्त्व तरी कसें कळणार ?

तेव्हा, जुन्या परंपरेवरच केशवसुतांना नवी इमारत उभारायची होती, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. ही परंपरा अढळ आहे; कारण तींत सत्य आहे, ऋत आहे, हें त्यांना ‘ दिसलें ’ होतें. आणि हा प्रकाश त्यांच्या प्रतिभेंत पडल्याकारणाने त्यांच्या सर्वच काव्याला एक आगळीच उज्ज्वलता लाभली आहे. ती पाहतांना आपण हरखून जातों. केशवसुतांना नवीन काव्यें करायचीं होतीं. वैदिक ऋषींनाहि नव्या नव्या काव्यांची ओढ होती. ते म्हणतात, “ हे बलिष्ठा इंद्रा, जीं तुझीं आज आम्हीं नवीन स्तोत्रें केलीं आहेत, त्या केलेल्या स्तोत्रांचा तूं स्वीकार करावास. (५·२९-१५.)...मी प्राचीन इच्छुक अशा अग्नी-करतां अत्यंत नवीन स्तोत्रें म्हणतों आहें. जशी नवऱ्याला कामुक आणि सुंदर वस्त्र नेसलेली बायको आवडते त्याप्रमाणे मी अग्नीला प्रिय होईन. (१०-९१·१३.)”

नाविन्याची ओढ आर्यांच्या जीवनांत सर्वत्रच होती. म्हणूनच आर्यांचा सर्वत्र सतत संचार चालू होता. सृष्टीची विविधता पाहण्यासाठीच हा संचार चालू होता हें उघड आहे. ऋषि म्हणतात, “ एका पर्वतशिखरावरून दुसऱ्या पर्वतशिखरावर आरोहण करून जेव्हां भक्त इन्द्राचें अगाध कर्तृत्व अवलोकन करतो, तेव्हा इन्द्रहि त्याच्या मनांतील भाव समजतो (१.१०.२.) ” पुढे एके ठिकाणीं म्हटलें आहे, “ भूमि अनेक रूपांचीं शरीरें धारण करते...

देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे. (३.५५.१४.) " " परदेशीं आमच्या-बरोबर राहा " अशी प्रार्थनाहि त्या ऋषींनी देवाला केली आहे. (१.१२९. ९.) अरण्यानी या वनदेवतेचीहि स्तुति ऋषींनी केली आहे. भ्रमन्तीचे हे असे उल्लेख केशवसुतांच्या काव्यांतहि बरचेवर येतात.

घराला मी आलों अटन करुनी फार दिवशीं,...
मनीं माझ्या व्हावी चलित कविताशक्ति, म्हणुनी
कशाला एकाकी फिरत असतों नित्य विपिनीं...
आत्माराम सुखें वनामधुनि तो होता जरा हिंडत...
आराधुनी विपिनदैवत मी तिथूनी
त्याचीं प्रसादवचनें मनुजांस आणीं...

ऋषींचें सृष्टीवर प्रेम होतें. द्यु पिता, पृथिवी माता, सोम बंधु, अदिति बहीण अशीं नातींहि त्यांनी जोडलीं होतीं. (१.१९१.६.) ' सरस्वती व सप्तसिंधु आमचें संरक्षण करोत. आपदेवता, वायु, पर्वत, वनस्पति आणि पृथिवी आमचें बोलावणें ऐकोत ' असें गोड आवाहनहि ते करीत. (८.५४. ४.) हें आवाहन द्यु, सूर्य आणि नक्षत्रांसहित विस्तीर्ण अंतरिक्ष यांनाहि होतें. (३.५४.१९.) केशवसुतांचेंहि सृष्टीवर असेंच प्रेम आहे. म्हणूनच उषा, वनश्री, द्यावापृथ्वी, इत्यादींचे उल्लेख त्यांच्या काव्यांत आढळतात. सृष्टि त्यांना कवयित्रीच दिसत होती. ऋषि म्हणतात, " ह्या दीप्तिमान उषेने कवितेप्रमाणे चारुता धारण केली आहे. (१.९२.६.) " सृष्टीच्या विलक्षण सौंदर्याने ते ऋषि भुलून गेले आणि उद्गारले, " हा गमनशील तेजस्वी सूर्य उदयाला आला. हा स्वर्ग आणि पृथ्वीवरून जात असतां सुंदर दिसतो. (१०. १८९.१.) हें सुंदर विश्व उत्पन्न करणाऱ्या ईश्वराचा धावा आम्ही प्रत्यहीं करतों. (१.४.१.) " म्हणूनच केशवसुतहि गातात—

असे सुन्दरता अढळ जरी कोठे
तर करी ती सृष्टींत मात्र वास !

ते आर्य बुद्धिदात्या सूर्याचे उपासक होते. केशवसुत त्यांच्या सुरांत आपला सूर मिसळवतात **' पुण्याची ही वेळ पहा गे ! सूर्याने उजळिली !'** ' या सूर्याने जें हिरण्मय तेज धारण केलें आहे, त्याचें माप घेतां येत नाही.

तो सुस्तुत आणि विश्वव्यापी अशा द्यावापृथ्वीस, स्त्री आपल्या मुलाला कवटाळते, त्याप्रमाणे आलिंगितो (३·३८·८·)' अशी वैदिक प्रार्थना आहे. सूर्य हा 'कवळुनि करजालें भूमिलागूनि' आहे असेंच वर्णन करून केशवसुत पुढे ऋषिप्रमाणेच आदराने म्हणतात—

द्युति बघुनि अशी ती चित्त माझें रमून
दिनकर ! मज बोधी तूज गाया नमून !

या सृष्टीविषयी ऋषींची काय कल्पना होती हेंहि पाहण्याजोगें आहे. ते म्हणतात, "हीं सर्व भुवनें त्याच्या शाखाच आहेत, आणि प्राणिमात्रांसुद्धा एकंदर वनस्पतीहि ह्याच्याचपासून उत्पन्न झाल्या आहेत. (२·३५·८.)" केशवसुतांना सृष्टींत कोणता ध्वनि दिसला ? त्यांना अलौकिक दृष्टि प्राप्त झाली ती हीच की, 'कुत्राप्यस्मि च सर्ववस्तुषु !' ऋषींनी प्राप्त करून घेतलेलें हें दिव्य सत्य पाहून पाश्चात्य लेखकहि थक्क झाले ! रॅगोजिन् म्हणतो, "निसर्गांत एकता आहे, अखिल विश्वाशीं मानवाचें जवळचें नातें आहे, हें अलिकडे विज्ञानाने सिद्ध केलें, पण इतक्या प्राचीन काळीं केवळ काव्यप्रतिभेच्या बळावर हें ऋषींनी ओळखावें हें आश्चर्यचकित करणारें आहे !" (वेदिक इंडिया, पृ. १६७.) दुसऱ्या एका ठिकाणीं (पृ. १३३) हाच लेखक त्या आर्यांविषयी लिहितो, "निसर्ग हेंच त्यांचें देऊळ होतें. माणसांनी बांधलेल्या घरांत देवतेला त्यांनी राहायला बोलावलें नाही." केशवसुत नेमकें हेंच म्हणत नाहीत काय ? निसर्गाविषयी ते म्हणतात—

उंच नाहित देंवळें मुळीं तेथे । परी डोंगर आहेत मोठमोठे
देउळीं त्या देवास बळें आणा । परी राही तो सृष्टिमधे राणा

अशा रीतीने केशवसुतांचा आत्मा वैदिक ऋषीचा होता ! म्हणूनच ते लिहितात,

जेथे ओढे वनराजी । वृत्ति रमे तेथे माझी
कारण कांही साक्ष तिथे । मम त्या श्रेयाची पटते.

त्यांना निसर्गाचा असा स्वाभाविक ध्यास होता. ऋषि म्हणतात, "हे प्रकाशन जाणणारे अग्निहो, कीर्तिमान्, स्वच्छ, पोषक अशा ह्या नदीने तुमचें चांगल्या प्रकारें स्तवन केलें आहे. (८·२६·१९.)" केशवसुतहि तसेंच म्हणतात—

स्तोत्र ओढे थांबल्यावीण गाती
सूर वारे आपुला नित्य देती
वृक्षगण तो हालुनी डुल्लताहे
अशा भक्तीच्या स्थळीं देव राहे !

ऋग्वेदांतील पर्जन्यसूक्त प्रसिद्ध आहे. बेडकांचें ओरडणें ऐकून ते तेंच गात आहेत असें केशवसुतांच्या मनांत येतें.

ऐके पलीकडुनि बेडुक शेतभातीं
पर्जन्यसूक्त सगळे मनसोक्त गातीं !

पर्जन्याला बोलावतांना ऋषि म्हणतात, "चाबकाने घोड्यांना मारीत रथी सैन्य ज्याप्रमाणे पुढे नेतो त्याप्रमाणे पर्जन्य मेघांना प्रकट करतो....ओरड, गर्जना कर. उदकयुक्त रथाने ये. आणि सर्वत्र उदक टाक (५·८३·३,७.)" आणि केशवसुत म्हणतात—

झंझावात हयावरी बसुनिया, या पश्चिमाब्धीवरी
लाटा झोडित, गर्जना करित ये, बा मेघराजा तरी !

ऋग्वेदांत म्हटलें आहे, "कपिंजल पक्षी हेच कोणी कवि, आपल्या तारुण्य-भरामध्ये आलाप काढून योग्य काळीं दक्षिण दिशेकडे सुस्वर गायन करीत असतात. (२.४३.१.)" पक्षिकवनें केशवसुतांना श्रुतिसुभग तर वाटतातच, पण ते पुढे म्हणतात, "अनुकरण करीं मी गाउनी या खगांचें !" केशव-सुतांना फुलाविषयी अतिशय आकर्षण होतें. पण फुलाला ते काय संबोधतात ?—

फुला, सुरम्य त्या उषेचिया सुरेख रे मुला !

ऋषिमंडळींना सृष्टीचीं तत्त्वें शोधून काढण्यांत मोठा आनंद वाटत असे. केशव-सुतांना फुलें याच कारणासाठी आवडतात—

पुष्पामधे प्रकट होय न जें जराही
सृष्टींत एकहि रहस्य असें न कांही !

पण ऋषिमंडळी केवळ दृश्य जगाचा अभ्यास करून थांबत नसत, तर अदृश्या-चेंहि चिंतन करीत. केशवसुतांना याच कारणासाठी फुलांचें विशेष महत्त्व वाटतें.

पुष्पीं या प्रीति असे
ती मीपण हाणितसे

परविषयीं तन्मयता प्रेरिते उरीं
ने दृष्टि अंतरीं !

'हा निबिड अंधकार नाहीसा करा. सर्व दुष्टांचा नायनाट करा. आणि ज्या प्रकाशाची आम्हांस आवड आहे तो प्रकाशहि आम्हांस अर्पण करा. (१.८६.१०.)' असें ऋषि म्हणतात. केशवसुतांचें फुलावर प्रेम कां आहे, तर 'त्या तम न आवडे'. 'अरण्यानी'च्या स्तुतींत अरण्याचें, तेथील एकांतवासाचें वर्णन केलें आहे. अरण्यांत घुबडाच्या घूत्कारांना पोपटांच्या बोलांनी उत्तर मिळतें, असें वर्णन आहे. केशवसुतांनाहि एकांतवासाची ओढ होती. ते म्हणतात,

"अहा ! अज्ञात स्थळीं अशा, मातें
एक गवतारू खोप रहायातें,... "

जगद्रुमाचा विचार ऋग्वेदांत आहे. (१.२४.६,७.). केशवसुत स्वतःचा उल्लेख 'जगद्रुमाचें पर्ण' असाच करतात. मरुद्‌गणांचा उल्लेख केशवसुत करतात. ते मरुद्‌गण ऋग्वेदांतलिच आहेत. "या विषयावर किती सूक्तें आहेत विचारूं नका ! कांहीं ठिकाणीं हीं सूक्तें निसर्गकाव्यांत शोभेची बहार करतात," असें रॅगोजिन् म्हणतो. केशवसुतांसारख्या कवीला अशा काव्याचें आकर्षण वाटणार नाही असें कसें होईल ?

निसर्गकाव्यावर केशवसुतांनी इतका भर दिला आहे याचें कारण निसर्गाविषयी त्यांना मनापासून आकर्षण वाटत होतें एवढेंच नव्हे, तर निसर्ग आणि मानव यांचा अविभाज्य संबंध आहे अशी त्यांची विचारसरणी होती, हें होय. 'तेव्हा लौकरच रूढिभक्त राम म्हणतील; आणि सृष्टीला लोक भजूं लागतील, असा रंग दिसत आहे,' असें ते 'रूढि–सृष्टि–कलि (?)' या कवितेच्या प्रारंभीं मुद्दाम स्पष्टपणें गद्यांत म्हणतात हें किती महत्त्वाचें आहे ! सृष्टीपासून दूर गेलेल्या दैत्यरूढीच्या गुलामांविषयी ते खेदाने म्हणतात —

सृष्टीचे अमृतध्वनि दुरुनि जे कानांवरी त्यांचिया,
येती ते परिसूनि मूर्ख सगळे घेतात चित्तीं भया !

आणि नंतर, सृष्टीचा विजय होणारच या विश्वासाने ते तिचा जयजयकार करतात ! नीति निसर्गांतूनच जन्मलेली असावी म्हणजेच तिचें पद अढळ

होतें आणि धर्म तेथेंच स्थिर होतो अशी त्यांची बुद्धिनिर्णित कल्पना आहे. ही संपूर्णपणें वैदिक आहे. 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथांत तर्कतीर्थ जोशी लिहितात, " 'ऋत' हें विश्वव्यापी तत्त्व वैदिक ऋषींना नीतिकल्पनेवरून सुचलें. ...मनुष्याच्या अंतरंगांतील नैतिक सत्य आणि विश्वशक्तींच्या अस्तित्वास व व्यापारास प्रेरक असलेलें सत्य एकच होय, अशा निश्चयाला ही विशाल वैदिक प्रतिभा पोचली ". केशवसुतांचा हा विचार किती जाणीवपूर्वक होता !—

पयस्था त्या देवी, फणिपतिसुता पंकजपदी,
स्वयंभू सृष्टीचे नियमाचि सदा मानिति सुधी.
स्वयंभू सृष्टीचे नियम सुधरूं पाहत असे
नराच्या पेसा या कवण दुसरा मूर्ख गवसे ?

'केशवसुत तर 'जुनें जाळुनि किंवा पुरूनि टाका' असें म्हणतात, त्यांचें जुन्या वेदांवर प्रेम असणें कसें शक्य आहे,' अशी शंका कुणाच्या मनांत येईल. तिला उत्तर असें की, कृत्रिम, अनैसर्गिक गोष्टी जुन्यापुराण्या होतात. नैसर्गिक गोष्टी कधी तरी जुन्या होतात काय ? याच नैसर्गिक गोष्टींचें ज्ञान म्हणजे वेद. म्हणूनच वेदांना अनादि आणि अनंत म्हणायचें. जीर्णशीर्ण रूढींवर हल्ला करणें हें वैदिक परंपरेला धरूनच आहे.

सृष्टीविषयी केशवसुतांना आणि ऋषिवर्यांना एवढी आत्मीयता वाटण्याचें रहस्य हें आहे. साहजिकच सृष्टीचें जास्तींत जास्त अवलोकन करण्याची दुर्दम्य जिज्ञासा त्या ऋषींच्या चित्तांत अनावर झाली; आणि म्हणूनच ते सगळीकडे हिंडूं लागले नुसतेंच भरपूर खायला-प्यायला त्यांना हवें असतें, तर त्यांच्या प्रिय सिंधु-गंगादि नद्यांच्या खोऱ्यांत त्यांना तें हवें तितकें मिळालें नसतें काय ? त्या आर्यांना ऐश्वर्य हवें होतें यांत शंकाच नाही. 'दिव्यैश्वर्यमंडित' इंद्राची ते स्तुति करतात, "गाईची इच्छा करणारे, घोडे इच्छिणारे, अन्न इच्छिणारे आम्ही स्तोते पराक्रमी, स्त्री देणारा व सर्वदा रक्षण करणाऱ्या इंद्राला विहिरींतून पोहोरा काढावा तद्वत् आपल्याकडे खेचतों. (४.१७.१६.)" केशवसुतहि 'वैर तयांला, जे गरिबी शिकवितात बालांस !' असेंच म्हणतात. पण त्या आर्यांचें केवळ वैभवांत समाधान नव्हतें. विलासासाठी त्यांना वैभव नको होतें. वैभव मागतांक्षणींच पुढे ते काय म्हणतात हें

पाहण्याजोगें आहे. " हे इंद्रा, तूं आम्हांला आश्चर्यकारक ऐश्वर्य दे. आम्हांला अनेक प्रकारची बुद्धि आणि प्रेरणा दे. (४·२२·१०·) " कष्टाशिवाय देव सख्य करीत नाहीत असेंच त्यांचें मत होतें (४·३३·११·) केशवसुतांनीहि उद्योगप्रियतेचें महत्त्व पुनः पुनः गायिलें आहे. ' उद्योगांत वेळ ज्याचा नित्य जाई, त्याला दैव होई अनुकूल ' असेंहि ते म्हणतात. पण सर्वांत जास्त आकर्षण त्यांना होतें तें बुद्धीचें. केशवसुतांच्या मनांत उपजत बंधुप्रेम तर होतेंच. पण ' आपला बापू चपलधी असल्याने त्याच्याविषयी मम मनीं अति लोभ राहे ' असें ते म्हणतात.

ते आर्य ऋषि देह जावो अथवा राहो या भावनेने सृष्टि पाहण्यासाठी धडपडत होते. गेल्या शतकाच्या अखेरीस या देशांत काय भयंकर परिस्थिति होती हें पाहावें आणि मग त्या अतिप्राचीन काळीं काय अवस्था असेल याची कल्पना करण्याचा प्रयत्न करावा. रॅगोजिन लिहितो, " हिंदुस्थानांत जितके साप आहेत तितके इतरत्र कुठे नाहीत. आणि हिंदुस्थानांत साथीच्या रोगाने लोक जसे मरतात तसेच जवळ जवळ साप चावून मरतात! १८७७ सालीं ८११ पौंड बक्षीस म्हणून देऊन १,२७,२९५ साप मारण्यांत आले तरीसुद्धा १६,७७७ माणसें साप चावून मेलींच. १८८२ सालीं १९,५१९ माणसें अशीं मेलीं. त्याच वर्षी वाघ, चित्ते, कोल्हे आणि इतर वन्य श्वापदांनी २६०६ माणसें खाल्लीं ! " त्या प्राचीन काळीं तर नरभक्षक राक्षसहि होते. म्हणूनच ' त्या दुष्ट नरभक्षकांचें निसंतान होऊं द्या ' असें ऋषि म्हणतात. (१·२१·५.) पण त्या ऋषींच्या विश्वसंचारावर याचा परिणाम झाला नाही ! त्यांच्या माता प्रेमाने त्यांना अडवीत असतील. म्हणूनच जणू कांही ते म्हणतात, " कल्याणकारक स्तोत्रें आणि अर्कगीतें ह्या यज्ञांत महापराक्रमी विष्णूला स्तवोत. तो लांब चालणारा आणि वेगवान् आहे. त्याला दिशारूपी तरुण माता प्रतिबंध करीत नाहीत. (३·५४·१४·) " ब्राह्मणवेषधारी इंद्राने रोहिताला केलेला उपदेश या ठिकाणीं ध्यानांत येतो. " माणूस बसला की त्याचें दैवहि बसतें. तो निजला की तें निजतें. तो चालूं लागला की तेंहि चालूं लागतें. प्रवास करा! प्रवाशाला मधु मिळतो; प्रवाशाला गोड अंजीर मिळतात. सूर्याचें सुख पाहा. तो न कंटाळतां चालत असतो. प्रवास करा ! ". (वेदिक इंडिया, पृ. ४११.) पुढे प्रभु रामचंद्रांनी वनवासाच्या निमित्ताने

केवढा प्रदेश पादाक्रांत केला आणि त्यांना ऋषींचे आश्रम कुठे कुठे लागत गेले, हें या दृष्टीने पाहण्याजोगें आहे. केशवसुतांना स्वतःला सृष्टिशोभा पाहत एकाकी चिंतन करीत फिरण्याची किती आवड होती, हें आपण पाहिलेंच. कवीचें हें कार्यच आहे असें त्यांचें मत दिसतें.

> आहे तुला सर्वहि सृष्टि मोकळी,
> व्योमांतली सर्वहि तेंवि पोकळी;
> संचार कीजे तरि तूं स्वमानसें,
> कोठे जराही प्रतिबंध तो नसे.

ऋषींच्या मनांत जिज्ञासा कां होती आणि ती किती तीव्र होती हें यावरून स्पष्ट दिसतें. या जिज्ञासेचें स्वरूप पाहणें जितकें मनोरंजक त्याहून उद्बोधक आहे. ' हा (सूर्य) आधारहीन आणि बंधन नसलेला खाली किंवा वर जातांना पडत कसा नाही ? तो कोणत्या शक्तीने चालतो ? कोणीं त्याला पाहिलें आहे ? (४.१३.५.) ज्यापासून द्यावापृथ्वी निर्माण झाली तो वृक्ष कोणता बरें ? आणि कोणच्या वनांत उत्पन्न झाला ? हे विद्वान लोकहो, तुम्ही मनःपूर्वक याचा विचार करा व जेथे जग उत्पन्न केलें त्याचाहि मनांत विचार करा. (१०.८१.४.) जेव्हा म्हणजे मूळारंभीं असत् नव्हतें आणि सत्हि नव्हतें, अन्तरिक्ष नव्हतें आणि त्यापलिकडेच जें आकाश तेंहि नव्हतें, (अशा स्थितींत) कोणीं कोणाला आवरण घातलें (म्हणावें) ? कोणाच्या सुखासाठी ? अगाध व गहन पाणी (तरी) होतें काय ? (१०.१२९ १.) तर तीं (उदकें) प्रथम उत्पन्न होऊन किती काळ लोटला असावा बरें ? (२.३०.१.)' इत्यादि. त्यांचें दुःख होतें तें हें : ' देवाकडे नेणारा मार्ग कोणता, हें खरोखर कोणीं जाणलें आहे ? कोणीं येथे सांगितलें आहे ? देवांचें श्रेष्ठ प्रकारचें व गूढ असें जें वर्तन आहे, त्याचा वरवरचा भाग मात्र आमच्या दृष्टीस पडतो. (३.५४.५.) ' त्यांची दृष्टि विशाल, उत्तुंग असूनहि ते हें म्हणतात ! त्यामुळे, तत्काळ पान्हवणाऱ्या धेनूला तिच्या वासराने दोहनासाठी हाक मारावी त्याप्रमाणे विश्वात्म्याला हाक मारून ते म्हणतात, " तुझें अंतःकरण दयाशील तर खरेंच, पण त्या अंतःकरणाच्या अंतर्भागाची आम्हांस ओळख होऊं दे ! (१.४.१,३.) " त्या विगतभय आर्यांना शेवटी सर्वस्व वेचूनहि देवांशीं

सख्यत्व करायचें होतें तें ह्यासाठी. साहजिकच ते म्हणूं लागले, “ मी मनाचा निष्कपट, परंतु पडलों अज्ञानी; तेव्हा देवांचीं हीं जीं स्वरूपें गूढ आहेत तीं कशीं आहेत तें विचारतों. ज्या कोणाला हें खरोखर माहीत असेल त्याने आता विलंब न लावतां सर्व सांगून टाकावें. (१.१६४.५,७.) ” यांतील ‘ ज्या कोणाला ’ या शब्दांचा अर्थ लक्षांत घ्यावा तितका थोडाच नाही काय ? त्यांच्या मनांत अनंत प्रश्न विचारण्याची बुद्धि होती म्हणूनच ते म्हणतात, “ शहाणे मूर्खाला हसत नाहीत (३.५३.२३.) ” आणि अशाहि शंका घेतात की, ‘ असा तो उग्र इंद्र आहे तरी कोठें ? ’ (२.१२.५.) हा इंद्र नाहीच असेंहि कांहींना वाटल्याचा उल्लेख त्याच ठिकाणीं आहे ! प्रश्न विचारतांना त्यांची भावना असे : “ सूर्य किती आहेत ? अन्तरिक्षें किती आहेत ? हे पितरहो, तुम्हांला मी स्पर्धेने विचारीत नाही. तर जाणत्या अशा तुम्हांला सरळपणाने विचारीत आहें. (१०.८८.१८.) ” आणि आपल्या म्हणण्या-विषयी दुसऱ्याचें मत समजावून घेण्यास ते आतुर असत त्यामुळे विनंती करीतः “ह्या-माझ्या बोलण्याविषयी (तुम्हांला) काय म्हणायचें आहे ? (४.५.८)” आर्य लोक सश्रद्ध होते, पण त्यामुळे त्यांनी विचारीपणा मुळीच सोडला नव्हता हें नमूद करून रॅगोझिन लिहितो, “ हें अगदी खरें की ते लोक सुखासाठी धडपडत नव्हते, तर केवळ अंतिम सत्यासाठी ! ” केशवसुतांच्याहि मनांत याच प्रकारचे मूलभूत प्रश्न उपस्थित होत होते. ‘ आहे जीवित काय ? ’ हा विचार त्यांच्या मनांत या वृत्तीमुळेच आला. ‘ होते हिमबिंदु सकाळीं, कोठे ते सायंकाळीं ? ’ हा प्रश्न त्यांच्या मनांत फडा काढून उभा राहिला. ‘ हर्वेतुनी हे पडतात शब्द पाही । कुठे जातों हें मला कळत नाही ’ या जाणिवेने ते अंतर्मुख बनले. ‘ कोणीकडून ? कोणीकडे ? ’ याचें चिंतन ते करूं लागले. पण ही जिज्ञासा केवळ दृश्य जगापुरती मर्यादित नव्हती. सृष्टीचें खरेंखुरें रहस्य त्यांना हवें होतें. जें दिसत नाही तेंहि त्यांना पाहायचें होतें. म्हणूनच ‘ म्हातारी ’ पाहतांच त्यांच्या मनांत आलें—

अज्ञातामधला—मूर्त तूं गमसी ध्वनि मजला
अर्थ तुझा कोण—मला तो देइल सांगोन ?

मनांत प्रश्न आल्यावर, त्याचें उत्तर मिळाल्यावर काय होईल असा विचार येऊन जातोच.

कळेल जर मज तो—तर जगीं भरला जो दिसतो
.मी तो अंधार—लोपवूं झटेन साचार !

या सर्व प्रश्नांचा केशवसुतांनी जो विचार केला आहे तो वैदिक परंपरेला धरूनच आहे. वैदिक परंपरा म्हणजे ठराविक विचारांचें एखादें भेंडोळें, असें मुळीं नाहीच. ' जगांतून सगळीकडून थोर विचार आमच्याकडे येवोत ' (१.८९.१) अशीच त्या ऋषींची तळमळ होती. वेद म्हणजे ज्ञान.

अज्ञेयावरतीं जसें क्षणिक हें आस्तित्व हो खेळतें !

अशा कांही चरणांवरून केशवसुत अज्ञेयवादी, म्हणजे अश्रद्ध, म्हणजे वेदांताचें वावडें असलेले, असें म्हणणें योग्य होईल असें वाटत नाही. एक तर, याच्या पुढल्या चरणांतच ' वारिस्थ देवीगणीं ' असा उल्लेख आहे, तो वैदिकच नाही काय ? दुसरें असें की, वेदांतच शेवटीं ' या विश्वाचें रहस्य काय आहे कळत नाही ' अशा आशयाचे उद्गार आहेत. प्रा. श्री. म. माटे ' श्रीरामदास-स्वामींचें प्रपंचविज्ञान ' या ग्रंथांत हें रहस्यग्रहण असें करतात, " ऋग्वेदांतील नासदीय सूक्त आमच्या तत्त्वज्ञानाचें खरोखरीच आदिस्थान आहे. त्या सूक्ताच्या शेवटीं शेवटीं आलेला विचार फार बारकाईने पाहावयास हवा. तेथे असा प्रश्न उपस्थित केला आहे की विश्वसंस्थेचा हा पसारा कसा आणि कोठून झाला ? हें त्या अध्यक्षाला — म्हणजेच देवाला — तरी माहीत आहे काय ? आणि उत्तर दिलें आहे की, ' त्याला कदाचित् माहीत असेल किंवा नसेलहि '. हीच संदेहाची भावना आमच्या तत्त्वज्ञानाचें खरेंखुरें बळ आहे. " वेदांतील हा विचार अत्यंत विस्मयजनक आहे, असें रॅगोजिनलाहि वाटतें. आणि खरोखरच हा विचार पाहून कोणत्या विचारी माणसाला धक्का बसणार नाही ?

पण ' कदाचित् उत्तर मिळणार नाही ' अशी कल्पना आल्यावर तर ते आर्य ऋषिवर्य अधिकच विचारी बनले, आणि सृष्टीचे अमृतध्वनि ऐकण्यासाठी जिवाचा कान करूं लागले, आणि ज्याला कुणाला ते ऐकूं आले असतील त्याच्याकडून ते समजावून घेण्याचा प्रयत्न करूं लागले. सृष्टि ही त्यांना अत्यंत गूढरम्य वाटल्याने त्यांच्या तोंडून गूढगुंजन सहजच बाहेर पडलें. म्हणूनच ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं कोडेंवजा कविता आढळतात. कोड्यांत लिहिणें ही वेदांची एक शैलीच आहे, असेंहि कुणाकुणास वाटतें. पण आपण द्यावापृथ्वीचीं लेंकरें असल्याकारणाने त्यांचे नियम समजावून घेण्याची बुद्धि त्यांच्या मनांत

बळावली. यासाठी असामान्य बुद्धीची आवश्यकता लागणारच. म्हणूनच ते प्रार्थू लागले, "जो आमच्या बुद्धीला प्रेरणा करतो, त्या सूर्यदेवाच्या श्रेष्ठ तेजाचें आम्ही ध्यान करतों. (३ ६२·१०·) बुद्धीच्या प्रकाशाने ज्ञानाच्या महासागराची ती (सरस्वती) आम्हांस स्पष्ट कल्पना करून देते. तसेंच या विश्वामध्ये बुद्धि म्हणून जेथे जेथे आढळते तेथे तेथे साम्राज्य करणारी अधिष्ठात्री हीच होय. (१·३·१२·)" केशवसुतांनीहि 'विद्याप्रशस्ति' करून ज्ञान, शारदा, सरस्वती यांची महती गायिली. ज्ञाताच्या कुंपणावरून उड्डाण करून प्रकृतिपुरुषांची लयबद्ध सौंदर्यमय क्रीडा अवलोकन करावी आणि अवकाशाच्या ओसाडींतील मुके पडसाद सत्वर साकार करावेत अशी त्यांची मनीषा होती. या दिव्य हेतूनेच ते ज्ञानाकडे पाहत होते. केवळ सत्यावर प्रेम करण्याची वृत्ति यामुळे आपोआपच निर्माण होते. म्हणूनच ऋषि गातात, "(देवांनो, तुमच्या रथाच्या शब्दाबरोबर) सत्य आणि मधुर अशा तत्त्वाचा लाभ होणार अशी आशा वाटूं लागते. (१·२२·३·)" आणि केशवसुत 'विद्यार्थ्याप्रत' स्पष्ट करतात—

परी किरण जो तुजमध्ये सत्याचा
प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा !

काव्यप्रतिभा वेगळी आणि शास्त्रीय दृष्टि वेगळी अशी ऋषींची कल्पना होती असें वाटत नाही. सत्य हेंच त्यांना सुंदर आणि मंगल वाटत होतें. त्यांच्या मतें ज्ञान आणि काव्य यांचेंहि इतर सृष्टीप्रमाणेच अद्वैत असल्याचें दिसतें. अशा त्या ऋषींना जें कांही दिसलें होतें तें थक्क करणारें आहे. उदाहरणार्थ : "अग्नीने दिसण्यांत चल, परंतु वस्तुतः अचल आकाशाचा तेजोरूप आणि विस्तीर्ण प्रदेश कसा ओतप्रोत भरून टाकला आहे. (१. १४६.१.)" उष्णता आणि आर्द्रता यांच्या संयोगाने विश्वांतील जीवनतत्त्व निर्माण झालें या वैदिक विचाराने रॅगोजिनला म्हणावें लागलें की, "अशा रीतीने जगाचें तत्त्वज्ञान ग्रीकांच्या पुष्कळच आधी आर्यांनी सांगितलें एवढेंच नव्हे, तर ग्रीकांच्यापेक्षा फार श्रेष्ठ प्रकारचें ज्ञान त्यांनी सांगितलें. (Thus the ancient Aryas not only preceded the early Greek schools of philosophy in constructing a theory of the world, but greatly surpassed them in wisdom. VEDIC INDIA p. 437.)"

हें विचित्र विश्व म्हणजे गोंधळ नसून सुंदर रचना आहे, या विचाराचा आविष्कार करतांना वेदांची वाणी लाजते, पण तिच्या लज्जेंतच विजय आहे, असें मॅक्समुल्लरने म्हटलें आहे. हेंच किंचित् बदललें तर म्हणतां येईल की, विश्वाचें नांव घेतांना वेदवाणी लाजते ! 'सूर्य विस्तीर्ण पृथ्वीचें अतिक्रमण करीत नाही' हें ऋषींच्या लक्षांत आलें. (१०.३१.९.) त्यांची खात्री होऊन ते म्हणाले, "हे द्यावापृथ्वीहो, तुमचे नियम सत्य आहेत. (३.५४.३.)" विश्वाचें निरीक्षण करतांना त्यांच्या चित्तांत 'नैसर्गिक' तत्त्व स्फुरलें, "ह्या द्यावापृथ्वी सर्व भूतांना आपल्यामध्ये धारण करितात. मोठमोठ्या देवांनाहि धारण करीत असतां त्या थकत नाहीत. ह्या चराचर सर्व विश्वाचा आणि चालणाऱ्या आणि उडणाऱ्या सर्व भूतमात्रांचा हा एकच अधिपति होय. (३.५४.८.)" आणि मग आपण सृष्टिपुत्र असल्याने सृष्टीचे नियम आणि आपल्या जीवनाचे नियम एकच असले पाहिजेत असें त्यांच्या मनाने घेतलें. सृष्टींतूनच, निसर्गातूनच नीति उत्पन्न झाली असा त्यांचा निश्चय झाला. ते म्हणाले, "ते (मित्रावरुण) सत्यस्वरूप आणि सनातन नियमांना अनुसरणारे आहेत. जगांत सद्धर्मनिष्ठ तेच आहेत. ते सन्मार्गाने नेणारें, उदार आणि पापी माणसासहि समृद्ध करणारे आहेत. (५.६७.४.) ह्या वरुणाने अरण्यावर आकाश, घोड्यांत सामर्थ्य आणि नद्यांत पाणी उत्पन्न केलें. अंतःकरणांत कर्तृत्वबुद्धि, पाण्यांत अग्नि, द्युलोकांत सूर्य आणि पर्वतावर सोम उत्पन्न केला. (५.८५.२.) हे इंद्रावरुणहो, जें पूर्वीच्या कालीं ऋषींना तुम्हीं विचार, वक्तृत्वशक्ति, गायन आणि ज्ञान दिलेंत आणि यज्ञ करणाऱ्या शहाण्या लोकांनी जीं स्थानें निर्माण केलीं तीं म्यां तपाने जाणलीं. (८.५९.६)" केशवसुतांचेंहि मत असेंच आहे.

> **दिव्य शक्तीने स्फुरें गंध पुष्पीं,**
> **रंग खुलतीही तिने इन्द्रचापीं;**
> **सृष्टिमाजी जें रम्य असें कांही**
> **तीच कारण त्या शक्ति असे पाही.**

'त्या' हा शब्द येथे 'काव्याला' या शब्दासाठी आला आहे. केशवसुतांच्या दृष्टीने काव्य हें जीवनव्यापी असलें पाहिजे हेंहि येथे लक्षांत येतें. याहूनहि पुढील उद्गार स्पष्ट आहेत —

प्रीति, चारुता, आनंद
सिंचिति सृष्टीचा कंद !

या तत्त्वांना केशवसुत सृष्टीचे अमृतध्वनि म्हणतात आणि प्राचीन वाङ्मयांत त्यांना श्रुती अशी संज्ञा आहे, हा केवळ योगायोग आहे असें वाटत नाही. ऋषींना हीं तत्त्वें दिसत म्हणून त्यांना द्रष्टे म्हणतात. केशवसुत कवींविषयी म्हणतात—

म्हणोनि हे नरजातिचे खरे
नेत्रकर्णचि नव्हेत का बरें ?

अशा रीतीने विचार करणारे ते आर्य 'एकापासूनच हा सर्व पसारा झाला' या निर्णयाला आले (८·५८·२·) आणि मग ते लोकांना आवाहन करूं लागले, " हे लोकहो, ज्याने हें सर्व निर्माण केलें त्याला तुम्ही जाणीत नाही. खरोखर तुमच्या अन्तर्गत ईश्वरतत्त्व कांही वेगळेंच आहे. (१०·८२·७·)" केशवसुत म्हणतात —

सृष्टिकेंद्र तो कवण्या ठायीं
ज्याच्या त्याच्या आहे हृदयीं !

मानवी वंशाचा जन्म स्वर्गांत आणि तेजांत आहे, असा ऋषींचा विश्वास होता, असें रॅगोजिनहि म्हणतो. केशवसुतांचा विचार तोच आहे.

" चंद्र आणि नक्षत्रें तीं शोभलीं जेथ वा रातीं
उजेडही जेथुनि येतो पाउसहि जेथुनि पडतो
तेथुनि हे आले येथे तेथुनीच तूं आम्हांतें ! "

सर्वांच्या जन्माचें कारण एकच असेल तर सर्वांचें एकमेकांशीं नातें काय असणार हें स्पष्टच आहे.

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत !

आणि आपल्याला असें कां वाटतें याचें कारण ते हेंच देतात की सर्वत्र सृष्टि एकच आहे. निसर्ग आणि मानव यांचें अद्वैत ऋषींच्या अंतःकरणांत स्फुरलें, " तो महान् देव मर्त्यांत व्यापून आहे.· (४.५८.३.) (देवा,) तुझ्या तेजांत सर्व जगाने आश्रय घेतला आहे. जी मधुर लाट समुद्रांत, अन्तःकरणांत, प्राणिमात्रांत, पाण्यांत आणि संग्रामांत भरलेली आहे, त्या मधुर लाटेचा

आम्ही आस्वाद घेऊं (४.५८.११.)" ही लाट, हा प्रवाह, हाच ओघ केशवसुतांना जाणवला.

तीं माझीं मी त्यांचा, – एकच ओघ अम्हांतुनि वाहे !

स्वतःमधील या तेजांशाची ओळख करून घेणें किती महत्त्वाचें आहे ! म्हणूनच ऋषि म्हणतात, "त्वष्ट्रादेव आमच्या ठिकाणीं जें आश्चर्यकारक तेज आहे, त्याची अशी योजना करो की तेणेंकरून आमचा उत्कर्ष होऊन दिव्य वैभव दिसो. (१·१४२·१०·)" केशवसुत 'विद्यार्थ्यांप्रत' हीच जाणीव करून देतात—

परि तुजमध्ये महतीचें जें बीज
त्याहुनि कांही मोठी नाही चीज

सुदीर्घ, संपन्न आणि यशस्वी अशा आयुष्याची कल्पना ते आर्य करीत. केशवसुत आपल्या कविमित्रास लिहितात —

जगावें तूं वर्षें प्रिय मम कवे ! शंभर पुरीं,
समृद्धी सौख्याची चिर तव वसावी घरभरी,
जन स्वास्थीं तूझीं सुरस कवनें सुन्दर धरी,
भविष्यीं कालीं तें शुचि यश तुझें निश्चल ठरो !

पण माणूस मर्त्य आहे, ही तीव्र जाणीव आर्यांना होती. त्यांनी मानवाला विचार करणारा आणि मर्त्य असेंच संबोधिलें आहे. केशवसुतहि 'म्हातारी'-मध्ये म्हणतात —

तुझे रंगवास – न कळती मर्त्य मानवास

आर्यांना मरायचें नव्हतें हें निश्चित, पण त्यांना मरणाचें भय नव्हतें हेंहि निश्चित. मृत्यूनंतर पितर स्वर्गांत सुखांत असतात, असेंच ते मानीत. अमरां-बरोबर तेथे त्यांना अमृत मिळतें असेंहि त्यांना वाटे. केशवसुत कवि या नात्याने 'एका तरुणीस' म्हणतात—

तरी देहत्यागें सुख अनुभवूं आपण वरी !
वनीं त्या देवांच्यासह अमृत तें प्राशन करूं...

देह मर्त्य असला तरी आत्मा अमर आहे. पण लोक केवळ शरीराकडे पाहतात, असें वेदांत म्हटलेंच आहे. (१.१६४.३८.)

मानवतेविषयीचा आर्यांचा दृष्टिकोन नैसर्गिकपणेंच अत्यंत सहिष्णु आणि सर्वसंग्राहक झाला. 'अखिल मानवांविषयीं प्रेमबुद्धि बाळगणारा हा (अग्नि) सूर्यरूपाने झटत असतो' असें त्यांना दिसलें (१·९८·१). प्रेम नैसर्गिक आहे; द्वेष अनैसर्गिक आहे. म्हणूनच त्यांनी प्रार्थना केली, "अश्वीदेवहो, आम्हांस कांही द्याल तर ओजस्वीपणा द्या, द्वेषबुद्धि विलयास न्या. (१·१५७·४·)". वैदिक आर्यांच्या समाजरचनेविषयी रॅगोजिनने जे विचार मांडले आहेत ते थोडक्यांत पुढीलप्रमाणे : 'पत्नी ही सर्वस्वी गृहस्वामिनी होती. तिच्यावर कुणाचीहि सत्ता नव्हती, सासूसासऱ्यांचीसुद्धा. जातिसंस्था दृढमूल झालेली नव्हती. नरबलीहून जास्त तिरस्करणीय त्यांना कांही वाटत नसलें पाहिजे. त्यांनी आपल्या वंशाचें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें तें नैतिक मार्गांनीच. 'भारत' हे विश्वामित्राने आर्य केलेले दुसरे लोक होते; पण ते पूर्णपणें आर्य झाले.' इत्यादि. तर्कतीर्थ जोशी लिहितात, "वैदिक काळीं सामाजिक जीवन निरोगी व प्रसन्न होतें, याचें प्रत्यंतर वैदिक वाङ्मयांत सांपडतें. ऋग्वेदाचे सूक्तकर्ते ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य अशा तीनहि व्यवसायांतले होते. शूद्र हा विभाग ऋग्वेदाच्या उत्तर भागांत सापडतो. शूद्र विभागांतदेखील वैदिक संस्कृति पोंचली होती, असें निषादस्थपतींच्या (गवंड्यांच्या) व रथकारांच्या यज्ञसंस्थेवरून ज्ञापित होतें. यज्ञसंस्थेंत शूद्राचें स्थान महत्त्वाचें होतें. अश्वमेधासारख्या मोठ्या यज्ञसमारंभांत सूत मागध नट इत्यादि शूद्रव्यवसायी लोक इतिहासपुराणें रचून गाऊन म्हणून दाखवीत असत. स्त्रियांमध्ये सूक्तकार ब्रह्मवादिनी सापडतात." तसेंच सतीची चाल नव्हती आणि विधवाविवाहाला संमति होती, असें स्पष्ट दिसतें. (१०.१८.८.) साहित्याचार्य हरदास आपल्या 'वेदांतील राष्ट्रदर्शन' या ग्रंथांत सांगतात, "याप्रमाणे आर्य हा शब्द वंशवाचक असल्याचें व द्रविड नि अनार्य हाहि वंशवाचक असल्याचें व त्यांच्या संघर्षाचें प्रमेय ऋग्वेद व वैदिक वाङ्मयावरून सिद्ध होत नाही. अर्थातच या शब्दांच्या उघड दिसणाऱ्या गुणवाचकत्वामुळे आर्यांच्या रंगरूपादिकांच्यावरून ते भारतांतील मूळ रहिवाश्यांहून वेगळे असण्यासंबंधीच्या कल्पना वेदाच्या आधारें सिद्ध करतां येत नाहीत." आर्यांची स्वाभाविक समाजनिष्ठा यावरून व्यक्त होते. एवढेंच काय, 'हें सर्व जग आम्ही वश करूं, इन्द्र आणि विश्वेदेव आम्हांला साहाय्य करोत (१०.१५७.१.)' असेंच त्यांचें ध्येय होतें.

समाजांतील अगदी सामान्य माणसाविषयी, कसलेंहि काम करणाऱ्याविषयी आर्यांच्या मनांत आपुलकी होती ती केवळ वरवरची नव्हती. केशवसुतांच्या स्त्रीविषयक भावना वैदिकच आहेत. तसेंच अंत्यजांविषयीं आणि मजुरांविषयी त्यांना सहानुभूति वाटली ती त्यांच्या वैदिक वृत्तीमुळेच; त्यांची सहानुभूति उपजतच, पण या परंपरेचीहि जोड तिला मिळाली, असें दिसतें.

संघशक्तीचें महत्त्व आर्यांना कळलें होतेंच. जग आर्य करायचें तर सामर्थ्य हवेंच, आणि संघशक्ति हेंच श्रेष्ठ सामर्थ्य आहे. ऋषि म्हणतात, " तुमचा अभिप्राय एकसारखा असावा. तुमचीं अन्तःकरणें एकसारखीं असावींत. तुमचें मन एक असावें की जेणेंकरून तुमच्या संघशक्तीची बळकटी होईल. (१०.१९१.४.) ". या संघशक्तीचा ऱ्हास हेंच आपल्या अवनतीचें कारण आहे हें केशवसुतांच्या दृष्टीला दिसलें आणि त्यांनी ' तुतारी ' फुंकली—

संघशक्तिच्या भुईत खंदक
रुंद पडुनि शें तुकडे झाले,
स्वार्थानपेक्ष जीवीं अपुले
पाहिजेत ते सत्वर भरले;
घ्या त्यांत उड्या तर बेलाशक !

आर्य म्हणजे आदर्शाची ओढ असलेलीं, अल्पज्ञ (म्हणजे नम्र) आणि पूर्ण होऊं इच्छिणारीं मनुष्यें (१०.७.६.), अनार्य म्हणजे वाटेल तसे वागणारे, आणि राक्षस म्हणजे निरपराधी लोकांना, कोणत्याहि कारणाने कां होईना, छळणारे, अशाच आर्यांच्या व्याख्या असाव्यात. अग्नीची प्रार्थना आहे, " हे अग्ने, तूं सर्वांना बघणारा आहेस. मनुष्यांत लपून बसलेल्या राक्षसांस हुडकून काढ व त्यांचीं तिन्ही डोकीं तोड. (१०.८७.१०.) " राक्षस मानवांतच असतात, ते ओळखूं येत नाहीत, पण त्यांचा मोड झाला पाहिजे, हाच याचा अर्थ नाही काय ? म्हणूनच ' देवदानवां नरें निर्मिलें ' हें सगळ्या लोकांना पटलें पाहिजे हा विचार केशवसुतांच्या मनांत प्रबळ झाला. ऋषींनी मागणें मागितलें, " दिव्यविबुध आम्हांस असा वीर देवोत की जो मानवजातीचें हित करील, ज्याच्यापासून बांधवांस संतोष होईल. " (१.४०.३.) आणि हीच प्रेरणा होऊन केशवसुत उद्गारले —

शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहें !

आर्यांना त्रिवार शांति हवी होती. पण कांही तरी कारणें काढून शांतीला विरोध करणाऱ्यांविरुद्ध योग्य ती उपाययोजना हवीच. म्हणूनच युद्ध करणें भाग पडलें तर ऋषि म्हणतात, "हे धर्मनिष्ठ शूरा, शत्रूंशीं युद्ध करण्याच्या वेळीं मन उदार ठेव. उद्दाम मनुष्याची पर्वा धरूं नको. हविर्भाग सिद्ध कर! (२.६२.२.)" आपलें रक्षण ते देवावर सोपवणारे नव्हते. ते म्हणतात, "हे इंद्रा, तुझ्यापुढे मुलांसह (शत्रूंना जिंकण्याकरता) मी जातों. माझ्या पाठीमागे (संरक्षणाकरता) सर्व देव येत आहेत. जर (शत्रूंच्या संपत्तींत) माझा भाग असेल तर मला शत्रू जिंकण्याचें सामर्थ्य दे. (८.१००.१.)" केशवसुतहि म्हणतात —

कधी कोणी राष्ट्र प्रबल दुसऱ्याला बुडविण्या
जहाजें मोठालीं करिल जरि गे सज्ज लढण्या
तरी सांगोनीयां प्रवर वरूणाला, खवळवूं
समुद्रा तेणें त्या सकल खलनौका चुथडवूं !
गुलामां आणाया निघतिल कुणी दुष्ट नर ते
तरी त्यांचीं फोडूं अचुक खडकीं तीं गलबतें !

हें म्हणतांना केशवसुतांच्या डोळ्यांपुढे काय असावें ?

या ठिकाणीं कुणाच्या मनांत शंका आली की

ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा

असें म्हणणारा माणूस 'वैदिक' परंपरेंत बसतो काय, तर तिला उत्तर 'होय' असेंच आहे. स्वामी विवेकानंदच १८९३ सालीं शिकागोला म्हणाले, "मी एक हिंदु आहें. माझ्या लहानशा विहिरींत मी बसलों आहें. आणि हेंच सर्व जग असें समजत आहें. ख्रिश्चन आणि मुसलमानहि आपपाल्या विहिरींत बसून स्वतःची विहीर म्हणजेच सर्व जग असें त्या बेडकाप्रमाणे समजत आहेत." तेव्हा हिंदु हा शब्द क्वचित् संकुचित अर्थानें वापरला जातो असें दिसतें. पण 'मी हिंदु नाही' असें हिंदु माणूस म्हणूं शकतो कारण त्यामुळे त्याच्या वैदिकत्वाला बाध येत नाही. आणि वैदिकत्व म्हणजेच विश्वधर्म. याचा ग्रंथ कोणता ? स्वामी विवेकानंद सर्वधर्मपरिषदेंत म्हणतात, "वेद म्हटलें म्हणजे कोणत्याहि ग्रंथाचा बोध होत नाही. वेद म्हणजे निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या

काळीं शोधून काढलेल्या आध्यात्मिक नियमांचा (Spiritual Laws) संग्रह होय. गुरुत्वाकर्षणाचा नियम त्याच्या शोधापूर्वी अस्तित्वांत होताच, आणि सगळीं मांणसें विसरलीं तरीहि तो राहणारच; तसेंच आध्यात्मिक विश्वाचें नियमन करणाऱ्या नियमांचें आहे." म्हणजे दृश्य आणि अदृश्य सृष्टि हाच या धर्माचा ग्रंथ होय. हाच धर्म खरा, कायम टिकणारा आणि थोर आनंद देणारा आहे हें उघड आहे.

आर्यांचा हा धर्म त्यांना जीवनावर प्रेम करायला प्रवृत्त करीत होता. त्यामुळे जीवनांतील सर्व उत्कट आणि उदात्त भावना अनुभवाव्या, असें त्यांना वाटत होतें. म्हणूनच वात्सल्य, मित्रप्रेम इत्यादींचीं संस्मरणीय वर्णनें वेदांत आलेलीं आहेत. जीवनाकडे पाहण्याची त्यांची रसिकताहि अतिशय मनोरम आहे. ऋषि म्हणतात, "हे वायुदेवा, प्रियतमा निद्रावश असतां तिचा प्रियकर तिला हळूच जागी करतो त्याप्रमाणे आमच्या अंतःकरणांतील उच्च कल्पना जागृत कर. (१.१३४.३.)" याच सौंदर्यशोधक दृष्टिकोनांतून केलेली वाणी, उषा वगैरेंचीं वर्णनें मुळांतूनच वाचलीं पाहिजेत! आर्यांचें 'गोजिऱ्या' मुलांवर आणि संसारावर मनापासून प्रेम होतें. एके ठिकाणीं तर ते ईश्वराला म्हणतात की, तुमची घरीं वाट पाहिली जात असेल तेव्हा इथे ताटकळतां कशाला? जोडा लौकर रथाला घोडे आणि त्वरा करा. इतर वेळीं आदर्शाच्या ओढीने तळमळणाऱ्या आर्यांना या वेळीं कसली ओढ होती, हें सांगायला नको. पण ते म्हणतातच, "हे तेजस्वी पूषन्देवा, शुद्ध तुपाप्रमाणे हा पिळलेला सोम तुझ्याकडे जातो. आम्हांला स्त्रियांकडे पोचीव. (९.६७.१२.)" अश्वींची स्तुति करतांना ते गातात, "जसें तरुण युवतींचें बोलावणें स्वीकारतात, त्याप्रमाणे उत्सुकतेने तुम्ही आमची स्तुति स्वीकारा." देवांना स्तुति प्रिय; कवींना कविता प्रिय. म्हणून केशवसुत हाच दृष्टान्त देतात—

युवा जसा तो युवतीस मोहे
तसा कवी हा कवितेस पाहे!

ऋग्वेदांत लोपामुद्रेला पाहून अगस्त्यऋषींच्या मनांत उत्पन्न झालेली अस्वस्थता केशवसुत म्हणतात तशीच आहे. (१.१७९.)

प्रिये, माझ्या उच्छृंखल करूनिया वृत्ति सगळ्या,
तुझ्या गे भासाने कवनरचनेला वळविल्या.

अगस्त्य म्हणतात, "मीं पुष्कळ वर्षे रात्रंदिवस एकसारखे कष्ट सोसलेले आहेत; आणि वृद्धदशा ही तर शरीराचा मोहकपणा पार नाहीसा करीत असते. असें असूनहि पुरुषांनी स्वस्त्रीसमागमसुख अनुभवूं नये काय ?......आपण सर्व प्रतिस्पर्ध्यांवर जयहि मिळविला आहे. तुम्हीआम्ही दोघेजण एकमताने वागत आलों आहोंत. तर इहलोकीं ज्यापासून शेकडों लाभ होतात असा संसाराचा पणहि आपण खास जिंकलाच. एखाद्या महानदाला अडवलें असतां तो जसा अनावर होतो, त्याप्रमाणे मला उत्कंठा झाली आहे. येथूनतेथून सर्व तऱ्हेने मी उत्कंठित झालों आहें. मी वीर्यवान्, मोठा बुद्धिमान् व धैर्यबलशाली असून, ही लोपामुद्रा तर जातीची अबलाच, पण हिने मला सर्वस्वी विव्हल केलें आहे. मी जोराने श्वासोच्छ्वास करीत आहें, पण मला ती शोषूनच टाकीत आहे...मनुष्यप्राण्याला शेकडो वासना असणारच!... " केशवसुतहि प्रीतीचा उद्वेग असाच व्यक्त करतात, "वेडापीरच जाहलों जिवलगे आहें वियोगामुळे!...विरही मी पीडित झालों हृदयीं उत्कंठा अनलें...तेणें मी विव्हल भारी... " इत्यादि. बायकाविषयी बोलणें बिलकूल न खपण्याइतकी केशवसुतांची संयमी वृत्ति, त्यांचें पत्नीप्रेम, त्यांचा व्यवसाय, त्यांचे संस्कार, तत्कालीन चालीरीति वगैरे गोष्टी लक्षांत घेतां, त्यांनी अशा प्रकारचे उद्गार काढावेत हें एकदम पाहिलें तर आश्चर्यच वाटतें. परंतु वैदिक वाङ्मयांतील रसिकता पाहूनच, अशा भावनांचा आविष्कार करण्यांत काय गैर आहे, असा विचार त्यांच्या मनांत आला असला पाहिजे . वेदांतील जीवनक्रम अक्षरशः नैसर्गिक होता. केशवसुतांनाहि प्रीति निसर्गीतच दिसते. 'प्रीति जगाचें वसन विणितसे' हें तत्त्व सांगतांना ते म्हणतात—

मेघ विजेला नभीं सोडुनी खालीं ये, परि तो
रविदीप्तीच्या दिव्यरथीं तिज भेटाया वळतो !

समुद्रशोभा पाहणाऱ्या स्त्रीस ते 'अहा! गे सृष्टीच्या वरतनु सुते!' असेंच संबोधितात. 'मनोहारिणी' म्हणजे 'सृष्टिलतेची कलिका फुलली' अशीच कल्पना स्वाभाविकपणेंच त्यांच्या मनांत येते. मीतूंपणाचा विसर पाडणारें आणि 'हृदय माझें तव उरीं हाल्ताहे' असेंच अद्वैत'प्रेम त्यांना हवें होतें. याच अद्वैताचें ते भावमय वर्णन करतात —

तेणें व्याकुल होउनी झडकरी मी झांकितों लोचनें;
माया–ईश्वर, पूरुष-प्रकृतिही, वागर्थ, ऐशीं द्वयें
सम्यग्युक्त, बघून आंत, उघडीं त्रासून मी ईक्षणें,
तों नित्य द्युतिदेवतेसह रमे तो दृग्पथीं सूर्य ये !
त्यायोगें विरहाग्नि फार भडके ! – होतें नकोसें जिणें;
आता हाय ! न राहवे तुजविणें, कैसे करूं गे सये !

केशवसुतांनी या ‘ वियुक्ताचा उद्‌गार ’ या कवितेचें हें पाठांतर कां केलें असावें ? त्यांचें आपल्या अमृतपरंपरेवरील असलेलें स्वाभाविक प्रेम हेंच याचें कारण नाही काय ? केशवसुतांच्या प्रीतिविषयक भावनांचा विचार करतांना, अन्तःकरणपूर्वक करावयाच्या कर्तव्यावर त्यांनी दिलेला भरहि लक्षांत येतो आणि त्यांच्या या विषयावरील विचारांची उंची लक्षांत येते. ‘ प्रियेला सादर केलेली पुष्पमाला किंवा कर्तव्य आणि प्रीति ’ या कवितेंत हा विचार मांडून ते सृष्टीचें तत्त्व सांगतात —

अन्याने न अपेक्षिलें प्रियतमे ! जें आपणापासुनी,
तें सद्वर्तन दावितां सहज तो जातो मनीं मोहुनी,
त्याच्या गे हृदयांत नंतर उठे उद्वेग तो प्रीतिचा;
ऐसा आपण पाहतों नियम हा कान्ते ! सदा सृष्टिचा !

अशीं सृष्टीचीं तत्त्वें सांगणारे ते कवि. दृश्य आणि अदृश्य सृष्टीच्या अभ्यासांतून आणि चिंतनांतून ऋषींना शास्त्रीय आणि धार्मिक तत्त्वें स्फुरलीं; त्यामुळे त्यांना जो दिव्य आनंद झाला त्यांतूनच त्यांना कलेचाहि साक्षात्कार घडला. त्याचाच आविष्कार त्यांनी काव्याच्या आणि गायनाच्या द्वारें केला. त्यांना कोणत्या गाण्याचा नाद होता ? “ मन तल्लीन झालें असतांना रचलेल्या प्रार्थना जेव्हा बुद्धिवान् (भक्त)जन (प्रेमाने) गात बसतात त्या वेळीं त्यांस ह्या जगांत देवाचें ज्ञान होतें. (१·६७·२.) ” त्यांचें गाणें कसें होतें ? “ ऋत्विज सर्वांगसुंदर गायनाचे आलाप खड्या सुरांत काढीत असतो. (१.१४४·१.)” तें गाणें ऐकतांना, गातांना त्यांना काय वाटे ? “ गायनांचा घोष द्युलोकापर्यंत जाऊन पोहोचतो. (१·८३·६) ” अशा रीतीने आर्यांची कला नैसर्गिकपणेंच उद्‌भवलेली आणि सत्य, सौंदर्य आणि स्वर्गीयता यांच्या सान्निध्यांत राहूं इच्छिणारी होती. ही सृष्टीच गात आहे असें केशवसुतांनाहि वाटतें.

वयस्या, गाते ही मृदुघनरवें सृष्टि मधुरं !

त्यांना ' गाणारे शब्द ' केव्हा मिळतील अशी आस लागलेली होती..

वाग्देवी शारदे गे ! फिरवुनि अपुले शब्द पाचार येथे
साहाय्यावीण त्यांच्या भजन तव कसें सांग साधेल मातें ?
हृदय आत्म्याला जधी आळवीतें;
तधी तुमचें तें नको कलाज्ञान,

असें ते म्हणतात, तेव्हा कला ही नैसर्गिक असावी, उत्स्फूर्त असावी यावरच ते भर देतात; कारण अशीच कला स्वर्गीय बनते, स्वर्गापर्यंत पोहोचते आणि मग तेथील तारका म्हणते—

" तुझीं गीतें परिसून मी प्रसन्न !
तुझ्या दिव्यत्वापुढे जग भिकारी ! "

ज्या वाणीने हें काव्यगायन करायचें तिचें वर्णन वेदांत केलें आहे — ' तेव्हा (देवांनी व ऋषींनी) वाणीस गंधर्वाकडे पाठविलें. वाणी गायत्री वगैरे छंदांच्या रूपाने देवांकडे गेली. तेव्हा तिने पक्ष्याचें रूप घेतलें होतें. आणि तेथून तिने सोम आणला. (मंडल ९)'. याच दिव्य वाणीच्या दृश्य स्वरूपाला म्हणजे गाणाऱ्या शब्दांना केशवसुत ' शब्दांनो ! मागुते या ! ' अशी हाक मारतात; कारण त्यांना आपल्या मनःचक्षूंसमोर ती अतिसुंदर पक्षिरूप वाणी दिसते—

तेजाचे पंख वाऱ्यावरि हलवित ती चालली शब्दपंक्ति !

या वाणीने स्वर्गीय सोम आणला, असें जें वर्णन केलें आहे, त्यांत केवढा अर्थ आहे ! आणि केशवसुत हर्षभराने हाच सोमाचा रस मागत आहेत !

ज्ञान-धर्म-कला यांचें अद्वैत ऋग्वेदांत स्पष्ट आहे. दिव्यैश्वर्यमंडित इंद्र अचिंत्य वाटतो पण एकाग्रतेने त्याचें ध्यान केलें पाहिजे असें सांगून ऋषि म्हणतात, " तीव्र प्रेरणेने स्फुरलेल्या सत्यार्थबोधक सूक्ताचा तुज इन्द्राशीं योग होवो. (१·१२९·७.)" कवि गूढ अर्थ उकलीत असतो (४·१६·३.) म्हणून त्याला विचारतात, " उदकपूर्ण असणाऱ्या ह्या नद्या ' अलला ' असा शब्द करीत गर्जत चालल्या आहेत. हे ऋषे हें काय म्हणतात तें ह्यांना तूं विचार. उदक कोणत्या आवरक मेघाला फोडीत आहे ? (४·१८·६.)" अशा रीतीने

कवि हा सृष्टीचीच भाषा बोलत असतो, आणि ज्ञान-धर्म-कला प्रकट करीत असतो, म्हणूनच केशवसुत म्हणतात —

तो गम्भीर वदे रवा, तर, मुक्या पृथ्वीस या वाटतें
कीं, " मातें श्रुति लक्षसंख्य फुटल्या " आणीक ती ऐकते !

हें गूढ उकलण्याचें गहन कार्य करणें कवींना शक्य होतें कारण त्यांना दिव्य मार्गदर्शनहि लाभतें. ऋषींचा संबंध देवापर्यंत पोचतो. (१.१३९.९.) एवढेंच काय, देवापासून ऋषि झाले. (१.१६४.१५.) केशवसुतांच्या काव्यांत तारा दिव्याला सांगतो—

ज्ञाते, आणि भविष्यवादिहि, कवी, ते चित्रकर्ते तसे
मत्तेजें फिरतात, अन्य जन हे तूझ्या प्रकाशें जसे.

असें हे कवि देवांचे आणि सृष्टीचे लाडके असतात हें काय सांगायला पाहिजे ? इंद्र हा अंगिरा ऋषींचा कैवारी आहे. (२.११.२०.) पूर्वी त्या थोर नद्या ऋषीस म्हणाल्या, " हे स्तोत्या, आम्ही तुझें म्हणणें ऐकतों. (कारण) तूं गाडींत आणि रथांत बसून दुरून आला आहेस. आम्ही तुझ्याकरता खालीं वांकतों. आई मुलाला पाजण्याकरता किंवा मुलगी बापास नमस्कार करण्यास लवते त्याप्रमाणे तुजकरता मी नमतें ! (३.३३.१०.) " केशवसुतांचे उद्गार प्रसिद्धच आहेत —

आम्ही कोण म्हणूनि काय पुससी ? आम्ही असूं लाडके
देवाचे, दिधलें असें जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार आमुची दृष्टि पहाया शके !

असें असल्यामुळेच—

दृष्टी तो फिरवी वरी, तर लवे आकाश तें खालती !

आपल्या या दिव्य दृष्टीमुळेच भयंकर वाटणाऱ्या गोष्टींतूनहि तो तत्त्वें शोधून काढतो, म्हणूनच—

श्वासोच्छ्वास करी परी नवल हें – जीवित्वसंहारक
वायू घेउनि आंत, तो त्यजितसे वायूस त्या पोषक !

अशा रीतीने सृष्टीचीं तत्त्वें म्हणजे सृष्टीची नाडीच कवींच्या करांत वाहत

असते; जीवन कसें रचावें हें त्यांना अवलोकन – मनन – कल्पना – चिंतन इत्यादींच्या द्वारें ज्ञात झालेलें असतें. साहजिकच त्यांची पात्रता आणि सामर्थ्य विलक्षण वाढलेलें असतें. अशा ऋषींवांचून जग चालूं शकणार नाही, असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति किती असणार ? वेदांत म्हटलें आहे, " कवींना ते कवि कसे झाले तें विचार. मनस्वी आणि सत्कृत्यें करणारे असे ते कवि द्युलोक तयार करते झाले. (इंद्रा) हीं आम्हीं तयार केलेलीं, तुझें महत्त्व वाढविणारीं व मन प्रसन्न करणारीं अशीं स्तोत्रें तुझी धारणा करोत. त्यांनी येथे सर्व तऱ्हेने गूढ कृत्यें करीत द्यावापृथ्वींना बळकटी आणली, द्यावापृथ्वीला मापांनी मर्यादा उत्पन्न केली आणि द्यावापृथ्वीच्या धारणे-करता मध्ये अंतरिक्ष उत्पन्न केलें. (३.३८.२,३.) अंगिरसांनी स्तोत्र-घोषाने पर्वताचा भंग केला. त्यांनी आमच्याकरता विस्तीर्ण द्युलोकाकडे जाण्यास मार्ग तयार केला. आणि दिवस, स्वर्ग, दीप्ति आणि उषःप्रकाश ह्यांचा लाभ करून घेतला. (१.७१.२.) हे इंद्रदेवा ! राक्षसांना ठार करणारे पराशर – शक्ति – वसिष्ठप्रभृति ऋषि तुझी कृपा मिळविण्याच्या बुद्धीने घरामध्ये तुला प्रसन्न करतात. (७.१८.२१.) " अशा ऋषींची जगाला अत्यंत आवश्यकता आहे, हें सांगायला नकोच. म्हणूनच म्हटलें आहे, " ह्या ऋषिमंडळीच्या योगाने आम्हांला सहस्रावधि लाभ होवोत. (१. १८९. ८.) " परंतु मानवच काय, इंद्रहि ऋषींना म्हणाला, " वृत्रासुराच्या ब्रह्महत्येच्या पातकापासून सामगायन करून (मला) शुद्ध करा. (८. ९५. टीप.) " कवींची पात्रता एवढी असल्यानेच केशवसुत म्हणतात—

> **चाले तो धरणीवरी तर पहा ! जेथूनि तो चालिला**
> **धूलि तेथिल होतसे कनकिता !–घेऊं नका भ्रान्तिला.**

कवींच्या हृदयांत प्रतिभेचा संचार झाल्याबरोबर त्यांच्या—

> **दैत्यांचें बल देवसत्त्वाहि तसें अंगीं चढे त्या क्षणीं**

आणि त्यांच्या तोंडून दिव्य वाणी बाहेर पडते; मग—

> **त्याच्यांतून भविष्यवाद निघती, ऐकून ते सादर**
> **ब्रह्म्यातें क्षमता नवीन-रचना-कार्य क्रमीं लाभते !**

म्हणूनच केशवसुत आकाशवाणी व्हावी तसे बोलतात—

ते आम्हींच सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे
ते आम्हींच शरण्य मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें !
आम्हांला वगळा – गतप्रभ झणीं होतील तारांगणें
आम्हांला वगळा – विकेल कवडीमोलावरी हें जिणें !

केशवसुतांच्या एकंदर काव्याचें स्वरूप भावकाव्याचें आहे, हें स्पष्ट आहे. हेंच कवींचें एक प्रमुख कार्य अशी ऋषींची कल्पना असल्याचें दिसतें. "एखादा कवि ज्याप्रमाणे कोमल अंतःकरणवृत्तींची आपणांस ओळख करून देतो, त्याप्रमाणे जगांतील सौंदर्याची ओळख उषेनेच आपणांस करून दिली आहे. (१. १२४. ४.)" बालपणांतील मनाची कोवळीक जतन करणें, प्रेमळपणा कायम टिकवणें हें कवीचें ब्रीद आहे, असें केशवसुत म्हणतात.

प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे.

कवि हे प्रेमळ लोकांतहि विशेष प्रेमळ असतात, असें वेद सांगतातच. (१. १२९. १.) काव्य कसें असावें ? वेदांत म्हटलें आहे, " हे मरुत् देवांनो, गौतमाने जें स्तोत्र गायिलें तें इतकें यशस्वी होतें की, कोणत्याहि दुसऱ्या स्तोत्राने इतकी खळबळ उडवून दिली नाही ! (१. ८८. ५.)" केशवसुतांनी आपल्या अनेक कविता खळबळ उडावी म्हणून लिहिल्या असें वाटतेंच. पण त्यांच्या सर्व काव्यानेच खळबळ उडवून दिली ! ऋषि म्हणतात, " हे बलिष्ठा, जे तूं नवीन पराक्रम करशील ते आम्ही यज्ञांत वर्णन करूं. (५. २९. १३.)" केशवसुतहि पराक्रमाची प्रेरणा देत म्हणतात —

स्फूर्तींचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल !

'काव्य कोणाचें ?' असें रसिकाने विचारलें तेव्हा 'माझें नाही' असें केशवसुतांनी सांगितलें. त्यावर तो मार्मिक सरळ म्हणाला—

" काव्य लिहिलें हें सत्य तूं असुन
" नव्हे माझें हें–नव्हे तें " म्हणून
सांगसी, तर परकीय कल्पनांतें
तुवां घेउनि योजिलें, गमे मातें. "

हा अभिप्राय महत्त्वाचा म्हणून त्यावरील उत्तरहि महत्त्वाचें.

" शारदेने जो मंत्र दिला कानीं,
तसें लिहिलें मीं;—काव्य तिचें मानी ! "

' जें पृथ्वीवर आणिलें ' असेंहि केशवसुत आपल्या काव्याविषयी उद्‍गारतात. ' हे अग्ने, कवींचीं स्तोत्रें स्वर्गावरून आलीं आहेत.' असें वेदांत म्हटलें आहेच. (३. १. २.) परंतु शेवटीं काव्याचा हेतु काय ? वेदवाणी सांगते, "देवसमुदायास प्रेमानेच संतुष्ट करणाऱ्या, कर्मव्यापृत, परंतु निर्लोभ अशा त्या प्रार्थना अग्नीकडे गमन करीत असतात. (१. ७१. ३.) " आणि केशवसुत लिहितात—

' करूनि तें दंग मनांत गुंगणें
तदीय हा सुंदर हेतु मी म्हणें '.

असे कवि ज्या आर्यांचे प्रमुख होते, त्यांचें नित्याचें संभाषणहि ' सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् ' याच प्रकारचें असणार यांत शंका नाही. वाणीचें महत्त्व वर्णन करतांना वेदांत म्हटलें आहे, " सुपाने सातु शुद्ध केल्याप्रमाणे जेथे थोर लोक काळजीपूर्वक भाषण करतात, अशा ठिकाणींच मित्र मैत्री जोडतात. अशा लोकांच्या वाणींत कल्याणकारण (पद्धत) लक्ष्मी वास करीत असते. (१०. ७१. २.) " " हे वाग्देवते, तूं आम्हांस संपत्ति दे, " अशा त्यांच्या प्रार्थना असत. त्या काळाशीं आजची तुलना केली म्हणजे केशवसुतांप्रमाणेच म्हणावेंसें वाटत नाही काय ?

वाग्देवी गे ! दे शब्दांतें
भोवऱ्यांत या फेकुनि, त्यांतें;
जरा जाउं दे निजधामातें,
नरें मळविलें अहह ! तेज तें पूर्वी होतें जें त्यांत !

विचारांचे भोवरे निर्माण व्हावेत आणि त्यामुळे जीवन–मंथन व्हावें, अशी त्यांची तळमळ होती. तिच्यांतूनच हे शब्द बाहेर पडले. खरोखरच, आर्यांचें तेजस्वी जीवन मनांत आणलें असतां, माणसाने स्वतःला किती हीन करून घेतलें आहे, असा दुःखाचा उद्‍गार आपल्याहि तोंडून आपोआपच बाहेर पडत नाही काय ? आणि ज्या पुण्यभूवरतीं ही थोर परंपरा येथील मानवांनी त्या दिव्य गायनाने स्वर्गाला आवाहन करून खाली स्थापन करावें म्हणून

निर्माण झाली, त्याच ठिकाणीं त्याच भूमीच्या पुत्रांनी आपलें रूप न ओळखतां आणि मग त्याच बुद्धीने आपल्या भूमीचेंहि स्वरूप न लक्षांत घेतां तिला लत्ताप्रहार करून केवळ काल्पनिक सुखाच्या मागे लागावें हें तर किती विलक्षण खेदजनक! उच्च विचार करणाऱ्या माणसाचे पाय जमिनीला टेकायला नकोत काय? पण याउलट त्याने जमिनीला लाथाडावें ना! या दुःखाने व्याकुळ होऊन केशवसुत निःश्वसितें टाकतात—

तेव्हापासूनि ही धरा झुरतसे! माते! चुकी जाहली!
स्वर्गा! तूंहि अम्हां क्षमस्व सदया!–ये खालता भूतलीं—
ये बा! आणिक या धरेस अगदी देऊं नको अन्तर!
आहे तूजवरी तसेंच बसलें स्वर्गा! तिचें अन्तर!

केवढा हा दिव्य प्रणय! केवढी भव्य तो पाहण्याची मनीषा! आणि केवढी ती स्वतःची चूक नसतांना कवि या नात्याने सगळ्या दोषी मानवाच्या दोषाचें खापर आपल्याच डोक्यावर घेऊन त्याच्याच भल्यासाठी क्षमायाचना करण्याची वृत्ति! केवढा मानवतेवर विश्वास! केवढा जगाच्या भवितव्याविषयीचा आशावाद! 'कांट्यांवांचुनि गुलाब नाही' हे उद्‌गार अशाच कवीच्या तोंडीं शोभत नाहीत काय? 'काय निराशा असे बरें? बुजग-बाहुलें जगांतलें!' असे उद्‌गारहि त्यांनीच काढावेत!

केशवसुतांचा हा दृढ विश्वास पाहिल्यावर ती अढळ अमृतपरंपराच त्यांच्या तोंडून बोलत आहे असें वाटतें. त्यांच्या चित्तवृत्तीला या परंपरेचें अधिष्ठान लाभलें. पण ही परंपरा त्यांनी केवळ तटस्थपणें आकलन करून घेतलेली नव्हती, तर तिचा साक्षात्कारहि त्यांना झाला होता. केशवसुतांचें बोलणें प्रचीतीचें आहे, असें त्यांचें काव्य वाचून सहजच मनांत येतें. ऋषींना, संतांना, कवींना येणाऱ्या कांही विलक्षण अनुभवांचा विचार मन करूं लागलें की प्रा. माटे 'श्रीरामदासस्वामींचें प्रपंचविज्ञान' या ग्रंथांत तुकारामबावांच्याविषयी जसें लिहितात तसेंच वाटल्यावांचून राहत नाही. "कांही काळपर्यंत आपण बरोबरच चालतों, बोलतों. पुढे आपण थांबतों, पण बावा पुढे चालले आहेत हें स्वच्छ दिसतें. कांही वेळाने बावांचें केवळ अंधुकच दर्शन होत राहतें आणि शेवटी ते इतके दूर जातात की, 'यतो वाचो निवर्तन्ते' हा जो परमार्थांतील श्रेष्ठ अनुभव तो आपल्याला तुकाराम-

बावांच्या या संगतींत प्रत्ययास येतो, आणि आपले डोळे निराशेने परत फिरतात. ”

—“ कांही सुन्दर देखिलें खचित मीं, यामाजि शंका नसे !
हा ! हा !—हे जर सर्व भास धरतां येतील मातें, तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर ! ”

—‘ दिक्कालासहि अतीत झालों;
उगमीं–विलयीं अनन्त उरलों;
विसरुनि गेलों अखिलां भेदां ’

—‘ प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें
तेथे स्वच्छंदें विचरतां मोद मनीं कोंदे; ’

अशा प्रकारचें केशवसुतांचें काव्य वाचतांना तें सुदूर तारकेप्रमाणे उज्ज्वल पण अंधुक आहे असेंच मनांत येतें. पण केशवसुतांचे हेहि विचार वैदिक परंपरेला धरूनच आहेत, असें दिसतें. सृष्टींत कांही दिव्य भास होतात, पण ते आपला प्रभाव दाखवून झटकन् लोपून जातात, ते सुंदर असतात, त्यांयोगें जीवन पूर्णपणें बदलून, सुधारून उंचावतां येईल, असें ते म्हणतात. म्हणजेच, सृष्टींतील (सृष्टि या शब्दांत निसर्ग, मानव, दृश्य, अदृश्य या सर्वांचा अंतर्भाव होतो असें दिसतें) सत्य, ऋत, हें अतिशय सुंदर असतें आणि त्यामुळे जीवन शिव, मंगल बनतें, असेंच नाही काय ? सत्यामुळे ज्ञान, सौंदर्यामुळे कला आणि मांगल्यामुळे धर्म मिळतो. या त्रयीचा उगम वेदांत आहे आणि ही त्रिमूर्ति एकच आहे, हें आपण पाहिलेंच. अशा या तत्त्वाची स्फूर्ति झाल्यावर सृष्टीशीं आपण एकरूप झालों आहोंत असें वाटून मनांत आनंद कोंदणें हें स्वाभाविकच. याच श्रेष्ठ आनंदाचें वर्णन ‘ झपूर्झा ’ या कवितेंत केलेलें आहे. माणसाला जेव्हा ध्येयाची ओढ लागते तेव्हा त्याच्या सुप्त शक्ति प्रकट होतात आणि त्यांच्या प्रभावापुढे नेहमीच्या सामान्य वृत्ति लुप्त झाल्यासारख्या वाटतात. त्या ध्येयाशिवाय त्याच्या मनांत दुसऱ्या कशाचीहि आवड राहत नाही आणि दुसऱ्या कशाचा विचार त्याच्या मनांत येत नाही. सामान्य गोष्टींतच गुंतून राहणाऱ्यांना हें कळणार नाही. ते अशा ध्येयवेड्यांना हसणार. सृष्टीचें रहस्य शोधण्याचें ध्येय स्वीकारलेल्यांनी अज्ञातामध्येच उडी घेतली पाहिजे.

सृष्टीचीं तत्त्वें शोधण्याची वृत्ति कांहींना उपजत लाभते. पण त्या सत्य तत्त्वाचें सौंदर्य आणि मांगल्य जे लक्षांत घेतील त्यांनाहि तें शोधण्याचें कार्य करतां येईल. ती त्रिमूर्ति त्यांना स्फूर्ति देईल. सृष्टींतील मूलतत्त्वांची संगीतमय क्रीडा चालू आहे. तें सत्य, ऋत, ओळखणें हेंच ज्ञानाचें कार्य. तें सुंदर तर आहेच; पण हें मनावर ठसवायचें असेल तर, तें सत्यच सुंदर आहे, मंगल आहे, ज्ञान–धर्म–कला एकच आहेत, हा मंत्र जपत राहा. सृष्टींत प्रेम आहे, हर्षमय नृत्य आहे, त्यांतून खपुष्पें मिळतात म्हणजे अपूर्व गोष्टी घडतात. त्या सृष्टीच्या मूल रहस्यापर्यंत जायचें असेल, तो अवर्णनीय आनंद पाहायचा असेल, तर सत्य तेंच सौंदर्य तेंच मांगल्य, म्हणजेच ज्ञान तीच कला तोच धर्म, उद्बोधन म्हणजेच मनरंजन म्हणजेच शाश्वत शांति हा विचार ध्यानांत घेऊन विवेकाने वृत्ति एकवटून दंग व्हा! अशा रीतीने सृष्टीच्या अमृतध्वनींतूनच झपूर्झाचा प्रत्यय येतो. केशवसुतांच्या हातून जेवढी काव्यरचना झाली आहे तेवढी लक्षांत घेतां झपूर्झा हा तिचा कळस आहे, असें म्हणावेंसें वाटतें.

सृष्टीचे अमृतध्वनि ऐकण्याची, त्यांत दंग होण्याची आणि त्या अर्थाचे बोल इतरांनाहि दाखवण्याची सनद केशवसुतांना लाभली होती. त्यांच्या उदात्त बुद्धीला अलौकिक असें जें कांही तें तें हवें होतें. उदात्त बुद्धीची युति झपूर्झाशीं निरंतरपणें व्हावी, समसमा संयोग व्हावा, त्यांचा चुकूनहि वियोग होऊं नये असेंच कुणाहि कविवृत्ति समजणाऱ्याला वाटणार नाही काय? पण पत्नीचा पतीवर असतो तसा उदात्त बुद्धीचा या श्रेष्ठ तत्त्वावर हक्क असूनहि तिला तें मिळूं नये ना! तोच तिचा राम! तो गेल्यावर तिला संसाराचें काय! उदात्त बुद्धीला झपूर्झासाठी झुरत कां पडावें लागतें? झपूर्झाचें दर्शन होतांक्षणींच प्रथम उदात्त बुद्धीला धक्काच बसला, आणि कांही कळत आहे की नाही हेंच कळेना. कळत तर होतें, अगदी नवीन, सुंदर,... पण त्याहूनहि पुष्कळच अधिक असें कांही तरी!

काय म्हणावें या स्थितिला?—
झपूर्झा! गडे झपूर्झा!

त्याच क्षणीं उदात्त बुद्धीला कळून चुकलें की आपला जन्म झपूर्झासाठीच! या प्रत्ययाने तिची पातळी उंचावली आणि तिला व्यर्थी अधि-

कच अर्थ वसतो हें दिसूं लागलें; आणि मग ती बोलूं लागली. ज्यांची पातळी अशी उंचावलेली नाही, ज्यांना सृष्टीच्या रहस्याची ओढ नाही ते हसूं लागतील असें तिला वाटूं लागलें. पण झपूर्झाच्या प्रेमाने तिला निर्भय केलें. ती त्या नांवाचा जप करतां करतां नृत्य करूं लागली आणि गाऊं लागली—

झपूर्झा ! गडे झपूर्झा !

हिचेंच वर्णन याआधी केशवसुतांनी ' कल्पकता देवी ' म्हणून केलें नाही काय ? पण या बुद्धीने ही खरी जाणीव होण्यापूर्वी अजाणपणें सामान्य संसार मागून घेतला ! दिलें काय आणि घेतलें काय ! मग साहजिकच देह एके ठिकाणीं आणि चित्त दुसऱ्या ठिकाणीं अशी द्विधा स्थिति झाली. पण झपूर्झाचा भास निसर्गाच्या सान्निध्यांत पुनःपुनः होऊं लागल्याने शेवटी लोकलाजहि दूर पळाली. उदात्त बुद्धि आणि झपूर्झा यांची गाठ पडल्यावर थक्क करणारे शब्द जन्मणार, हें काय सांगायला हवें ? आणि तसें ऐक्य होऊं लागलें तर कुणी कांही हातचें ठेवील काय ? म्हणूनच उदात्त बुद्धीची तगमग चालू आहे. तसें ऐक्य न झाल्याने चुकल्यासारखें वाटून उदात्त बुद्धि सर्वत्र झपूर्झाचा शोध घेत वणवण हिंडत आहे !

याच उदात्त बुद्धीने केशवसुतांना नादीं लावलें होतें आणि वेडें केलें होतें. उदात्त बुद्धीची झपूर्झाशीं निरंतर युति व्हावी, सृष्टीचे अमृतध्वनि ऐकावेत, ईश्वरेचें स्तन्य लाभावें, म्हणूनच जगणाऱ्या ऋषींना आणि संतांनादेखील केवढी तळमळ लागून राहिली होती ! पण तसें जीवन पात्रता असूनहि जगतां न आल्यास श्रेय हरपलें असें वाटून त्या दुःखाने प्राण फुटूं पाहतो की काय असें वाटावें, आणि मग इच्छित न मिळे कांही म्हणून जग भिकार वाटून, सृष्टिकर्त्याला सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा व्हावी, हें सुसंगत दिसतें असें म्हणावेंसें वाटत नाही काय ?

केशवसुतांच्या उदात्त बुद्धीला जीवनांतील हा श्रेष्ठतम आनंद हवा होता. म्हणूनच त्याच्या प्राप्तीकरता ती झुरत पडली होती, हें अगदी उघड नाही काय ? पण ' हरपलें श्रेय ' ही कविता ' मूळ ' इंग्रजी कवितेचें ' रूपांतर ' आहे हें गृहीतच धरून पाहणाऱ्यांना ' मूळची ' कविता ' वरच्या दर्जाची ' आणि ' अधिक तत्त्वज्ञानात्मक असूनहि अर्थप्रतीतीस अधिक सुलभ '

वाटावी, हें सरळच आहे. पण 'मूळ' इंग्रजी कवितेवरून या कवितेकडे पाहिलें असतांहि, या कवितेचा अर्थ उमगत नाही, स्पष्ट होत नाही, असें या टीकाकारांना कबूल करावेंच लागलें आहे ! आणखी असें की, केशवसुतांना मुलांचें प्रेम होतें, त्यांच्या गोड मनोवृत्तीचें त्यांना कौतुक वाटत होतें, हें खरें; पण ज्या 'उदात्त बुद्धीला संसारांत राम नाही ती अलौकिकासाठी झुरणारी बुद्धि' बाल्यांतील आनंदासाठीच झुरत होती, असें म्हणतां येईल काय ? बाल्यांतील आनंदाचें महत्त्व मान्य करूनहि, जीवनांतील श्रेष्ठ आनंद तोच, तेवढाच, असें कुणाला वाटेल ? लहानपणीं किंवा आयुष्याच्या प्रारंभीं अजाणपणांत सुख होतें, तें जाणिवेने नष्ट झालें,त्यामुळे लहानपणाचें सुख नाही, प्रौढपणाचें सुखहि नाही, अशी विलक्षण अवस्था झाल्यानेच केशवसुत इतके अस्वस्थ झाले आहेत. अजाणपणें जें मागितलें तें मिळालें, पण त्यासाठी भलतीच किंमत द्यावी लागली. निज श्रेयाची जाणीव लवकर झाली असती आणि ही किंमत त्यावर खर्च केली असती, तर जें मिळालें असतें तें आता कसें मिळणार, हें त्यांचें दुःख आहे. रोजच्या कार्यक्रमांत गुंतून राहायचें म्हटलें तरी आता जाणिवेची वेदना होत राहतेच. घरांतल्या कामांत व्यग्र असतां झरोक्यांतून किरणशलाका येतांच भोवतालचा अंधार आणि तें तेज जाणवतें, मग हातांतील कामांची आबाळ जाचते पण त्याचें वेड लागतेंच, असें केशवसुत सांगतात. पुढे, निसर्गांत तो आनंद दिसतो असें स्पष्ट वर्णन आहे. निसर्गाचें सरळ साधेंपण, त्याची नैसर्गिक भव्यता उदास, बालाच्या मनांत भरणें शक्य आहे काय ? निसर्गानंद आणि बाल्यानंद एकच काय ? बाल्यानंदासाठी मुलांचे मेळावे सोडून कवि निसर्गात विजनीं हाका कुणाला मारतो ? त्रिखंड कां धुंडतो ? बाल्याच्या आनंदाची केवढीहि परमावधि झाली तरी त्यांतून—

> **'एक शब्द बोलेन जरी**
> **सकलां कुण्ठित करिन तरी !'**

असें काय बाहेर पडणार की ज्यासाठी 'पडाव्या जिवलगांसी तुटी । सर्वस्व अर्पावें शेवटीं । प्राण तोही वेचावा' या भावनेने कवि सिद्ध झाला आहे ? बाल्यांतील मनोवृत्ति कौतुकास्पद खरी, पण तिचा वयाबरोबर विकास व्हायला हवा आणि सृष्टीचें रहस्य जाणण्याची जिज्ञासा, तें शक्य तितकें कळ-

ण्याची पात्रता आणि त्याचें रसग्रहण करण्याची वृत्ति यांची उत्तरोत्तर होत जाणारी वाढ तिला लाभायला हवी. केशवसुतांना तर याहूनहि मोठ्या आनंदाची ओढ आहे — तो झपूर्झा, हें आपण पाहिलेंच. त्याचें दर्शन झालें पण निरंतर लाभ झाला नाही, एवढेंच नव्हे तर 'मन चिंती तें वैरी न चिंती' या नात्याने 'तो हरपला' असें त्यांच्या प्रसंगीं प्रखर होणाऱ्या पण मुळांत शिरीषकोमल असलेल्या मनाने घेतलें आणि मग—

अशी आगळी
परी बावळी
आहे दुबळी

अशी त्यांच्या बुद्धीची अवस्था झाली! पुढे काय झालें असतें हें पाहावला रात्र आणि दिवसांच्या हातांनी अधिकाधिक कवटाळणाऱ्याने आणि आकार नष्ट करणाऱ्याने त्यांना ठेवलें नाही. त्याच गूढ स्वरूपांत ते विलीन झाले!

केशवसुतांनी इंग्रजी काव्य वाचलें नव्हतें असें नाही. त्यांची मूळची वृत्तीच चौकस, रसिक, सर्वसंग्राहक आणि तिच्यावर पुनः वैदिक विश्वप्रेमाचे संस्कार झालेले! त्यामुळेच त्यांनी 'ईश्वराचा ग्रंथ', 'जगामधी या तुला कशाला परमेशें घाडिलें' अशा वैदिक विचारांना सदृश असणाऱ्या कविता टिपल्या. त्यांतहि ह्यूगोसारख्यांचा त्यांनी फक्त आकार घेतला. 'वैदिक परंपरेंतील स्वयंभू कवि' या नात्यानेच त्यांनी इंग्रजी काव्याकडे पाहिलें, आणि सुनीत हा प्रकार मराठींत रूढ केला. इंग्रजीवरून घेतलेल्या त्यांच्या कांही कविता मुळांपेक्षाहि सरस वाटतात, याचें रहस्य काय? इंग्रजी काव्य समोर दिसत असतां त्यांतील चांगला भाग न निवडणें हेंच वैदिक परंपरेला सोडून झालें असतें! पण त्याचें तारतम्य अगदी सुस्पष्ट आहे. केशवसुतांच्या एकंदर कवितांत भाषांतरित कविता आधी किती आणि त्यांत वैदिक परंपरेंत न बसणाऱ्या किती, हा प्रश्नच आहे! वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावादी विचारसरणी, कलाप्रेम अशा जीवनव्यापी गोष्टी आणि याहूनहि थोर गूढ पण जाणवणारें असें कांही तरी 'नैसर्गिकपणें'च वैदिक परंपरेंत असतांना ती सोडायची कल्पना केशवसुतांना स्वप्नांतदेखील शिवली असेल असें वाटत नाही. दुसरा कसलाहि विचार न करतां, केवळ जीवनास आवश्यक अशा गोष्टींचाच संग्रह करायचा असें म्हटलें तरी सत्यव्रत, निःपक्षपाती अशा माणसाला

वेदांचा विचार न करून चालेल असें वाटत नाही. पाश्चात्य लोकां त्यांचें महत्त्व कसें वाटतें तें आपण पाहिलेंच. भारतीय लोकांच्या रक्त वैदिक परंपरा आहे, हेंच खरें. भारताचें सबंध आध्यात्मिक जीवन वे प्रभावीपणें व्यापलें आहे असें रॅगोजिनदेखील म्हणतो. वेदांचा अभ केल्याशिवाय मराठी वाङ्मयाचा अभ्यास होणार नाही, हें टळटळीत दुपार सूर्यासारखें स्पष्ट आहे. मराठी काव्याचा प्रवाह आपल्या काळांत संत अगदी शुद्ध राखला. केशवसुतांनीहि आपल्या काळांत तेंच केलें. त्य कांही इंग्रजी काव्यलेखन केलें म्हणतात. संतांनीहि परभाषांत रचना केले आहेत. एवढेंच कशाला, 'मी मराठी भाषेचा शिवाजी आहें' हे श प्रथम कोणत्या भाषेंत आले, हेंहि सर्वश्रुत आहे! केशवसुतांचें महत्त्व स्थान अशा रीतीने सिद्ध होत आहे. पण, केशवसुतांची बुद्धि ती का वृत्ति ती काय, शिक्षण तें काय, असें कित्येक विद्वानांना वाटतें! त्य बंधु कुशाग्र बुद्धीचे पण हा 'कुशा' मात्र सामान्य, असें मानणें ज्यां रुचेल त्यांनी खुशाल मानावें! जणू कांही इंग्रजी परीक्षापद्धति आदर्श हो आणि तिच्यावर त्यांनी आपली बुद्धि घासून दाखवायला हवीच होती स्वतः केशवसुतांना हें मत कळलें असतें तर ते मनांत हसल्यावांचून खा राहिले नसते! कारण—

डोळ्यांला बघण्या तसें शिकविणें कानांस ऐकावया,
हें हास्याई जसें, तसें पढविणें शाहीर आहे तया!

केशवसुतांना आपल्या आईवडिलांविषयी केवढी पूज्य भावना होती, उघड आहे. त्यांचे वडील शिक्षक आणि आई धार्मिक, भाविक होती. यांनी केशवसुतांच्यावर संस्कार केले ते कोणत्या संस्कृतीचे? प्रौढपणींहि त्यांचे आशीर्वाद ते कां मागतात? आणि त्यांची आठवण होऊनच—

'तान्हा बाळचि राहतों तर किती तें गोड होतें असें!'

असा गहिवर त्यांच्या चित्तांत येतो. केशवसुतांच्या शैशवप्रेमाचा उगम कुठे पाहायचाच असेल तर तो हा संदर्भ पाहून केशवसुतांना जी रामकथा प्रिय तिच्यांतील 'गेले ते दिवस' या उद्गारांच्या संदर्भातच पाहायला नको काय? आणि, केशवसुतांना आपल्या संचारांत इंग्रजी काव्य वाचायला

मिळालें असणें अधिक शक्य आहे की भारतीय संस्कृतीविषयक लिखाण मिळालें असणें अधिक शक्य आहे ? 'गोल्डन ट्रेझरी'पेक्षा त्यांचें इंग्रजी वाचन फारसें नसावें, असें कांही टीकाकारच म्हणतात! आणि वैदिक संस्कृतीचें प्रतीक म्हणजे सोमरस. तोच केशवसुत मागत आहेत. सोमाचीं निरनिराळीं वर्णनें वाचून वेदकालींच तो प्रतीकरूप पावला होता, असें वाटतें. परंपरेंतूनच त्याचा जो शेष आला आहे, तो त्यांना हवा आहे. कारण सोमप्राशन केल्यावरच दंग व्हायचें आणि व्योमसागरावर जायचें हें 'होउनिया मग दंग मनीं' आणि 'कल्पतीची मग करुनी नौका' या शब्दांवरून स्पष्ट आहे. सोमाचा थोडासा भागच काय, त्याचें स्मरणदेखील स्फूर्ति देण्यास समर्थ आहे, हें केशवसुतांना पूर्णपणें कळलें होतें. पण असें असूनहि त्यांची परंपरेविषयीची भावना मुळींच अंध नाही. अंध माणसाला वैदिक परंपरेची खरी भक्ति करतां यायचीच नाही!

मराठी वाङ्मयाच्या या अमृतपरंपरेचा, वैदिक संस्कृतीचा, सृष्टीचा विचार मन करूं लागलें असतां, कालदेखील ज्याच्या दिव्यत्वाला नमन करतो तो निसर्ग चिरतरुण कसा आहे, चिररुचिर कसा आहे, त्याच्या सान्निध निवास बरा कसा आहे, हें ध्यानांत येतें. पण मन मग 'सिंहावलोकन'हि करतें, 'फुकट दवडलेले तास'हि आठवतात, आणि जगाविषयी उदासीन अशी सृष्टीशीं तन्मयता आपल्यापाशी नाही असे अनेक विचार मनांत येऊन, त्या निसर्गसिद्ध जीवनांत आणि आपल्यांत केवढी रुंद दरा निर्माण झाली आहे असें वाटून, ती दिव्य शांति केव्हा लाभणार, असें केशवसुतांप्रमाणेच मनांत येत नाही काय ? निसर्गसिद्ध जविन म्हणजे निसर्ग, सर्व विश्व, ज्या कारणासाठी निर्माण झालें आहे, तें कारण ओळखून त्यांत आपली कामगिरी कर्तव्यतत्परतेने पार पाडणें, हें अक्षरशः सूर्यप्रकाशासारखें स्वच्छ आहे. हेंच अमृतपरंपरा उच्च रवाने सांगत आहे! सूर्यचन्द्रादि विश्वाचे प्रतिनिधि खपुष्पें खुडत असतात, म्हणजे अपूर्व प्रयोग करीत असतात असेंच नाही काय ? मानवानेहि असेंच कांही तरी केलें पाहिजे. 'कांही तरी' म्हणजे काय हें ज्याचें त्याने ठरवावें!

केशवसुत हेंच आवाहन करतात—

कल्पनेची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊं
उडुरत्नें या गरिब घरेला तेथुनि फेकुनिया देऊं !

केशवसुतांची कविता वाचतांना त्यांचे सच्चे चेले, आणि केशव संप्रदायांत व मराठी वाङ्मयांत मोलाची भर टाकणारे कवि गोविंद यांच्या पुढील ओळींची स्मृति होणें हें सूर्याबरोबर चन्द्राचीहि आठवण व्ह इतकें नैसर्गिक आहे !—

शिवरायाच्यामागे आम्हीं लाल महालीं फिरणें
तसेंच तुमच्यामागे आम्हीं नवीन कविता करणें
असेंच कांही कांही करुनी जीवित त्याला गणणें
' गोविन्दाग्रज ' म्हणे असें हें आम्हां लाजिरवाणें !

शब्दप्रभु गोविंदाग्रजांनी असें म्हणावें तिथे मनांत येतें, आपण का बोलावें ?

—

[' केशवसुत ' या प्रबंधांत दिलेले वेदांतील उतारे श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, श्री. रा. वि. पटवर्धन, श्री. रा. गो. कोलंगडे, यांनी केलेल्या भाषांतरांतून घेतले आहेत. केशवसुतांच्या काळीं मराठींत प्रसिद्ध असलेल्या वेदांसंबंधीच्या ग्रंथांची यादी प्रा. गं. बा. सरदार यांच्या ' अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका ' या ग्रंथांतून घेतली आहे. रॅगोजिनच्या ग्रंथाचें आणि त्याचें स्वतःचें नांव पुढीलप्रमाणे :–

VEDIC INDIA
AS EMBODIED PRINCIPALLY IN
THE RIG-VEDA
BY
ZENAIDE A. RAGOZIN.]